दिवाळी विशेषांक

२०२१

# नवा

# वास्तुविचार



: संपादक :

डॉ. विलास ज. पवार

ओम पब्लिकेशन

स्वागत मूल्य रु.१६०/-

*With best compliments from*

शुभ दीपावली

# MANOJ GROUP

# PRODUCTS

**FIRE SPRINKLER SYSTEM**

- ESFR & ECFR SPRINKLERS
- DELUGE VALVE SYSTEMS
- MVWS & HVWS SYSTEMS
- PRE ACTION SPRINKLER SYSTEM
- FOAM EXPANSION SYSTEMS





**PASSIVE FIRE PROTECTION**

- FIRE DOORS
- FIRE RETARDANT PAINTS
- FIRE PROOF DAMPERS
- TUBULAR FIRE PROTECTION SYSTEMS
- LINEAR HEAT SENSING CABLES




**FIRE HYDRANT SYSTEM**

- YARD HYDRANTS
- INTERNAL HYDRANTS
- RISERS & DOWN COMERS
- FIRE PUMPS

**HAPPY DIWALI**

दिवाळी
विशेषांक २०२१

# नवा ☯ वास्तुविचार

: संपादक :

## डॉ. विलास ज. पवार



प्रकाशन : ओम पब्लिकेशन

ओम पब्लिकेशनने हा दिवाळी अंक, प्रकाशक डॉ. विलास पवार यांनी, एम. ३, पॅराडाईज टॉवर, गोखले रोड, नौपाडा, ठाणे फोन नं. ०२२- २५३६४१४१ येथे छापून तेथेच प्रसिद्ध केला. अंकात छापलेल्या मतांशी संपादक संपूर्ण सहमत असतीलच असे नाही.

**Email -** info@ompublication.com, **Website :** www.ompublication.com



# अंतरंग

## लेख


१ . संध्याछाया- शुभांगी पासेबंद ..............................................५

२ . माझे घर - चारुलता कुलकर्णी ..............................................७

३ . प्रवास वर्णन-शुभांगी घाग ..............................................९

४ .सोबत राहण्यापुरते संबंध-विश्वनाथ शिरढोणकर ..........................११

५ . एक पत्र त्यांच्यासाठी-वृषाली ठाकूर ..........................................१७

५ . हिंदुत्व आणि सावरकर-गिरीजा पागनीस ......................................२१


## कथा


१ . रंगातले रंग-विश्वनाथ शिरढोणकर ..............................................२३

२ . दर्शन-पांडुरंग जाधव ..............................................२९

३ . संवाद-प्रा . अरुण पाटील ..............................................३३

४ . भय इथले संपत नाही-अनामिक ..............................................३९

५ . समजत नाही काय चुकले-साधना झोपे ..............................................४३

६ . बोंडवाची वाडी-किसन पेडणेकर ..............................................४५

७ . आई- निलेश बामणे ..............................................५३

८ . सत्यासाठी संघर्ष-संतराम पाटील ..............................................५९

९ . टेलिफोन- निलेश बामणे ..............................................७९

★ काव्यसृष्टी ..............................................८३

★ पाककृती ..............................................८७

# संपादकीय...

## वास्तू आणि आप्तजनांचा सहवास प्रेममय होवो !

आपण सगळे 'कर्मयोगी' आहोत. काही तरी काम करत राहणे हे आपले नित्याचे आहे. कोणी व्यवसायिक, कोणी धंदेवाईक, कोणी नोकरदार तर कोणी गृहकर्तव्य करणारे अगदी नाही तर आराम हेच कर्म मानणारे काही महाभाग सुध्दा आहेत. या सर्वांना एकच गोष्ट गेली दिडवर्षे गंभीरतेने घ्यायला लावली ती कोविड परिस्थितीने.

सर्व प्रकारची काळजी इच्छा असो वा नसो पण सगळयांना घ्यायला लागली. संचारबंदीत खऱ्या अर्थाने घरातली स्थानबध्दता सर्वांनी उपभोगली. या काळात सर्वात  महत्वाची गोष्ट सामोरी आली ती म्हणजे आपल्या घराचे वास्तूचे महत्त्व! घरातील आप्तांचा सहवासाचे महत्त्व प्रकर्षाने महत्त्वाचे आहे हे कळाले. एखाद्या वास्तूत आपल्यासाठी नेमके काय असायला हवे, काय नको, कशाची गरज आहे, कशाची नाही, काय  गरजचे आहे, काय अडगळ आहे, अडचण आहे याचा साक्षात्कार या निमित्ताने झाला हे खरेच महत्वाचे आहे. ज्यांनी वास्तू देखणी राहण्यासाठी प्रयत्न  केले त्यांनी त्या वास्तूचा उपभोग घेतला. ज्यांनी वास्तू अधिक देखणी करावी वाटली त्यांनी ते करण्यासाठी मुबलक वेळ दिला आणि आपला वेळ सत्कारणी लावला. वास्तू हे फक्त राहण्यासाठी असते असे नाही तर वास्तूशी संबंधित अनेक आठवणी सुध्दा जोडलेल्या असतात. काही वास्तू, तर काही छायाचित्रे, फोटो अल्बम सुध्दा आठवणींना अजाळा देतात. घरात राहणाऱ्यांना या काळात ज्यामुळे जगणे सुकर झाले ते म्हणजे वास्तूच्या आणि आप्तजनांच्या सुखद सहवासामुळेच.

वास्तुमध्ये आवश्यक असलेल्या चर्चा, जवळीकता यामुळे जीवनातल्या आप्तजनांना सहवास सुखकारक आहे हे कळाले. अतिपरिचयात अवज्ञा। या न्यायाने काही कुरबुरी सुध्दा आप्तजनांत झाल्या पण त्या अपवादानेच. घरातले घरपण आणि वास्तुमय सहवासाने एका कठीण परिस्थितीला तोंड देण्यासाठी सर्वजण सक्षम आणि मनाने सदृढ झाले हे मात्र निश्चितच.

परिस्थिती मध्ये सुधारणा होत आहे. पुर्वपदांवर येण्यास कदाचित थोडा वेळ  अजून लागेल सुध्दा. वास्तूसहवास आणि आप्तजनांचा सहवास सुखावतो हे मात्र आता विसरायला नको. वास्तु मध्ये,घरांमध्ये प्रेमाचे, विश्वासाचे वातावरण आता वाढीस लागायला पाहिजे आणि त्यासाठी प्रयत्न सगळयांकडे व्हायला हवे आहेत. दिवाळीच्या मंगलमय सणांनिमित्ताने  सुखकारम शुभेच्छा!

शुभ

दिपावली

# किचन टिप्स?



१. साखर मुंग्यांपासून सुरक्षित ठेवण्याकरीता साखरेच्या डब्यात वरच ४-५ लवंग ठेवाव्यात.

२. सूखे खोबरे तूर डाळित खुपसून ठेवले तर खराब होत नाही.

३. रस्सा भाज्या खारट झाल्यास त्यात उकडलेला बटाटा घालावा,खारट पणा कमी होतो.

४. लिम्बाचा रस जास्त हवा असल्यास पाच-दहा मिनिटे लिम्बू कोमट पाण्यात भिजवून मगच रस काढावा, रस जास्त निघतो.

५. कोणताही पूलाव किंवा मसालेभात करताना तांदुळ १-२ तास पाण्यात भिजवून ठेवला तर साध्या तांदळचा पण दाणा वेगळा आणि मोठा होतो.

६. बटाटे झटपट उकळण्याकरिता पाण्यात चिमटीभर हळद घालावी.

७. हिंगाचा वास टिकवीण्यासाठी हिंग तुरीच्या डाळीच्या डब्यात ठेवावा.

८. डाळ किंवा तांदूळाला किड लागण्यापासून जपण्याकरीता त्यात कडूलिंबाचा पाला घालावा.

९. दुधाला वीरजण लावताना आतून थोडीशी तुरटी फिरवावी. दही घट्ट होते.

१०. भाज्यांमध्ये मीठ शेवटी घातल्यास भाजीतले लोह (iron) टिकन्यास मदत होते.

११. भेंडीची भाजी शिजवताना त्यात दोन चमचे दही घातले तर ती चिकट होत नाही.

१२. पुऱ्यांच्या कणकेत चिमटीभर साखर घातली तर पुऱ्या बराच वेळ फुगलेल्या राहतात.

१३. छोले रात्री भिजवताना त्यात मूठभर हरभरा डाळही भिजवावी, त्याने छोले छान रस्सादार आणि दाट होतात.

१४. कटयावर लिम्बाच्या रसाचे पांढरे डाग पडल्यास त्यावर आल्याचा तुकडा घासावा, डाग जातात.

१५. कढीलिंब एकदम बराच आणल्यास शिल्लक राहिला की सुकतो. अशा कढीलिम्बाची पाने तेलात तळून, डब्यात भरुन ठेवावीत. त्याचा हिरवा रंग कायम राहतो व ते बराच दिवस टिकतात.

१६. गाजर, टमाटर, काकडी, बीट, मुळा मऊ किंवा शिळा झाल्यास रात्रभर मिठाच्या पाण्यात घालून ठेवाव्यात. ताज्या व टवटवीत होतात.

१७. कच्ची केळी दीर्घ काळ ताजी राहण्याकरीता थंड पाण्यानी भरलेल्या पातेल्यात ठेवावी. साधारण १ आठवड्या पर्यंत केळी टवटवित राहतात. हे पाणी २ दिवसांत एकदा बदलावे.

१८. पालेभाज्या शिळया सुकलेल्या असल्यास पाण्यात १ चमचा विनेगार किंवा लिम्बुरस घालून ठेवल्या तर ताज्या होतात.

१९. शेंगदाणे भाजून झाल्यावर त्यात २ चिमटी मीठ टाकावे आणि गैस बंद करून थोडे परतावे. त्याने साल लवकर सुटतात.

*With Best Compliments from*

# P.M. RATNAKAR

**GOVT: REG. CONTRACTOR**
**CLASS 1-A**

*At. Solshet, Tal. Vikramgad, Dist. Palghar.*
*Email: Pmratnakar0340@gmail.com*

With best compliment from

M/S. VENKATESH CONSTRUCTION



Prop. Venkatesh Bammankatti

Goregaon (East) Mumbai.

M/s. Global Construction

Prop. Avdhesh Gupta



Vile-Parle, Mumbai.

# संध्या छाया

**शुभांगी पासेबंद**

साठ वर्षे वयानंतरचे नागरिककांना, ज्येष्ठ नागरिक म्हणून संबाधले जाते. वय वाढलेले असते. या नागिरिकांच्या जीवनाची संध्याकाळ झालेली असते. आज करोना महामारी मुळे ज्येष्ठ नागरिकांची अधिकच कुचंबना होत असते. माणूस जन्मल्यापासून उभारीच्या वयापर्यंत तो बहरतो, तारूण्य ओसरेपर्यत खूप कष्ट करतो. खूप यश मिळवतो आणि सुखी जीवन जगत असतो. जीवनाची संध्याकाळ झाली की निवृत्तीनंतर या संध्याछायात झाकोळत माणसाचं शरीर मजबुर करून जातात. या पुढे येणाऱ्या रात्रीची , पूर्णविरामाची जाणीव देऊन हैराण करतात.

ढळला रे ढळला दिन सखया, संध्याछाया भिवविती हदय !

घरची परिस्थिती बदलून गेली आहे.

पिलांनी फुटूनी पंख तयांची<br>
घरटी झाली कुठे कुठे !<br>
आता आपुली कांचन संध्या,<br>
मेघडंबरी सोनपुटे !

बा. भ. बोरकर यांच्या या कवितांमध्ये थोडासा हळवा उदास भाव देऊन जीवनाच्या संध्याकाळीच वर्णन केलेले आहे.

न बुढापे ने दम तोडा है,<br>
न जवानी ने हार मानी है !

अशा शब्दात एक दुजे के लिए या चित्रपटात तरुण आणि वृध्द या दोघांचे मधील किंवा दोन पिढयांच्या संघर्षात पण वर्णन केले आहे.

तुझं माझं जमेना,<br>
तुझ्यावाचून करमेना !

अशी परिस्थिती घरातील तरुण आणि वयस्कर यांची असते. फार थोडया लोकांना घरातील ज्येष्ठांच्या मानसिकतेची, त्यांनी केलेल्या कार्याची जाण आहे. काळ इतका झपाटयाने बदलला आहे की जेष्ठ नागरिकांची खाजगी अडगळीच्या खोलीत होऊ लागली आहे की काय असं वाटतं. माझ्या या वाक्यावर टीकासुध्दा होऊ शकते. पण जर माझं हे वाक्य चुकीचे असेल तर वृध्दाश्रम एवढे जोरात का वाढत आहेत? दिवसेंदिवस वृध्दाश्रमांची कमतरता का भासत आहे? माझ्या एका मैत्रिणीला वृध्दाश्रमात जायचं होतं. तेव्हा अनेक वृध्दाश्रमामधून आम्ही पाहणी केली असता जाणवलं, की वेटींग लिस्ट आहे. मुलांनी घरी घेऊन जाण्याची वाट बघत असलेले ज्येष्ठ नागरिक या वृध्दाश्रमात आहेत तरुणांना पण कधीतरी वृध्द व्हायचं असत. आज त्यांच्या डोक्यावर सूर्य तळपत आहे, पण कधीतरी हा सूर्य डोंगर माथ्यावरील केसां बरोबर अदृश्य होणार आहे त्यावेळी त्यांना ज्येष्ठांचे प्रश्न जाणवतील.

**पण जर माझं हे वाक्य चुकीचे असेल तर वृध्दाश्रम एवढे जोरात का वाढत आहेत? दिवसेंदिवस वृध्दाश्रमांची कमतरता का भासत आहे?**



संध्याछाया भिवविती हदया असं का म्हणतात ते पण कळेल. लहान मूल आणि ज्येष्ठ नागरिक हे सारख्याच स्तरावर असतात असे म्हणतात. पण लहान मुलांचे लाड केले जातात आणि जेष्ठ नागरिकांना टाळतात.

घर असावे घरासारखे,
नकोत नुसत्या भिंती !
या घरातून पिल्ले उडावे,
पंखात घेऊनी शक्ती

असे आपण घर, कुटुंबसंस्थेचा कौतुक करत असलो. तरीही या संध्याछाया भेडसावत आहेत. या संध्या छायेचा काळ हा कसा आनंदी करावा यासाठी आपण आपले छंद जोपासायला हवे. आरोग्याच्या तक्रारी या वयोमानानुसार होतच राहतात. ऊर्जा कमी होत राहते. पण ज्येष्ठ नागरिकांनी तडजोड करून राहायला हवे. ही जीवन संध्याकाळ आनंदी करण्याचा प्रयत्न कसा करावा आपण पुढे बघू.

संध्याछायेचा सुशांत काळ आनंदी जावो या शुभेच्छा......

# टिप्स

**१)सर्वप्रथम अडगळीची खोली वास्तुशास्त्राला मान्य नाही, आपल्या घरात अडगळ-अडचण असू नये. २)आपल्या घरातील प्रत्येक वस्तू ही सतत वापरात असली पाहिजे, काही अशा वस्तू आहेत की ते सतत लागत नाही पण त्या आठवड्यातून एकदा तरी वापराव्यात. ३) वस्तू सतत वापरायला पाहिजे कारण ती स्थिर राहिली तर त्याची एनर्जी थांबते व ती थांबली तर त्यावर धूळ साठते. मग तिच्यात फंगस तयार होतात, जेव्हा वस्तूला बुरशी लागते तेव्हा ती सडायला लागते.४)वर्षानुवर्ष वस्तू जपून ठेवू नये, ज्या वस्तूंना आपण १,२,३,४ वर्षे हात लावत नाही त्या वस्तूत निगेटिव्ह एनर्जी तयार होते. मग त्या एनर्जी आपल्याला घातक ठरतात. ५)जर चौरंग असेल तर ती इतर लोकांना वापरायला द्या, सतत त्या वस्तूचा वापर झाला पाहिजे.**

# माझे घर

**चारुलता कुलकर्णी**

घरातल्या प्रत्येक वस्तूला तिची योग्य ती जागा मिळवून दिली तर ती वस्तू जागेवरच जाते. घराला घरपण येतो. पसारा होत नाही.

घर असावे घरासारखे
नकोत नुसत्या भिंती
इथे असावा प्रेम जिव्हाळा
नकोत नुसती नाती

माझे घर या शब्दाला खूप महत्त्व आहे. प्रत्येकाची जिव्हाळ्याची जागा म्हणजे घर. घरात राहणाऱ्या व्यक्ती त्यांची गरज आवडीनिवडी यांवर अवलंबून असते व त्याप्रमाणे आपण आपल्या घराची योजना करीत असतो. लिविंग रूम हा घराच दर्शनी भाग असतो त्यामुळे तेथे कमीतकमी सामान व जास्तीत जास्त बैठकीची जागा असावी. कमीत कमी सामान यामुळे आपली लिविंग रूम प्रशस्त वाटते. डायनिंग टेबलला जर वेगळी जागा असेल तर त्यावर किंवा बाजूला क्रोकरी ठेवण्यासाठी व्यवस्था असावी.

**घर म्हणजे आपलेपणा, प्रेम, सहानुभूती परस्परांना समजून घेण्याची वृत्ती. आपल्या मन मोकळे करण्याची जागा. घरातील प्रत्येक व्यक्तीला कुठल्या ना कुठल्या गोष्टीची आवड असतेच आणि ती आपल्याला घरातील वस्तू यावरून दिसून येते.**

गृहिणींचा जिव्हाळ्याचा व कुटुंबातील व्यक्तींच्या आरोग्याची दक्षता ठेवणारे स्वयंपाक घर ! किचन प्लॅटफॉर्म च्या खाली रोज वापरणारण्याची भांडी असल्यास प्रत्येक वेळी वापरण्यासाठी सोपे जाण्यासाठी ड्रावर असावेत. म्हणजे स्वयंपाकाची भांडी दिसणार नाहीत. गॅस शेगडी च्या बाजुला इतर सोयी व्यवस्थित केल्यास स्वयंपाक करणे सोपे जाते.

बेडरूम मध्ये प्रत्येक व्यक्तीच्या सवयी प्रमाणे कपडे ठेवण्यासाठी स्टोरेज व्यवस्था असावी. मुलांच्या बेडरूम मध्ये स्टडी टेबल त्यावर लाईटची व्यवस्था असावी. टेबलाच्या एका बाजूला भिंतीवर पुस्तक, वहया अभ्यासाचे इतर साहित्य ठेवण्यासाठी लहानसे शेल्फ असल्यास सतत उटण्यापेक्षा जागेवरच बसून पुस्तक घेणे सोपे जाते. दिवानाच्या आत सुद्धा चादरी व इतर वस्तू ठेवण्यासाठी स्टोरेज ची व्यवस्था असल्यास बेडरुम अधिक आकर्षक वाटतो.

दिवसभर दमल्यानंतर विश्रांती प्रत्येकाची आवडती रूम म्हणजे बेडरूम. तेथे हवा, उजेड व थंडावा असल्यास झोपेचा प्रश्न सुटतो जर बेडरुमला बाल्कनी असल्यास तेथे आपल्या आवडीची एखादी कुंडी ठेवल्यास मन प्रसन्न होते. शक्यतो बेडरूम प्रशस्त वाटतो. तसेच डोळयांनाही शांत वाटते.

घर म्हणजे आपलेपणा, प्रेम, सहानुभूती परस्परांना समजून घेण्याची वृत्ती. आपले मन मोकळे करण्याची जागा. घरातील प्रत्येक व्यक्तीला कुठल्या ना कुठल्या गोष्टीची आवड असतेच आणि ती आपल्याला घरातील वस्तू यावरून दिसून येते. आपण जेव्हा बाहेर प्रवासाला

जातो तेव्हा घरातील आपली खरेदी असते पण विविध ठिकाणच्या वस्तूंचा घरात भरमसाठ संग्रह केला तर घर सुंदर दिसेलच असे नाही. त्या जागेवर ती वस्तू शोभून दिसली पाहिजे. तिचा आकार त्या जागेनुसार असावा. वस्तूचा रंग जागेच्या रंगसंगतीशी जुळणारा असावा हे देखील महत्त्वाचे आहे. लिविंग रूम, बेडरूम मध्ये साइड टेबलवर एखादी फ्ुलदाणी ठेवल्यास मन आकर्षून घेते, भिंतीवर लावलेला मोठे पेंटिंग आपल्या घरात फोकल पॉइंट होऊ शकतो. गडद रंगाची एखादी मूर्ती अथवा पॉट घराच्या मोकळा कोपरा सुशोभित करून टाकतो.



हे सर्व असल तरी खरेदी करताना त्याची प्रमाणबद्धता व प्रोफेशनल खूप महत्त्वाचे आहे. त्याचप्रमाणे जर घर सजवलं तर आपलं घर नक्कीच आकर्षक दिसेल.

आपण आपल्या घरात सगळ्या गोष्टींचा विचार करतो. सामान, मांडणी, रंगसंगती पण बेडशीट व पडदे याचा कधीच विचार करत नाही. आपल्याला आवडेल तो रंग आपण घेतो पण या दोन गोष्टींमुळे आपल्या घराचा लूक बदलून जातो. पडदे खरेदी करताना पडद्यावरील प्रत्येक रंगाच्या शेडचा आपल्या भिंतीच्या रंगाला मिळताजुळता असावा. लावताना सहा इंच वर लावा. रंग कधी गडद निवडू नका. रंगांमध्ये सूर्यप्रकाश थेट पडदयापर्यंत पोचतो. ताग, वेलवेटचे पडदे हे चांगला पर्याय आहे. हे पडदे घरात उष्णता येण्यापासून परावृत्त करतात. त्यामुळे घर थंड राहण्यास मदत होत.

भिंतीचा रंग गडद असेल तर पडदे फिकट रंगाचे लावावेत. भिंतीचा रंग फिकट असेल तर पडदे गडद रंगाचे लावावेत. विरुध्द रंगसंगतीमुळे घराला शोभा येते. लहान घर असल्यास शक्यतो बारीक नक्षीचे पडदे लावावेत खूप लहान पडदे खोलीची शोभा कमी करतात. तसेच जमीन पर्यंत न लोळणारे असे पडदे रूमाची शोभा वाढवतात. सुरकुत्या असणारे पडदे घरातील लोकांच्या आळशीपणा दर्शवतात. पडदयाच्या रिंगमध्ये ४ ते ५ इंच अंतर ठेवावे म्हणजे दोन रिंग मध्ये येणारी दुमड चांगली दिसते. आपल्या घराची शोभा वाढवावी व सर्वांनी प्रेमाने रहावे असे प्रत्येकालाच वाटत असते. तसेच घरातील मंडळींच्या आवडीचा आरोग्याचा जरूर विचार करावा त्यामुळे आपल्या घरात प्रेमाने जिव्हाळ्याचे संबंध वाटतात आणि सजावट शोभा वाढवण्यास घरातील योग्य फर्निचर असून जर एकमेकांशी घरात संवाद होत नसतील आपुलकीची भावना नसेल तर त्याचा उपयोग नाही आपण दुसऱ्यांना सांगता दाखवताना अभिमानाने म्हटले पाहिजे हे माझे घर...

# प्रवास वर्णन

## शुभांगी घाग

ज्या दिवशी मी व्ही. आर. एस घेतली त्या दिवशीच मी ठरवून टाकलं होतं. आता खूप फिरायचं ठरल्याप्रमाणे सुरुवातही केली. सिनेमा पाहण्याचे वेड पण होतच "दिलवाले दुल्हनिया" या चित्रपटातील वेड लावणारा युरोप प्रत्यक्ष डोळ्यांनी स्पर्शुन पाहायचाच, त्यासाठी माझं मन केव्हाच आतुर होतं. लगेच या इच्छापूर्तीसाठी बाकीची (पैशांची) सर्व तजवीज झाल्यावर बरोबर जाण्यासाठी मी एक आनंदी मनाची सोबत शोधायला सुरुवात केली. तशी संधी लगेच चालून आली. एका लग्नानिमित्त जमलेल्या कौटुंबिक मेळाव्यात मी सूतोवाच केलं. या बरोबर माझ्या पाठीला पाठ लावून बसलेल्या माझ्या विहीणबाई रश्मीताई माझ्याकडे गरर्कन वळून म्हणाल्या "द्या टाळी जाण्यासाठी तुमची माझी जोडी!"

**सोनेरी दिवसांनी आम्हाला नात्या बरोबर वयही विसरायला लावलं. स्विझर्लंड च्या अंगावर शिरशिरी आणणाऱ्या हवेत "जरा सा झूम लू मे...." म्हणत आम्ही रस्त्यावर बागडलो**

मी व्ही. आर. एस. घेऊन उंडारणारी असले तरी रश्मीताई शाळेत मुख्याध्यापिका. त्यामुळे मे महिन्याला पर्याय नव्हता. ७ मे ते २५ मे या युरोप टूर साठी पैसे भरल्यावर आमच्या फोनाफोनीला वेग आला. माझ्याकडे औषधांचा दवाखाना आहे मी लागणारे औषधे घेत रश्मीताईना लगेच फोन केला. "तुम्ही गरम कपडे खरेदी करू नका माझ्या स्वेटर, कानटोपी यांना हवा मिळेल बाहेरची" अशी जॉईंट तयारी सुरू केली. नंतर एक मताने ठरवलं प्रवासात येणारा खर्च सामाईक करायचा. त्यामुळे युरोपमधील वायफळ खर्चावर आपोआपच बंधने आली.

ट्रीपचे पहिले एक-दोन दिवस एकमेकींना चाचपण्यात गेले. फोटो काढताना सुद्धा आमच्या दोन कॅमेऱ्यांनी वेगवेगळ्या सीन टिपले त्यामुळे आमच्या सहा कॉमन रोल्स मध्ये अख्खा 'युरोप' सामावला. लहानपणीच्या तसेच तरुणाईतल्या कितीतरी गाभुळलेल्या आठवणी एकमेकींना सांगत आम्ही रात्री जागवल्या. एकदा तर ॲमस्टरच्या 'कुकु गार्डन' मध्ये दिलेली वेळ संपली हे आमच्या लक्षातच आलं नाही. संपूर्ण बस आमच्यासाठी खोळंबली होती. शेवटी आमच्या ग्रुप लीडर रितेशला आम्हाला शोधाव लागलं त्याने आमचं नाव "कम्मो आणि निम्मो" ठेवलं होतं. मुळात विहीन दोघीच युरोप ट्रीपला येतात याचच सगळ्यांना मोठा अप्रूप होतं. ह्या सोनेरी दिवसांनी आम्हाला नात्या बरोबर वयही विसरायला लावलं. स्विझर्लंड च्या अंगावर शिरशिरी आणणाऱ्या हवेत "जरा सा झूम लू मे ...." म्हणत आम्ही रस्त्यावर बागडलो. हॉलंड, ऑस्ट्रेलिया येथील लांबच लांब पसरलेली हिरवीगार कुरणं, डोंगर उतरणीवरची छोटी टुमदार घरं, भोवती डोलणारी रंगीबेरंगी फुले हे सारे दृश्य आम्ही बसमधून खिडकीच्या काचेला नाक लावून पाहिलं. बर्फावरून घसरगुंडी केली. दिलवाले दुल्हनिया ले जायेंगे मध्ये शाहरुख ज्याठिकाणी ("इन्सब्रुक")काजलला लाल

गुलाबाचे फुल देतो त्याच ठिकाणी आम्ही पण एकमेकींना तिथे मिळणारी फुले दिली व तो क्षण फोटोत पकडला. तेथेच एक 'विशिंग वेल' होती. त्या वेल मध्ये कोणी काय विश मागितली हे कुणीच सांगायचं नाही असं ठरवलं. आपण छान प्रवास आनंदाने आठवणीमध्ये जपून ठेवायचा. सुख सहवासाचे मधुघट भरता भरता हुरहुर लावणारा तो क्षण आला. निरोप घेताना आमचा आणि सगळ्यांच्या डोळ्यांच्या डोहात पाणी



काठोकाठ भरले होते. त्या आसवानी एक वेगळं नातं दिल. विश्वास दिला. अशाच आपण खूप खूप आनंदी मनाने दोघी सगळ्यांबरोबर फिरूया प्रत्येक प्रवास कागदावर उतरवूया. तो आनंद या हृद्यात पोहचवूया... म्हटलं ना!

जुळल्या जर का सगळ्या तारा
जुळूनी आले सात ही सूर
मिटून जाई सारे अंतर
कितीही मग ते असले दूर

# मुलांच्या प्रगतीसाठी अंमलात आणा या वास्तू टिप्स...

★ घराच्या मुख्य दरवाजावरती वाळलेली फुले, पाने, सुकलेली तोरणे काढून टाकावीत. म्हणजे घरामध्ये शुभ उर्जा प्रवेश करण्यास कोणताही अडथळा निर्माण होत नाहीत.

★ घरातील सर्व खोल्यांमधील घड्याळे ही उत्तर किंवा पूर्व भिंतींवर लावावीत म्हणजे घड्याळाकडे बघताना आपले तोंड पूर्व व उत्तर या शुभ दिशांना होते.

★ घरातील सर्व खोल्यांमधील कॅलेंडर्स ही पूर्व किंवा उत्तर भिंतींवर लावावीत म्हणजे कॅलेंडरकडे बघताना आपले तोंड शुभ दिशांना होते.

★ कोणतेही काम करताना आपले तोंड उत्तर किंवा पूर्व दिशेला असावे म्हणजे आपले काम वेळेत आणि विनाअडथळा पार पडते.

★ झोपताना कधीही दक्षिणेला पाय करून झोपू नये. त्यामुळे आजारपण वाढते आणि माणूस कर्ज बाजारी होतो.

★ घराच्या ईशान्य दिशेला वजन ठेवू नये. ईशान्य दिशा ही नेहमी हलकी आणि मोकळी ठेवावी म्हणजेच घरामध्ये शांतता राहते.

★ सुख-समृद्धीसाठी घराच्या मुख्य दरवाजासमोर बालाजीचा फोटो लावावा.

★ बेडरूममध्ये देवघर किंवा देवाची मूर्ती, फोटो असू नये.

★ लाल, काळा, मरून हे तीन रंग घरामध्ये जास्त वापरू नयेत. यामुळे घरामध्ये सुख-समृद्धीदायक आयुष्यासाठी अडचणी येऊ शकतात.

★ झोपताना बेड स्विच बोर्डपाशी येऊ देऊ नये. त्यामुळे निद्रानाशाचा अडथळा येऊ शकतो.

# With best compliments from

# SHIVAGIRI CONSTRUCTION

**OFFICE: Dock Villa,17/3,**
**Rafi Ahmed Kidwai road, wadala, Mumbai-400 031**

VEDANT

# *VEDANT CONSTRUCTION*

**SPECIALIST IN WATER PROOFING & CIVIL WORK**

**BUILDING NO. CD 114/A202 SHREERANG SOCIETY THANE(W) 400601**

**With best compliment from**

## NANDLAL THAKUMAL

**CO-OPERATIVE CREDIT SOCIETY LTD.**

*With best compliment from*

## SHIV- KALA

**URBAN CO-OP. CREDIT SOCIETY LTD.**

*With best compliment from*

## PBS Properties

**Buy-Sell-Rent-Invest-Plot**
**Prop-Paresh soni**

116, 1 st Floor, Paradise Tower, Near Mcdonalds,
Ghokhale Road, Naupada, Thana (W)400 602

# सोबत राहण्या पुरते संबंध - लिव्हिंग इन रिलेशनशिप

**विश्वनाथ शिरढोणकर**

काहीं वर्षांपूर्वी इंदूरमधे नाटकाचा एक प्रयोग बघितला होता. नाटकाचे नाव होते, 'झालं गेलं विसरून जाऊ' नाटकाच्या समीक्षेकडे न जाता नाटकाच्या विषयवस्तुकडे जाणे गरजेचे वाटते. नाटकाचा विषय होता स्त्री-पुरुषाचे अनैतिक अंतरंग संबंध. लग्नानंतर बायकोच्या मित्राबरोबर तिच्या स्थापित झालेल्या अनैतिक शारीरिक संबंधाला नवऱ्याकडून सहज रित्या मान्य करणे, तिच्या मित्रापासून स्वतःच्या बायकोला झालेल्या मुलाला देखील मान्यता प्रदान करणे, त्याला स्वतःचे नाव देणे व तिघांनी मनमोकळ्या दिलखुलास व सहजरीत्या चर्चा करून परस्पर सहमतीने हे सर्व निर्णय घेणे हा आहे. नाटकातले पात्र, लेखक, दिग्दर्शक हे सर्व सहज रित्या समाजाला आणि कुटुंबाला विसरू शकतात पण रसिक दर्शकांना हे विसरणे तर कठीण पण पचविणेसुद्धा जड झाले. नाटकाच्या कथानकाचा आधार होता, कोणे एके काळी सोवियत रुस मधे त्या काळातल्या डाव्यांची पुरोगामी विचारधारा अशी होती की, स्त्री-पुरुषांसकट सर्व मालमत्ता राष्ट्राचीच आहे. आणि सर्व जीवित व निर्जीव संपती राष्ट्राची असल्याने अशा सर्व संपतीबद्दल राष्ट्रालाच निर्णय घेण्याचा हक्क आहे. आता यात स्त्री पुरुष देखील सामिल आहे म्हणून स्त्री-पुरुषांना (पती-पत्नी) नवरा बायकोच्या नात्याचे नाव देण्याचे काहीच कारण नाही. त्याच प्रमाणे लहान मुलं व पुढे होणारी मुलं देखील राष्ट्राचीच संपती आहे म्हणून त्यांच्या जन्मदात्यांना आई-वडिलांचे नाव देखील देण्याची गरज नाही. पण अंमलबजावणीच्या बऱ्याच अडचणींमुळे ही व्यवस्था फार काळ टिकू शकली नाही व सोवियत रुस मधे कुटुंब व्यवस्थेची गरज भासू लागली. म्हणून त्या देशात असली तुगलकी व्यवस्था लवकरच मोडीत आली. आपण मराठी लोक साने गुरुजींच्या कथे मधल्या श्यामच्या आईला 'सर्वश्रेष्ठ संस्कार देणारी आई' मानतो. जिजाबाईंनाा देखील चांगले संस्कार शिकवणारी श्रेष्ठ माता मानतो. जगातल्या बऱ्याच देशातही फार मोठ्या प्रमाणात आईच्या महत्वाचे गुणगान झालेले आहे. ज्या सोवियत संघात आई-वडिलांच्या नात्याची गरज नाही असे डाव्या पुरोगाम्यांनी धोरण ठेवले होते, त्याच सोवियत रुस मधे त्याच सुमारास मेक्सिम गोर्कीने आईचे महत्व पटवून देणारी, विश्व प्रसिद्ध कादंबरी 'मदर' लिहिली होती. नात्यांच्या महत्वासाठी इथं फक्त हा उल्लेख.

**शिवाय एकटयाला मुंबईसकट मोठ्या शहरातले डिपाजिट व भाडेही परवडण्यासारखे नसते. या विचाराने शहरांमध्ये 'पेइंग गेस्ट' व्यवसाय सुरु झाला.**

आपण नाटकाच्या मूळ विषयाकडे वळू या. जगात बऱ्याच बऱ्यावाईट गोष्टी घडत असतात. परिस्थितीप्रमाणे वर्तन-गैरवर्तन उघडकीस येते. मनाला पटत नाही ते गैरवर्तन. याहून पुढे मनाला जरी पटत असलं तरी ज्या कृत्याने पश्चातापाची वेळ येते ते गैरवर्तन. स्त्री-पुरुषांचे अंतरंग शारीरिक संबंध, समजात मान्य असो वा नसो (बहुतेक मान्य नसतात) कायदेशीर असो किंवा नसो,

असले संबंध कोणी स्वत:हून उघडकीस आणत नाही. पण आजकालच्या साहित्याचा, नाटकांचा, चित्रपटांचा, मालिकांचा, संगीताचा, चित्रकलेचा, विषय स्त्री-पुरुषांचे अंतरंग कामुक संबंध बहुदा असाच असतो. जणू जगात आता कोणताच विषय उरलाच नाही आणि कोणतीही सामाजिक, आर्थिक, समस्या जगात उरली नाही. या बाबतीत उर्दूचा एक शेर आठवतो, "जमीं वालों के सारे मसले हल हो गए शायद, जमीं के हुक्मरान अब आसमां की बात करते है"

स्त्री-पुरुषांचे अंतरंग संबंध शेकडों वर्षांपासून सर्वांचा आवडता विषय राहिलेला आहे. अगदी वात्सायनच्या कामसूत्रापासून ते आज निर्मित होणाऱ्या चित्रपटांपर्यंत. मुद्रण व्यवस्थेचा शोध व यात उन्नत तंत्रज्ञानिक, फोटोग्राफी आणि चित्रपट क्षेत्रात झालेला विकास झाल्या नंतर, विशेष करून गेल्या ५० वर्षात टीव्ही च्या विकासानंतर आणि इंटरनेटच्या व सोशल मिडियाच्या अनियंत्रित वापराने स्त्री पुरुषांच्या वैयक्तिक अंतरंग संबंधाच्या विषयांना वेग आलेला आहे. प्रसाराच्या अभावामुळे हा विषय अगोदर लोकांपर्यंत फार कमी पोहचत असे. पण तंत्रज्ञानामुळे हा विषय आज लहान मुलांपर्यंत पोहचेलेला आहे. महाराष्ट्रात सुमारे दहा वर्षांपूर्वी जेव्हापासून 'लिव्हिंग इन रिलेशनशिप' साठी वेगळा कायदा बनविण्यात आला आहे तेव्हा पासून या



विषयाला वेगळेच एक वळण मिळालेले असून आज ही हा चर्चेचा मुद्दा झालेला आहे. मुंबईसकट देशातल्या इतर मोठ्या शहरात नोकरी व्यवसाय निमित्त असंख्य तरुण मुलं मुली एकटेच राहतात. राहण्याची गैरसोय तर असतेच पण तूर्त राहण्याची व्यवस्था देखील होऊ पावत नाही. शिवाय एकट्याला मुंबईसकट मोठ्या शहरातले डिपाजिट व भाडेही परवडण्यासारखे नसते. या विचाराने शहरांमध्ये 'पेइंग गेस्ट' व्यवसाय सुरु झाला. ही व्यवस्था तशी उत्तम पैकीच असते. परस्पर गरजांमुळे व परस्पर मदतीच्या दृष्टीने एक दुसऱ्यास बंधनकारी अशी आदर्श व्यवस्था. विशेष करून तरुण मुलींच्या सुरक्षिततेच्या दृष्टीनेही चांगली अशी घरगुती वातावरणामुळे "पेइंगगेस्ट" व्यवस्था लोकप्रिय झाली. पण तरुणांमध्ये शिस्तीच्या अभावामुळे व शहरातल्या अतिव्यस्तेमुळे व परस्परांसाठी लागणाऱ्या योग्य ती काळजी न घेतल्याने तरुणांना ही व्यवस्था कमी वाटू लागली. शिवाय असल्या व्यवस्थेत त्यांना स्वातंत्र्य नसायचे आणि तरुणांना कोणतेही बंधन मान्य नसते. म्हणून पुढे मोठ्या शहरांमधे 'वसतीगृह' (हॉस्टेल) व्यवस्था निर्माण होऊ लागली. याही पुढे जाऊन दोनदोन चारचारच्या समुहात मुलं -मुली भाड्याने फ्लॅट घेऊन स्वतंत्रपणे राहू लागले. हॉस्टेल्स व फ्लॅटस राहण्याच्या दृष्टीने सोयीस्करच असतात पण मुळात तरुणांच्या स्वच्छंदतेला व स्वैराचाराला समुहात राहिल्याने कुठं तरी आळा बसत होता, अडथळा येत होता. म्हणून

मुलं-मुली अविवाहितच जमेल तसे निःसंकोचाने बरोबर राहू लागले. बरोबर राहिल्याने व शारीरिक आकर्षणाने शारीरिक संबंध हे आलेच व पुढचे आव्हान देखील आलेच. या सर्व भानगडींमुळे अशा अविवाहित जोडप्यांना घरमालक घर भाड्याने द्यायला सहसा तयार होत नसे. अशा जोडप्यांच्या अविवाहित सोबत राहण्याला सामजिक मान्यता देखील नसे. हे सर्व बघता महाराष्ट्र शासनाने "लिव्हिंग इन रिलेशनशिपचा" कायदा बनविला आणि तो विधानसभेत पास झाला. हा कायदा बनवून शासनाने आपली मंशा दर्शविली की अशा तरुण-तरुणींना भाड्याचे घर मिळणे सोयीचे ठरो व त्यांना समाजात मान्यता ही मिळो.



असल्या सोबत राहण्याचो पडसाद उमटणारच. पालकांची काळजी स्वाभाविकच राहणार. अविवाहितच बरोबर राहणाऱ्या जोडप्यांना आज ही समाजात तितक्याशा चांगल्या नजरेने बघितले जात नाही. समाजात हा अनाचार समजाला जातो. यात पुढे मुलं झाल्यास पुरुषांना बंधनकारक नाहीच. भलेही आजच्या तरुणी असल्या संबंधात मुल होऊ देण्याची खबरदारी बाळगतात. तरीही एकाद वेळेस मातृत्वाची भावना उसळणे स्वाभाविक असते व ती नाकारता येत नाही. शरीरापेक्षा मातृत्व भारी पडतं. अशा परिस्थितीत घरात व समाजात असंतोष हा असतोच. दुसरं होणाऱ्या मुलाचे भवितव्य काय? त्याचे लालनपालन कोण करणार? तो कुणाचे नाव लावणार? हे असले प्रश्न उद्भवणे स्वाभाविक आहे.

खरं तर महाराष्ट्र शासनासमोर मुंबई, पुणे व नाशिक सारख्या शहरात मोठ्या प्रमाणात नोकरीपेशा तरुण-तरुणींच्या राहण्याच्या दृष्टीने हा फार मोठा प्रश्न होता. यात उच्चतम न्यायालयाचा निर्णय की परस्पर सहमतीने बनलेले शारीरिक संबंध गुन्हा नाही, हाच या लिव्ह इन कायद्याचा आधार ठरला. सरकारला प्रत्येकाची राहण्याची सोय करता येणे शक्य नाही. त्यात मोठ्या शहरात गृह निर्माण मागणी पेक्षा फारच कमी. आणि जे उपलब्ध आहेत ते घेणे प्रत्येकाच्या आवाक्यात नसते. या सर्व गोष्टींचा विचार करूनच, 'लिव्हिंग इन रिलेशनशिप' चा कायदा बनविण्यात आला असेल. अविवाहीतांबद्दल सर्व सामन्यांचा दृष्टींकोन बदलावा हा देखील या कायद्याचा हेतू असावा. इथं नमूद करावेसे वाटते की,

'दृष्टी आड सृष्टी' म्हणजे असले प्रकार इतर शहरात आढळत असले तरी त्या त्या संबंधित राज्यांद्वारे अद्याप या बाबतीत कायदा बनविलेला नाही.

आता मूळ प्रश्न हा की या निमित्ताने अनाचाराला, स्वैच्छाचाराला वाव मिळतो हा आहे. जास्त संकीर्ण मनाचे लोक 'व्यभिचार' हा शब्द वापरू शकतात. पण माझ्या मते सहमती असल्याने याला व्यभिचार म्हणता येणार नाही.

स्त्री समानतेचे व स्त्री स्वातंत्र्याचे पक्षधर याला वेगळ्या दृष्टीने बघतात. त्यांच्या मते जेव्हा पुरुषांना अनैतिक संबंध बाळगून (खरं तर हे गैरवर्तन दुर्दैवच म्हणायला हवं) परिवारात व समाजात मान्यता मिळू शकते तर मग स्त्रियांच्या असल्या वर्तनाला का मान्यता मिळू नये? स्त्री-पुरुष समानता हा विषय सुद्धा जुनाच आहे पण या बाबतीतच महाराष्ट्रातल्या तरुणींना स्वातंत्र्य कां हवे आहे? खरं तर समाजाच्या कल्याणासाठी पुरुषांच्याही असल्या अनैतिक संबंधांना आळा घालण्याची नितांत गरज आहे.

आज एकत्र कुटुंब पद्धती संपूर्णपणे संपुष्टात आलेली आहे. मुलांना ज्ञान पाझरणारे व छान छान गोष्टी सांगून संस्कार घडविणारे आजी-आजोबा 'हम दो हमारा एक' वरून घसरत 'हम दो हमारा कोई नही' वर आलेली आहे. चुकून एकाद मुल घरात असलं तर त्याला संस्कार लावणारी, आजी आजोबा, काका काकू, आत्या, मावशी, मामा मामी सारखी नाती दिसेनासे झाले असल्याने घरातल्या मुलाला त्यांचा गोडवा अनुभवण्याचे काहीच कारण नाही. शिवाय नोकरी व्यवसायामुळे दूर दूर राहिल्याने स्त्री पुरुषांचे संबंध तुटक होत चालले आहे.




आता तर 'लिव्हिंग इन रिलेशनशिप' सारखी मुभा असल्याने कुटुंबाची सर्व जवाबदारी सहज झटकता देखील येते. पण असल्या संबंधांमुळे जन्म घेतलेल्या मुलांनी काय करावे? त्यांची जवाबदारी कोण घेणार? त्यांना कोण सांभाळणार?त्यांना नाती कुठून मिळणार?नात्यांची गंध त्यांच्या आयुष्यात कशी दरवळणार? समाजाचा सुदृढ आधार असलेल्या कुटुंबाचे महत्व त्यांना कसे समजणार ? मग काय एके काळी सोवियत रुस मधे असलेली पुरोगामी डाव्यांची व्यवस्था पत्करून मुलं ही राष्ट्राची संपती मानायची तरी मुळात मुलांच्या सांभाळण्याचा प्रश्न उरतोच. म्हणजे शासनाने कायदा बनविला तर मुलं देखील शासनाने सांभाळायला हवी असेच झाले. स्त्री ही माता असते आणि म्हणून सध्या तरी मुलाला तिलाच जन्म द्यायचा आणि तिलाच सांभाळायचे असं आहे. भले ही कोर्टातून पुरुषाला मुलाचा सांभाळ करण्यासाठी आर्थिक तरतूदीसाठी बजाविले गेले असले तरीही नऊ महिने पोटात बाळगून मुलाला मोठे करण्याचा खटाटोप आहेच व हे सर्व स्त्री कडेच आले. स्त्रियांच्या समानतेसाठी लढा लढविणाऱ्या संघटनांनी याचा विचार नक्कीच करावा.

या 'लिव्हिंग इन रिलेशन' मधे पार्टनर देखील बदलता येतोच की. वर कोणत्याही प्रकारच्या 'मेरीज सर्टिफिकेट' ची गरज नाही व वेळ पडल्यास घटस्फोट घेण्याची देखील गरज नाही. सहज वेगळे होता येते. साता जन्माचे बंधन नाही आणि वडाच्या प्रदक्षिणा घालण्याची पण गरज नाही. स्वातंत्र्याचा भरपूर फायदाच फायदा. खाईन तर तुपाशी नाही तर उपाशी. प्रत्येक बाबतीत शासनाचे हे असेच असते. चार पाउलं पुढे जाऊ नाही तर चार पाउलं

मागे धावून येऊ, पण योग्य तो चांगला निर्णय घेणार नाही. खरं तर या असल्या नियमाने (सूट मिळाल्याने) येणाऱ्या काळात अनेक समस्यांना सामोरे जावे लागणार आहेत. मुख्य तर विवाह संस्थेलाच तडा बसण्याची शक्यता आहे. एक दुसऱ्यांच्या प्रती आपुलकीच्या भावनांचा अंत होणार आहे. आपलुकीच्या भावना कोणाच्याही घराच्या सुदृढतेच व एकोप्याचा आधार असतो. कोणत्याही संकटाना घरात राहणाऱ्यांच्या एकोप्यामुळे सामोरे जाण्याचे सामुहिक बळ मिळते. घरातल्या आधारामुळे माणूस निराश व हताश होत नाही. या असल्या नियमांनी संपत्तीचे हस्तांतरण, संस्कृतीचे हस्तांतरण, संस्कारांचे हस्तांतरण, परंपरेचे हस्तांतरण, आणि माणुसकीसाठी आवश्यक गुणांचे हस्तांतरण येणाऱ्या पिढीला होणे अवघड ठरणार आहे. स्वातंत्र्याचा गैरवापर होण्याची शक्यता असल्याने पालकांनी व मुला-मुलींनी या बाबतीत योग्य ती काळजी व दखल घेण्याची गरज आहे.

## घराच्या मुख्य दरवाज्याचेही काही नियम आहेत.

१) घराच्या मुख्य दरवाज्यासमोर रस्ता नसावा. दरवाज्यासमोर रस्ता असल्यास आपल्या विकासात बाधा येते.

२) दरवाज्यासमोर मोठे झाड असल्याने घरातील मुले नेहमी आजारी पडतात.



३) दरवाज्यासमोर नेहमी पाणी वाहते ठेवल्याने नेहमी आर्थिक नुकसान होत असते.

४) दरवाज्यासमोर मंदिर असेल तर घरात कधीच सुख नांदत नाही.

५) घराच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर स्तंभ (खांब) असतील तर त्या घरातील महिला नेहमी आजारी पडतात.

६) जमिनीच्या तुलनेत घराचा दरवाजा खोलगट भागात असेल तर घरातील मुख्य पुरुष व्यसनाधीन व नेहमी दुःखात बुडालेला असतो.

७) घरासमोर रस्ता, मंदिर असेल तर घरासमोर अधिक जागा सोडल्याने दोष नाहीसे होतात.

८) घराचे मुख्य प्रवेशद्वार घरातील इतर दरवाज्यापेक्षा मोठे असावे.

# घर बांधताना काय काळजी घ्याल?

प्लॉट खरेदी केल्यानंतर घर बांधताना आपल्याला खूप गोष्टींचा विचार करावा लागतो. प्लॉटच्या चारही बाजूंनी येणारे रस्ते, प्लॉटची लांबी-रुंदी, प्लॉटवर असलेली झाडे आदी गोष्टी लक्षात घेऊन घराचे बांधकाम करावे लागत असते. घर बांधताना वास्तुशास्त्राचा आधार घ्यावा लागत असतो. वास्तुशास्त्रात घर कुठे बांधावे व कुठे बांधू नये, या संदर्भात काही नियम व माहिती सांगितली आहे. ती पुढीलप्रमाणे....



★ ब्रह्मदेव, विष्णू, सूर्य, शिवशंकर तसेच जैन मंदिरासमोर किंवा मागील प्लॉटवर घराचे बांधकाम करू नये.

★ घर बांधताना उत्तर, पूर्व व ईशान्य दिशेला अधिक जागा सोडावी. घराच्या छताचा उतारही उत्तर किंवा ईशान्य दिशेला केला पाहिजे. घरातील नळ किंवा घराबाहेर केलेली बोअरवेल ईशान्य किंवा नैऋत्य दिशेच्या कोपऱ्यातच पाहिजे.

★ खिडक्या पूर्व व उत्तर दिशेला जास्त प्रमाणात ठेवल्या पाहिजेत. दक्षिण दिशेला खिडक्या ठेवू नयेत. ईशान्य कोपऱ्यात स्वयंपाक खोली ठेवावी. आऊट हाऊस नेहमी पश्चिम किंवा दक्षिण दिशेला व गाडी शेड उत्तर दिशेला बनवली पाहिजे.

घरात फोन वाजतो
नवरा बायकोला- मि घरात नाही म्हणून सांग,
बायको फोनवर- ते घरी आहेत,
नवरा- अगं तुला सांगितल ना मी घरी नाही म्हणून सांगायला.
बायको- फोन तुमच्यासाठी नाही माझ्यासाठी आला होता.



बंडूच्या घरी त्याचा एक software engineer मित्र येतो व घराच्या main door ला लिंबू मिर्ची लटकतांना बघून आश्चर्याने विचारतो What is this?
बंडू- This is our anti-virus.. made in india

**With best compliment from**

# Sandip Marathe

## Govt. Registered Contractor

(Specilised in Corporate Buildings Renovations)

---

Vashi, Navi Mumbai.

---

Tru Decor

**Interior Designers & Turnkey Interior Contractors**


With Best Compliments from
MILAN
ROAD BUILDTECH LLP
3rd floor; Ostwal Kesar Park, D2 Type Bldg; Betegaon,
Palghar-401 501.(Maharashtra)
Email: ganeshgholap@milangroup.co.in
www. milangroup.co.in

# एक पत्र त्यांच्यासाठी

**वृषाली ठाकूर**

प्रिय,

बाबा.

आज मुद्दामच हे लिहिण्याचे उपद्याप. . . तुम्हांला आश्चर्य वाटत असेल ना माझ्यासारखा टेक्नोसेवी आणि सतत मोबाईलला चिकटून बसणारा व्यक्ती चक्क कागद आणि पेन घेऊन आपल्या मोडक्या अक्षरात काहीतरी खरडतोय. . . खरंय. . . पण आजकाल आपलं फारस पटत नाही ना ना रे. . .समोरासमोर बसून क्वालिटी डिस्कशन होण्यापेक्षा वादच जास्त होतात. दोघांचंही वय वाढलंय आणि वयानुसार येणाऱ्या अनुभवासोबत आपली मत बदलली आणि मग चालू झाले न संपणारे भांडण तंटे. मग ते माझ्या सतत बदलणाऱ्या नोकरीवरून असोत वा रात्री लेट येण्यावरून असोत वा शॉपिंग करण्यावरून. . . माझ्यासाठी तू नेहमीच ओल्ड स्कुल होतास. नोकरीत बढती पाहिजे तर आजच्या काळात एकाच कंपनीत राहून काही नाही होत हे तुला एकाच कंपनीतून रिटायर होणाऱ्या तुला कस समजावणार ना. माझा मित्रपरिवार नेहमीच तुला खटकायचा. त्यांच्यासोबत फिरण्यावर तुझी कित्येक बंधन. तू कायम तुझ्या संसारापुरता मर्यादित राहिलास. . . तुला काय समजणार मित्र परिवार आणि आमची मस्ती.

मला नवीन टेक्नॉलॉजी वापरायला आवडते म्हणून मी घेतो नवीन फोन. किती काही फीचर्स असतात त्याच्यात. . . पण तुला तर त्यातलं काही कळत नाही तर कस समजावणार. . . ? माझी कार घेताना पण किती काय काय बोललास मला. तू तर आयुष्यभर खटारा बाईकवर फिरलास आणि आम्हालाही त्याच्यावरच फिरवलंस. आता मी माझ्या पैशावर गाडी घेऊन जरा चांगली लाईफ जगावं म्हटलं तर तुझी फायनान्स, सेविंग सगळ्याची लेक्चर्स चालू झाली. माझ्या औटींगवर पण तुझी पाबंदी. साधं हॉटेलमध्ये जेवायला गेलं तरी समोरच्या डिशपेक्षा मेनूकार्डच्या रेटवर तुझं लक्ष. किती ते मिडलक्लास वागशील. थोडं नाही खूप सुधारायची गरज होती तुला.

**पण. . . हा कोरोना आला आणि सगळीच मत बदलून गेली. लेऑफच्या लिस्टमध्ये नवीन एम्प्लॉईजची नाव आधी टाकली गेली. त्यात माझा नंबर पहिल्या ५० लोकांत होता.**

पण. . . हा कोरोना आला आणि सगळीच मत बदलून गेली. लेऑफच्या लिस्टमध्ये नवीन एम्प्लॉईजची नाव आधी टाकली गेली. त्यात माझा नंबर पहिल्या ५० लोकांत होता. कन्फर्मेशन मिळालं तशी माझ्या पायाखालची जमीन सरकली. पाच महिन्याआधीच तर हि कंपनी जॉईन केलेली. तेव्हाही तू ओरडला होतास मागच्या कंपनीत निदान दोन वर्ष तरी स्टॅबिलिटी ठेव. . . इतकी कितीशी इन्क्रिमेंट मिळणार आहे नवीन ठिकाणी' पण नाही ऐकलं तुझं. जुन्या कामाच्या प्रेशरला कंटाळून ती कंपनी सोडली. परंतु नवीन ठिकाणी डोक्याचा व्याप काही सुटला नाही त्यात अद्यावत ऑफिस पाहून पाघळलेल्या मला त्याच्या पोकळ पायाची कल्पना येईपर्यंत फार उशीर झाला होता.

वाटलं तू आता सुनावशील. पण नाही तू एखाद्या स्थितप्रज्ञ सारखा शांत होतास. तुझ्या चेहऱ्यावरचे भाव पाहून तेव्हाही वाटत होत कि तुझं बोलणं खरं झालेलं पाहून तुझा इगो सुखावला असेल आतून. पण तो हि माझा निव्वळ भ्रम होता. नोकरी गेल्याच कळताच जिवाभावाचे दोन चार जण सोडून बाकीच्यांच्या फोनकॉल्सचा ओघ आपोआप कमी झाला. त्यातही कोणाला नोकरीच विचारताच केवळ बघतो सांगतो म्हणून मला टाळणारेच जास्त. ज्या टीमसोबत रात्र रात्र पार्ट्या केल्या त्यांनी स्वतःची जागा सुरक्षति ठेवून आम्हा नवख्या लोकांना पद्धतशीरपणे कटवल.



मैत्रीचा जो अर्थ तू इतकी वर्ष जीवाचा आटापिटा करून समजावत होता तो अगदी काही महिन्यांत उदाहरणांसह समजला. जेव्हा सगळं कळून चुकलं तेव्हा स्वतःचीच लाज वाटत होती. ज्या पद्धतीच माझं तुझ्याशी वागणं होत त्याचा मलाच पश्चात्ताप होत होता. वाटलं तुला खूप दुखावलंय मी. . . त्यापेक्षा सगळं सोडून कुठेतरी दूर निघून जावं. . . पण. . माझ्या बँक बॅलन्सने मला माझी लायकी दाखवली. पाच वर्षांच्या सर्व्हिसमध्ये बँकमध्ये केवळ चार अंकी रक्कम मला माझ्या खर्चाचा विचार करायला लावत होती. तू दर वेळी सेविंगच बोलायचा आणि मी तुला कंजूस म्हणून उडवून लावायचो पण आज त्या कंजूसपणामागे दडलेला फायनान्स प्लॅनर दिसला. इतकी वर्ष माझ्या कमवतेपणाचा असलेला गर्व क्षणार्धात गळून पडला. आणि कार ती तशीच पार्किंगमध्ये उभी आहे आणि आता जेव्हा दिसते तेव्हा तिच्या महिन्याच्या ई एम आयची आठवण करून देते. रोज ट्रेनने जायला पर्याय नाही तर कशाला एवढी महागडी कार हवी... हे तुझं वाक्य त्यावेळी माझ्या इगोला बाणासारखं टोचलं होत. आणि त्यामुळे ठरलेल्या मॉडेलपेक्षा महागडं मॉडेल तुझ्या नाकावर टिच्चून घेतलं होत. तुझ्या चेहऱ्यावरच्या नाराजीमागे माझ्या हातात येणाऱ्या पगाराची तुला असलेली काळजी मला दिसलीच नाही.

तुझं एकाच नोकरीवर टिकून राहणं ही तुझी गरज होती कारण तुझं पूर्ण कुटुंब तुझ्यावर अवलंबून होत. मित्रांत रमण्यापेक्षा जमलं तर ओव्हरटाइम करून निदान दोन दिवसाच्या भाजीचे पैसे कसे सुटतील ह्याच घड्याळ सतत तुझ्या डोक्यात फिरत असायचं. मला नेहमीच इरिटेटिंग वाटणारे आणि वर्षातून चार पाच वेळा भेटणारे काका, मामा जेव्हा आता स्वतःहून तुला मदतीसाठी विचारतात तेव्हा माझ्या मित्रत्वाच्या कल्पना मला पोकळ वाटू लागल्या. कधी स्वतःचे आईबाबा तर कधी आईचे व आमचे लाड पुरवता पुरवता तू स्वतःच्या आवडीनिवडी कधी विसरलास तुझं तुलाही कळलं नाही. आणि मी मात्र माझे हट्ट पूर्ण होत नाहीत म्हणून इतकी वर्ष

तुझ्यावर राग होता. तुझं बाईक घेणं हे कधीच छानछोकीसाठी नव्हतं तर दोन बस बदलून घरी येईपर्यंत उशीर होईल म्हणून त्यावरच सोल्युशन होत. एवढ्या तेवढ्या अंतरासाठी उगाच ढीगभर ट्राफिकमध्ये उभं राहून जास्त पेट्रोल का जाळा ते तुझं तत्वज्ञान. माणसाच्या गरज मर्यादित असाव्या म्हणजे कोणत्याही परिस्थितीत तो तग धरू शकतो हे तू केवळ सांगत नाही बसलास पण स्वतःच्या जीवनात तू रुजवलास पण. सगळ्या जबाबदाऱ्यांचं ओझं आपल्या खांद्यावर यशस्वीपणे पेलत मोडेन पण वाकणार नाही हा तुझा बाणा माझ्यासारख्या बेजबाबदार उडाणटप्पूच्या लक्षात कधी आलाच नाही. तुझ्या कंजूसपणाने तू माझ्या भविष्याची मात्र भरभक्कम तजवीज करून ठेवलीस तरीही माझ्यासाठी तू नेहमीच भणंग राहिलास. माफी मागायचीय तुझी पण कशी ते कळत नाहीये. इतकी वर्ष आपल्यात असणारी जनरेशन गॅप हा माझा दुनियेच्या अनुभवाचा तुटवडा होता हे आज कळतंय मला. तुझी रटाळ लेक्चर्स हे तुझ्या अनुभवाचे बोल होते हे आज समजलंय. आणि काल जे पैसे ट्रान्स्फर केलेस ना ते नकोत आता थोडे तुझे अनुभव मात्र नक्की शेअर कर.



तुझाच नालायक मुलगा

## आरसा

१) आरशाचा विचार केला तर आपल्या घरात आरसा कुठेही लावला नाही पाहिजे. जर आरसा असेल तर त्याला पडदा लावला पाहिजे, कारण आरशात नेहमी बाहेरचे प्रतिबिंब पडतच असतात, आणि ते प्रतिबिंब पॉझिटिव्ह व निगेटिव्ह असू शकतात.



२) ज्या ठिकाणी तुम्ही आरसा लावला असेल तेथे त्या आरशातून बघणे की बाहेरच प्रतिबिंब पडतं का नाही, जर पडत असेल तर तेथून आरसा काढून टाकणे.

३) आरसा हा नेहमी बंद असावा, कारण तो जर ओपन असेल तर सर्व प्रतिबिंब तो खेचत असतो, तेही डबल वेगाने आपल्यावर टाकत असतो.

४) आरशाचा महत्त्वाचा गुणधर्म आहे की आलेली वस्तू फेकून देणे, हे त्याचं कामच आहे आणि म्हणून आरसा नको, कारण आरसा खूप निगेटिव्ह आहे.

५) आरशाला भारतीय वास्तुशास्त्रात प्रवेश नाही.

# मुलांच्या प्रगतीसाठी अंमलात आणा या वास्तू टिप्स...

- ★ पडद्याचा रंग भिंतीच्या रंगापेक्षा गडद असायला हवा.
- ★ मुलांचा पलंग उंच नसला पाहिजे आणि झोपताना त्यांचे डोके पूर्व दिशेकडे आणि पाय पश्चिमेकडे असावेत.
- ★ पलंगाच्या उत्तर दिशेकडे टेबल-खुर्ची असावी.
- ★ अभ्यास करताना मुलांचे तोंड पूर्वेकडे आणि पाठ पश्चिमेकडे असले पाहिजे.
- ★ पलंगाच्या दक्षिण दिशेकडे आग्नेय कोनात कॉम्प्युटर ठेवला पाहिजे.
- ★ खोलीचे दार पूर्वेकडे असल्यास पलंग उत्तर-दक्षिण या दिशेत ठेवायला पाहिजे. आणि डोकं दक्षिणेकडे तर पाय उत्तरेकडे असले पाहिजे. अशात कॉम्प्युटर टेबलाजवळच स्टडी टेबल असावं.
- ★ नैर्ऋत्य कोनात मुलांच्या पुस्तकांची व कपड्यांची अलमारी ठेवली पाहिजे.
- ★ मुलांच्या खोलीत सूर्यप्रकाश पर्याप्त येत असल्याची काळजी घ्यावी.
- ★ मुलांच्या खोलीत हिंसक किंवा बटबटीत चित्र लावू नये.
- ★ मुलांच्या खोलीत नैसर्गिक सौंदर्य, पाळीव जनावर किंवा महापुरुषांचे चित्र लावले पाहिजे.
- ★ मुलं लहान असल्यास कार्टून आणि मोठा असल्यास त्याला ज्यात करिअर करायचे आहेत त्यात यशस्वी झालेल्या व्यक्तींचे चित्रे लावणे उत्तम.
- ★ मुलांच्या खोलीतील कोणतीही खिडकी घराच्या इतर खोलीच्या बाजूला उघडणारी नको. याने ते घरातल्या हालचालीने डिस्टर्ब होतात.
- ★ घराची उत्तर दिशा बंद असेल तर कर्ज-बाजारी होण्याचे प्रमाण वाढते आणि घरातील आर्थिक समस्या वाढतात.
- ★ नवीन घर घेताना वास्तुशास्त्रानुसार घर आहे की नाही हे पाहून घर विकत घ्यावे म्हणजे घरामध्ये सुख-समृद्धी आणि उत्तम आरोग्य राहते.
- ★ नवीन घर घेताना घराचा दरवाजा उत्तर किंवा पूर्व दिशेला असावा म्हणजे घराच्या दरवाजातून बाहेर बघताना उत्तर किंवा पूर्व दिशा असावी.
- ★ नवीन घर घेताना दक्षिण, पश्चिम, नैर्ऋत्य आणि आग्नेय या दिशांतून येणारे दरवाजे टाळावेत.
- ★ भाग्योदयासाठी घराच्या हॉलमध्ये बांबू-ट्री म्हणजेच लकी ट्री ठेवावा.
- ★ घरामध्ये नकारात्मक शक्ती प्रवेश करू नये आणि घरामध्ये शुभ ऊर्जा भक्कम रहावी यासाठी मुख्य दरवाजाला लाकडी उंबरा बसविणे महत्त्वाचे आहे.

With best compliments from

MORNA CONSTRUCTION

With best compliment from

*Nitin Gaikwad*




With best
compliment from
Hubtown Ltd

# हिंदुत्व आणि सावरकर

गिरीजा पागनीस

गेल्या कित्येक दिवसात वरील विषयांची चर्चा समाज माध्यमे, राजकारणी (हेतूपुरस्कर) सामाजिक कार्यकर्ते या सर्वांची चढाओढ लागलेली दिसते हे सर्व बोलताना, वागताना त्या बिचाऱ्या सावरकरांच्या निष्ठेची, राष्ट्रप्रेमा बद्दलची नखा एवढी तरी सर कोणाला आहे का? त्यांची जिद्द, त्यांची सहनशक्ती त्यांची निष्ठा व देशप्रेम आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे सडेतोड विचार मांडण्याची वृत्ती त्याला तोड नाही.

सावरकरांनी १९२३ साली अनेक 'हिंदुत्व' हा ग्रंथ लिहिला त्यावर अनेक विद्वानांनी टीकेची बरी-वाईट झोड उठवली. टिका तर पाहिजेत याबद्दल वाद नाही. यात विचार करण्यासाठी गोष्ट अशी की, खुद्द सावरकरांनी त्या ग्रंथात दोन प्रातिनिधिक मुद्दे मांडले आहेत ते असे संस्कृती म्हणजे काय? असा प्रश्न उपस्थित करून सावरकरांनी म्हटले आहे की, राष्ट्राच्या संस्कृतीचा म्हणजे त्यांच्या विचारांचा, आचारांचा व संपादितांचा विचार होय. वाडमय आणि कला या वरून राष्ट्राचे वैचारिक उंची कळते. इतिहास आणि सामाजिक चालीरीती यांच्या योग्य विचारांची व साध्य केलेल्या दिग्विजय आधी पराक्रमाची माहिती मिळते. या साऱ्यामधून माणूस म्हणून कोणी वेगळा राहत नाही यातूनच समग्र संस्कृतीचे विश्लेषण पाहायला मिळते.

स्व. सावरकरांनी हिंदु राष्ट्राच्या संकल्पनेची मांडणी या ग्रंथात केली. त्यांच्या व्याख्येप्रमाणे उत्तरेस सिंधू नदीपासून दक्षिणेस सिंधूसागरापर्यंत हिंदुस्थानची भूमी पितृभूमी आणि पुण्यभूमी आहे ती व्यक्ती हिंदू राष्ट्राचे नागरिक होऊ शकते याचे पितृभू व पुण्यभू दोन शब्द महत्त्वाचे आहेत. ते असे म्हणजे त्यांनी शब्दाचे स्पष्टीकरण त्यांनी असे केले की, ज्यांचे पूर्वज या भूमीत विलीन झाले त्यांच्या वारसांना या पैतृक हक्काने वारसा प्राप्त होतो म्हणून ते त्यांची पितृ भूमी होऊ शकते.

**धर्म, धार्मिक, परंपरा, सणवार, चालीरीती, संस्कृती हे सर्व या भूमीत जन्मलेल्या ठाऊक असते असे नव्हे. अंगी बाणलेली मुरलेली असतात या निकषांवर ख्रिश्चन, मुस्लीम, पारशी आपोआपच बाहेर फेकले जातात असे त्यांचे म्हणणे आहे.**

धर्म, धार्मिक, परंपरा, सणवार, चालीरीती, संस्कृती हे सर्व या भूमीत जन्मलेल्या ठाऊक असते असे नव्हे. अंगी बाणलेली मुरलेली असतात या निकषांवर ख्रिश्चन, मुस्लीम, पारशी आपोआपच बाहेर फेकले जातात असे त्यांचे म्हणणे आहे. हिंदू विरोधकांचा आक्षेप असणार यात वाद नाही.

सावरकरांच्या या हिंदू ग्रंथात हिंदू संस्कृतीचे उल्लेख अनेक ठिकाणी आहेत. हिंदू समाज हा एक एकात्म असा नव्हताच. गुलामगिरी तर त्या समाजाला भोवलेलीच आहे. अन्याय, शोषण, गुलामगिरी तर या संस्कृतीची ठासून भरलेली आहेत.

परंतु त्यांनी माझी जन्मठेप या चारित्रापर ग्रंथात नमूद केलेल्या वर्णनावरून त्यांची उपरोक्त विधानातून त्यांच्या झालेल्या हाल-अपेष्टा कळते. दहशतवाद्यांना

मदत (ब्रिटिशांच्या मते) ब्रिटिशांच्या कैदेतून पळून जाणे आणि भारतात बेकायदा शस्त्रे आरोपावरून सावरकरांना अंदमानला डांबून ठेवण्यात आले. ७ एप्रिल १९११ रोजी सावरकरांचा अंदमानच्या तुरुंगात डांबण्यात आले अतिशय जड साखळदंडाने बांधून ठेवण्यात आले. ते शरीराने कुशक्त होते. घाण्याचा बैल जुंपून गोल गोल फिरून त्याच्या कडून तेल काढून घेतले जाई. जनावरांप्रमाणे नांगराला जुंपून भयानक हवामानात प्रचंड कष्टाचे काम करून घेतले जाई. खाणं पिणं व इतर सोयीची तर खूपच वाईट व भयप्रद परिस्थिती होती. असे भोग, अशा नरक यातना शिक्षा भोगायला तेवढीच कणखर मनोवृत्ती लागते जेवढी बोटीच्या टॉयलेट मध्ये शिरून संपूर्ण हिंदी महासागर पोहून भारताच्या किनाऱ्याला लागायला पण तेवढीच जहाल व कणकर मनोवृत्ती लागते. अशा भारत मातेच्या सुपुत्राला सदस्य सादर प्रणाम. . .

# वास्तूतील विज्ञान आणि सौंदर्य

**- प्राची कौशिडीकर**

स्वतःचे घर म्हणजे प्रत्येकाचे स्वप्नच. आजकाल फक्त घर घेऊन भागात नाही, तर घरात आपल्या आवश्यकतेनुसार सर्व सुखसोई करून घेणे व सुशोभित करणे म्हणजेच इंटेरिअर डिझाइन केल्याशिवाय या स्वप्न पूर्ण होऊ शकत नाही. इंटेरिअर डिझाइन म्हणजे खूप खर्चिक, चकचकीत भरगच्चपणे घर सजवणे असे मुळीच नाही. घरात राहणाऱ्यांच्या दृष्टींने सोईस्कर व सकारात्मकपणे घराचा कानाकोपरा वापरता यावा आणि घर सर्वगुण संपन्न अश्या कलात्मकरित्या सजवलं जावं असा उद्देश इंटेरिअर डिझाइनरचा असतो, तो एका रुक्ष स्ट्रॅकचर चे रुपांतर सुंदर घरामध्ये करतो, क्लायंट बरोबर काम करतांना तो स्वतःचे स्वप्न त्याच्या कामाद्वारे सत्यात उतरवत असतो, मूलभूत डिझाईन तत्वांचा वापर करून विविध रंग, आकार , पॅटर्न आणि टेक्सचर यांचा योग्य समतोल राखत प्रमाणबद्ध डिझाइन तयार करतो. त्यामुळे संपूर्ण घराचे परिवर्तन एका सुंदर कलाकृती तयार मध्ये होते. आजकाल इंटेरिअरच्या नवनवीन ट्रेंड्सनुसार विविध स्टाईल्स बघायला मिळतात. जसे कंटेम्पररी, ट्रॅडिशनल. मॉडर्न, रिजनल, इंडस्ट्रियल, मिनिमलिस्टिक इत्यादि...

कोणत्याही प्रकारची स्टाईल निवडताना आपल्या वैयक्तिक जिवनशैलीला व व्यक्तिमत्वाला अनुरूप आहे का हयाचा विचार करणे आवश्यक आहे. हीच थीम फ्लोरिंग पासून ते सिलिंग पर्यंत प्रत्यके ठिकाणी वापरावी लागते, आपण निवड केलेली स्टाईल किंवा थीम कुठलीही असो आपले इंटेरिअर जितके दिसायला सुंदर आहे तितकेच राहण्यास व वापरण्यास पर्याप्त असावे.


mynet
MYBHARATNET.COM
TRULY FTTH NETWORK
India's First Hyperband Network
With Ultrafast Internet Connectivity
GPON
Infinite Connectivity
Router Free
Power Of 1 Gbps
Truly Unlimited Data
Unlimited Entertainment
500 Mbps
30 Days Trial Free
Wifi Router Free | Installation Free**
Call us or
Whatsapp us on 9892812345
A Tintech Online Private Limited Product

With Best Compliments from

# SHIVSAI CONSTRUCTION



# रंगातले रंग

**विश्वनाथ शिरढोणकर**

व्यासपीठावरून वक्ता बोलत होते. अचानक ते बोलता बोलता थांबले. सगळ्यात मागच्या रांगेवर त्यांनी कटाक्षाने बघितले. एक क्षण बोलणे थांबविले. विषय बदलत ते म्हणाले, “मला असं वाटतं शेवटच्या रांगेत बसलेल्या चौघांनी माझं बोलणं शांतपणे ऐकल तर बरं होईल. इतरांनाही त्रास होणार नाही. शेवटी आपण सेवानिवृत्तीनंतर येणाऱ्या समस्यांवर चर्चा करीत आहोत. आणि ते सर्वांच्याच कल्याणासाठी आहे.”

ते चौघे चपापले. नंतर हसले व मान हलवून शांत बसण्याची खात्री दिली. वक्ता पुन्हा विषयावर बोलू लागले. पण त्या चौघांचे चाळे मात्र सुरूच होते. ही उनाड म्हाताऱ्यांची चौकडी बऱ्याच वर्षांनंतर एकत्र सोबत आली होती. जिवलग मित्रांची ही उनाड चौकडी वेगवेगळ्या शहरातून, आपापल्या सेवानिवृत्तीनंतर फक्त एक दुसऱ्याच्या भेटीसाठीच या संमेलनात आलेली होती.

“मी म्हणत नव्हतो गप्प बैस.” त्यातला चिंटू म्हणाला. चिंटू म्हणजे गणेश शंकर अय्यर मद्रासी.

“मी नाही. हा वाहियात अली हसला जोराने.” रामू म्हणाला, रामू म्हणजे रमाशंकर अवस्थी.

“पुन्हा वाहियात अली ?” वाहिद अलीने रामूच्या पाठीवर हलकासा एक धपाटा दिला, “माझं नाव वाहिद अली आहे. सर्वांसमोर वाहियात अली म्हणायचे नाही.

**चाळीस वर्षापेक्षाही जास्त मैत्री बाळगलेले चौघे या संमेलनात एकत्र झाले होते. वाहिद अलीने परत एकदा विचारले, ‘अरे बाबा, कशी प्रकृती आहे तुझी? बरी आहे ना ? औषधपाणी नियमाने घेतोस ना ? ”**

“वाहिद अली रागाने म्हणाला.” म्हणजे एकट्यात म्हणायचं ? रामू हसत म्हणाला.

“लाज नाही वाटत वाहियात अली म्हणायला ?” वाहिद अली आता चिडला, “आपण सगळे आता म्हातारे झालो आहोत.”

“सगळे नाही. तुम्ही तिघं. मी अजून ही सरदार आहे. सरदार अमरीकसिंह. सरदार कधीच म्हातारा होत नसतो समजलं सरदार अमरीकसिंह म्हणाला. “होय तेव्हाच पन्नाशीनंतर मुल झालं” चिंटू म्हणाला. पुन्हा सर्व हसले.”

व्यासपीठावरून वक्त्याने एकदा पुन्हा या चौघांकडे रागाने बघितले. वाहिद अलीने चिंटूच्या मांडीवर चापटी मारली, “गप्प बैस. तो आपल्याकडेच बघत आहे. काय बोलायचं आहे, नक्की तेच विसरेल तो. गप्प बैस!”

तेव्हढ्यात हॉलमध्ये टाळ्यांचा गडगडाट झाला. हे पाहून अमरीकसिंह देखील टाळ्या वाजवू लागला. बाकी तिघं समजून घेण्याचा प्रयत्न करीत होते. अमरीकसिंहला टाळ्या वाजविताना बघून चिंटू म्हणाला, “आता पुरे कर. सगळे थांबले टाळ्या वाजविण्याचे. हीच... हीच सवय अजून तुझी गेलेली नाही.”

“ कोणती ?” अमरीकसिंह ने विचारले.

“जेव्हा तुला कधी काही समजत नाही तेव्हा तू

टाळ्या वाजवितो ”

अमरीकसिंह ओशाळला.

“आता मी सांगितल्या शिवाय टाळ्या वाजवयाच्या नाही.” चिंटूने जणू ताकीदच केली. परत एकदा सर्व हसले.

“चहा घ्यायचा का ? याचं भाषण फार कंटाळवाणं होत चाललंय. ” अमरीकसिंह म्हणाला.

“ओ. के.” चिंटू म्हणाला, “नाही तरी तुला याचं भाषण समजणारच नाही, मग चहाच घेतलेला बरा.” एक एक करत सर्व म्हातारे उठले व जवळच असलेल्या एका रेस्टारेंटमध्ये येऊन बसले.



“काय रामू, कशी काय प्रकृती आहे तुझी आता ?” वाहिद अलीने विचारले.

सर्व मित्र गंभीर झाले. रमाशंकर अवस्थीची बायको कन्सरने त्याच्या लग्नाच्या दहा वर्षांनतरच वारली होती. एक मुलगी होती. मुलीसाठी रमाशंकर अवस्थीने दुसरं लग्न केलं नाही. पण आता मुलीचे लग्न झाले व ती अमेरिकेतच स्थायी झाली. आता या ६५ वर्षाच्या वयात इथं हा एकटाच आहे. त्यात मधुमेह व ब्लडप्रेशरने पछाडलेला. एकदा बायपास ऑपरेशन झालेलं अशक्तपणामुळे कंटाळलेला. स्वतःच्या प्रकृतीकडे बघता रमाशंकर अवस्थीनेच सर्व मित्रांना एकदा भेटून घ्या, म्हणून फोन करून आग्रहाने या संमेलनात बोलावून घेतले होते. म्हणूच चाळीस वर्षांपेक्षाही जास्त मैत्री बाळगलेले चौघे या संमेलनात एकत्र झाले होते. वाहिद अलीने परत एकदा विचारले , “अरे बाबा , कशी प्रकृती आहे तुझी ? बरी आहे ना ? औषधपाणी नियमाने घेतोस ना ?”

“कशी असणार बाबा ?” रामूने उलट वाहिद अलीलाच प्रश्न केला, एकट्याचा संसार. मुलगी सारखी अमेरिकेला बोलावतेय. पण त्या परक्या देशात आपलं कोणी ओळखीचंच नसणार. मग काय करणार तिथं ? अरे, आपण भले, आपला देश भला. मेल्यावर इथं तुम्हा मित्रांचा खांदा तरी मिळेल, तिथं मिळणार आहे का ?

“होय ” चिंटू म्हणाला, इंटरनेटने पाठवू. काळजी करू नको. परत चौघं जोराने हसले.

आता तू इथून परत बँगलोरला जायचं नाही, आणि तिथं एकटं राहण्याची देखील गरज नाही. माझ्यासोबत चल, तिथं माझ्या घरी राहा, चिंटू म्हणाला.

काय करेल रे हा तुझ्याकडे एकटा येऊन. नुसता कबाब मे हड्डी. तुमचा दोघांचा राजाराणीचा संसार. या म्हाताऱ्याला दत्तक घेणार आहात का ? अमरीकसिंह म्हणाला. पुन्हा सर्व जोराने हसले.

गणेश शंकर अय्यर हसता हसता थांबला. त्याचा चेहरा आता गंभीर झाला होता. तो म्हणाला, माझं जाऊ दे रे, पण बायको फार आटापिटा करते. मुल नाही म्हणून तिची मनःस्थिती फार खराब झालेली आहे. या वयात तिला सांभाळता सांभाळता मला स्वतःलाच फार अस्वस्थता वाटते. सर्व कसं सांभाळावं काही कळत नाही. आता या वयात बायकोच्या हट्टापायी किंवा तिच्या समजुतीखातीर म्हणा, मुलही दत्तक घेता येत नाही. आता मुल दत्तक घेण्यासाठी फार उशीर झालेला आह. आमचं ही आता कितीस असं आयुष्य उरलं आहे ? मग त्या मुलाचं काय होणार ? काय करू काहीच समजत

नाही. घर आहे, पैसा आहे, पण काय करणार पैश्याचं? सगळ व्यर्थ चिंटूचे डोळे पाणावले.

"ए चिंटू. . . मला. . क्षमा कर. . . " अमरीकसिंह म्हणाला, "मला असं म्हणायचं नव्हत. तुला दुःखवायचं नव्हत रे." सरदार अमरीकसिंह ही आता गंभीर झाला. सारखा दाढीवरून हात फिरवीत होता. काय बोलावं, हे कोणालाही काही कळत नव्हतं. रामूचं एकट्याच दुःख होतं आता चिंटूच्या निपुत्रिक असण्याची वेदना सर्व मित्रांना जाणवत होती. थोड्यावेळ वातावरण असेच गंभीर होते. मग चिंटूच अचानक बोलला, "आश्चर्य आहे... फारच आश्चर्य."

सर्वांनी एका स्वरात विचारले, "काय...?"

"आपला अमरीकसिंह देखील गंभीरतेने विचार करू शकतो." एकदा परत हे सर्व उनाड म्हातारे जोराने हसले. सरदार अमरीकसिंहचे दाढीवर हात फिरवणे केव्हाच थांबले होते.



"नाही पण खरंच तू आता एकटा राहू नको" चिंटू म्हणाला, "तुला आठवतंय का नोकरी मिळाल्यावर आपण दोघांनी भाड्याने एकत्र एकच खोली घेतली होती. दोघे मिळून स्वयंपाक करायचे. खूप सिनेमे पाहायचे. खूप धमाल करायचे. किती चांगले दिवस होते ते."

रामू त्या जुन्या आठवणीत रमला, "होय. किती बेफ्रिकी होती. तुला आठवतंय माझं ते आजारपण." आठवतंय न. चिंटू म्हणाला, तू तापाने फणफणत होता. सारखं 'आई आई' म्हणून बरळत होता. चार दिवस रजा घेऊन मीचतर तुझं सगळं केलं होतं, आणि तू होता की घरचे घाबरतील आणि नोकरी सोडायला लावतील म्हणून घरी कळवायला मला सारखा नाही म्हणत होता. शेवटी चार दिवसांनी मीच तुला तुझ्या घरी नेऊन सोडलं होतं. काळजी करू नको. आताही करेन रे मी तुझं. माझी बायको देखील तशी प्रेमळच आहे, सांभाळेल आम्हा दोघा म्हाताऱ्या मुलांना.

दोघांनाच कशाला? तिघांना. वाहिद अली मधेच बोलला, अरे, मी पण एकटाच आहे ना ? मग मी पण येतो ?

"ए वाहियात अली, तू कशाला हवा मधे?" सरदार अमरीकसिंह ने विचारले.

"पुन्हा वाहियात अली?" वाहिद अली रागाने म्हणाला, "माझं नाव वाहिद अली आहे. अरे गेल्या चाळीस वर्षांपासून बोंबलतोय की माझं नाव वाहिद अली आहे. तूचं माझं नाव सर्वांमध्ये बिघडवून ठेवलं आहे. सोडणार नाही तुला."

"आता या वयात काय करणार ? फार तर तूही माझं नाव बिघडवून टाक. यापेक्षा माझं बारसंच करून टाक एकदा." सरदार अमरीकसिंह म्हणाला. सर्व जोराने हसले.

"असू दे रे... रागवू नको" सरदार अमरीकसिंह हसत म्हणाला, " पण मला सांग तू या चिंटूकडे जाऊन काय करणार? तुझी मुलगी आहे ना तुझ्यासोबत? मग?"

वाहिद अलीचा विषय निघताच सर्व गंभीर झाले. वाहिद अलीचा चेहरा उदास झाला.

"अल्लाने नशिबात काय लिहून ठेवले आहे काय

ठाऊक ?" वाहिद अली म्हणाला. "का. . . रे. . काय झालं ?" रामूने विचारले.

"तुम्हा सर्वांना माहीतच आहे की माझ्या बायकोने म्हणजे वहिदाने स्वतःला जाळून घेऊन आत्महत्या केली होती. आमच्या दोघांमध्ये सतत वादाचे कारण म्हणजे माझं माझ्या भावाबहिणीवर जास्त प्रेम असणं, आणि प्रत्येक बाबतीत अम्मी व अब्बूनां महत्व देणे तिला आवडत नव्हते. अब्बूची एक छोटीशी सायकल दुरुस्तीची दुकान होती. म्हणून अब्बू फार हलाखीत जगत होते. अम्मी सतत आजारी असायची. आम्हा सर्वांना वाढविण्यात, आणि अम्मीच्या आजारपणात अब्बू कर्जबाजारी झाले होते. मला नोकरी मिळाल्यावर माझ्याकडून त्यांना अपेक्षा असणे स्वाभाविक होते. पण वहिदाला अब्बूना मी पैश्यांची मदत करणे मुळीच आवडत नव्हते. शिवाय धाकट्या भावांचे व बहिणींचे शिक्षण नीट व्हावे ही माझी इच्छा होती. बहिणीचा निकाह देखील व्हायचा होता. म्हणून वाद खूप व्हायचे. असाच एकदा वाद वाढला, आणि मी नसताना संतापाच्या भरात वहिदाने स्टोव्हने स्वतःला पेटवून घेतले. सर्व नातेवाईकांनी आम्हालाच दोषी ठरविले. हुंड्यासाठी बायकोचा बळी घेतला, हे लांच्छन सुद्धा मला सहन करावे लागले. त्या दिवसांमध्ये आम्हां सर्वांचं जगणं कठीण झालेलं होतं. या गोष्टीला आता तीस वर्षं झाली. अब्बूनी माझ्या दुसऱ्या निकाहासाठी फार आग्रह केला. बरीच स्थळं देखील आली. अब्बू सारखे म्हणायचे, ' आपल्या धर्मात चार निकाह होऊ शकतात. तुझा तर अजून एकच निकाह झाला आहे. ' पण दर वेळेस मीच नकार दिला. वहिदावर माझं खूप प्रेम होतं. आज इतक्या वर्षांनंतरसुद्धा तिचा चेहरा माझ्या डोळ्यांसमोरून जात नाही. वाहिद अली सांगत होता आणि मित्रांच्या काळजावर वेदनांचे ठोके पडत होते.



"जाऊ दे रे. . ." रामू म्हणाला, "नशिबात जे भोग असतात ते भोग भोगावेच लागतात. पण आता त्याचं काय ? तुझी मुलगी आहे ना, तिच्याकडे बघ. नव्या हुरूपाने जगण्याचे सगळेच मार्ग सापडतील. काळजी करू नको."

"आता तेच तर दुःख आहे." वाहिद अली म्हणाला, "वहिदाच्या आत्महत्येनंतर शहरात व समाजात आम्हाला तोंड दाखवायला जागा नव्हती. वहिदा गेली तेव्हा झीनत चार वर्षांची होती. वहिदाचीच नव्हे तर झीनत ही घरात सर्वांचीच लाडकी होती. वहिदा नेहमी म्हणायची की तिची इच्छा झीनतला खूप शिकविण्याची आहे. खूप शिकली झीनत. आता चौतीस वर्षांची आहे. पण झीनतचा अद्याप निकाह झालेला नाही."

"पण का ?" रामूने विचारले.

"तशी शिक्षणात खूप हुशारच होती झीनत" वाहिद अली सांगू लागला, "मदरस्यात शिकताना सर्व विषयात वर्गात नेहमीच ती पुढे असायची. मी तर झीनतला अम्मी-अब्बूजवळ सोडून नोकरीमुळे सतत फिरतीवरच असायच. अम्मी-अब्बू देखील तिची खूप काळजी घेत असे. पुढे सहावीत तिची शाळा बदलली आणि तिनं ऐच्छिक म्हणून संस्कृत हा विषय घेतला आणि तिला संस्कृत या विषयाची गोडी लागली. सुरवातीला आम्ही बालहट्ट म्हणून मान्य केला. अब्बू देखील तिचं खूप कौतुक करायचे. अम्मी मात्र तिला संस्कृत शिकण्यासाठी रागे भरायची. पण अम्मीला ती पाक

कुराणच्या आयतं वाचून दाखवायची आणि अम्मीचे मन जिंकायची. पुढे हळूहळू आमच्या धर्माच्या लोकांनी झीनतच्या संस्कृत शिकण्याचा विरोध करणं सुरु केला. पण यामुळे तिची संस्कृत भाषा शिकण्याची जिद्द आणखीन वाढत गेली. पुढे तिनं संस्कृत भाषेत एम. ए. आणि नंतर पी. एच. डी ची उपाधी देखील मिळविली. ”

“पण यात वाईट काय ? हे तर फार उत्तमच आहे” चिंटू म्हणाला.

“वाईट काहीच नाही. पण आमच्या समाजात संस्कृत शिकणे आणि शिकविणे हे पचण्यासारखे तर नाहीच पण याचा फार तीव्र विरोध देखील होतो. आणि माझ्या बायकोच्या आत्महत्येचे कारण सांगून या गोष्टीचा वचपा आमचे सर्व नातेवाईक आम्हाला सतत टोमणे मारून घेत होते. सतत होणाऱ्या या अपमानाकडे दुर्लक्ष करत, फार कठोर परिश्रमाने आणि तिच्या जिद्दीने झीनतने एका कॉलेजात संस्कृत शिकविण्याची नोकरी मिळविली आणि फार लवकरच प्रोफेसरही झाली. संस्कृतमधून उर्दू भाषेत तिचे अनेक अनुवाद देखील प्रसिद्ध झाले. दोनदा जर्मनीला संस्कृत भाषेच्या संमेलनात देखील होऊन आलेली आहे.”

“ हे तर सर्व चांगलंच आहे”.

“हो पण आमच्या समाजाने अजून झीनतचा विरोध करणे सोडलं नाही. आम्हाला एक प्रकारे वाळीतच टाकलेले आहे. आणि म्हणून याच संस्कृत भाषेमुळे माझ्या झीनतचा अद्याप निकाह झालेला नाही” वाहिद अली सांगत होता.

“काय ?” सर्वांना आश्चर्याचा धक्का बसला.

“सुरवातीला म्हणे माझ्या बायकोने आत्महत्या केली म्हणून अशा घरात संबंध करायचे नाही म्हणून झीनतसाठी स्थळ आले नाही. नंतर तिच्या संस्कृत भाषेचा नाद जगजाहीर झाल्यामुळे तिला चांगले स्थळच येणे बंद झाले. आमच्या समाजात शिक्षण कमी आणि शिकलेली मुलं देखील कमी. अशा परिस्थितीत माझ्या उच्च शिक्षति मुलील कोणाच्याही गळ्यात मी कसा काय बंधू शकणार होतो ?” वाहिद अली सांगत होता आणि सर्व मित्र उत्सुकतेने ऐकत होते.

“कॉलेजमध्ये शिकत असताना तिच्याच वर्गातल्या संस्कृत शिकणाऱ्या एका सनातनी कर्मकांडी हिंदू ब्राह्मण मुलाच्या प्रेमात ती पडली. त्याही मुलाचे हिच्यावर जिवापाड प्रेम होते. दोघेही एक दुसऱ्याच्या सोबत जगण्या-मरण्याच्या शपथा घेऊन बसले. जे आमचे संबंधी वहिदाच्या आत्महत्या केल्याने आम्हाला समाजातून उपेक्षति करून चुकले होते, तेच परत येऊन आम्हाला धमक्या देऊ लागले. झीनतचा निकाह हिंदू मुलाशी होऊ देणार नाही असं उघड उघड आव्हान देऊ लागले.

झीनतचे आणि आमच्या सर्वांचे जगणे कठीण झाले. अब्बू-अम्मीला सर्व सोसावे लागत होते. अब्बूनी झीनतला समजाविले, ‘आपल्या धर्मात हिंदू मुलीशी लग्न करता येते. पण मुस्लिम मुलींना हिंदू मुलांशी लग्न करता येत नाही. आपण साधी माणसं. समाजबाहेर नाही जाता येत “पण झीनत अडून बसली. शेवटी अब्बूनी एक कठोर निर्णय घेतला व झीनतला सांगितले, “निकाह करायचा तर आपल्याच धर्मात” यात वयात आलेली ती पोर जिद्दी होती. तिनं देखील अब्बूनां स्पष्ट सांगितलं, “माझ्यासारखा पदवीधर संस्कृत भाषेचा विद्वान मिळाला तरच मी आपल्या धर्मात निकाह करेन ”

अब्बूनी लहानपणापासून झीनतला सांभाळले होते. मी तर नोकरीपायी सतत बाहेरच असायचा. अब्बू-अम्मीचा फार जीव होता झीनतवर. झीनतला देखील माझ्यापेक्षा त्यांचाच जास्त आधार व लळा होता. आता अम्मी नाही, अब्बू पण नाही. दुर्दैव म्हणजे झीनतही मला, तिच्या आईच्या आत्महत्येचे कारण मानते. मी सतत बाहेर असल्याने आमच्यात तो ओढा आणि आपुलकी निर्मित होऊ शकली नव्हती. आता तर ती माझ्याशी घृणा देखील करू लागली आहे. आम्ही बरोबर राहतो पण आमच्यात

संवाद फार कमीच होतो. झीनतची वाट बघून पुढे त्या मुलानेही लग्न करून घेतले. झीनत एकटी पडली व खचली. तिनं स्वतःला संस्कृत भाषेच्या शोध कार्यात वाहून घेतले. झीनतला कोण समजवणार ? सर्व कसं विस्कळीत होऊन बसलं आहे. शेवटी झीनतने आणि मी कुणासाठी जगावं ? "वाहिद अलीच्या डोळ्यातून फक्त दोनच थेंब गळून गालावर आले. "

रामूने वाहिद अलीच्या खांद्यावर हात ठेवत त्याला धीर दिला , "जाऊ दे. . रे. आता या वयात रडायचं नाही. आणि आणि दुसऱ्यांनाही रडू द्यायचं नाही. होईल सगळं व्यवस्थित. उशिरा का होईना, झीनतला बापाच्या प्रेमाची प्रचिती एक दिवस नक्की होईल. त्या क्षणाची वाट पाहण्या खेरीज आपल्या हातात काहीच नाही." स्वतःच्या मुलीच्या आठवणीने रामूचेही डोळे पाणावले.

थोड्यावेळ निस्तब्ध शांतता होती. काय बोलावे हे कुणालाही सुचत नव्हते. मग चिंटूचं उठून उभा राहिला, "ए. . . चला. . . बराच वेळ झाला आहे. तिथं सर्व जेवण संपायचं"

सर्व उठून हळूहळू बाहेर आले.

संमेलनात, भोजनानंतरच्या सभेत हे चौघे उनाड म्हातारे परत शेवटच्या रांगेत बसलेले थट्टा मस्करी करत होते. चिंटू, सरदार अमरीकसिंहला जणू धमकावतच होता, "मी सांगितल्या शिवाय टाळ्या वाजवायच्या नाही "

# औषधे

**१) औषधं आपल्या घरातील अविभाज्य भाग झाला आहे. आपण औषधं जवळ घेऊन झोपतो.**

**२) जी गोष्ट आपल्याजवळ नको तीच आपण जिकडे तिकडे घेऊन बाळगतो.**

**३) आपल्या घरातील साधा बाम व विक्सचा पण display कमी करायचा आहे.**

**४) औषधं ही पॅक बंद box मध्येच हवी. बाहेरून दिसली नाही पाहिजे. कपाटाच्या आत box मध्ये ठेवावीत.**

**५) औषधांचा box संपूर्ण घराच्या पश्चिमेला ठेवा किंवा संपूर्ण घराच्या पूर्व दिशेला ठेवला गेला पाहिजे.**

**६) पूर्व व पश्चिम दिशा नाही मिळाली तर दक्षिण, आग्नेय व वायव्य ह्या तीन दिशांपैकी कुठेही ठेवू शकता.**

**७) चुकूनही नैर्ऋत्य व ईशान्येला औषधे कधीच ठेवू नका. खूपच negative आहे. उत्तरेला पण नकोच.**

**८) योग्य जागी औषधे ठेवली तर त्याचा परिणाम चांगला होतो. आपली बचत चांगली राहते.**

**९) जी health tonic वापरतो, ते म्हणजे च्यवनप्राश यासारखी शक्ती देणारी tonic त्यांचा display करायचा आहे.**






With best compliments from

HARSH Construction

Pvt. Ltd

With best
compliment from

Jai kedar

With Best Compliments from

इंडियान्युजनेट डॉट कॉम
Indianewsnet.com
The News Portal In Cyber World

Chief Editor : Dr. Vilas Pawar

NEWS PORTAL

Marathi & English

# दर्शन

**पांडुरंग महादेव जाधव**

पंढरी शेताच्या बांधावर चिंतातूर बसला होता. 'समोर तरारून आलेलं शेत, लावणी वेळेत उरकली पाहिजे तरच उपयोग होईल नाहीतर हे पाचूसारखं आवण काही कामाचं उरणार नाही. पण बापाला दिलेलं वचनही पूर्ण करायला हवं. यावर्षी वारीला जायला हवं.' पुंडलिकराव हाडाचे वारकरी, कधी वारी चुकवली नाही. विठुमाऊलीवर अमाप श्रद्धा, सतत विठ्ठल विठ्ठल असा जप चालायचा. पंढरी त्यांचा एकुलता एक मुलगा. त्याचं नाव ठेवतानाही मागचा पुढचा विचार न करता "पंढरीनाथ" असं नाव ठेवलं. पण पंढरी मात्र देव देव करणारा नव्हता. म्हणजे तसा नास्तिक नाही पण देवापेक्षा त्याची भक्ती वडिलांवर जास्त. आई लहानपणीच गेल्यानंतर तर तो पुंडलिकरावांच्या अधिक जवळ आला. शिक्षणापेक्षा शेतावर त्याचं मन रमायचं म्हणून हायस्कूलपर्यंत शिक्षण झाल्यावरही तो शहरात न जाता शेतात रमला. त्यामुळेच पुंडलिकराव दरवर्षी न चुकता नेमाने आषाढी वारी करत होते. पण आता सहा महिन्यांपूर्वी पुंडलिक रावांनी शेवटचं विठ्ठल विठ्ठल म्हटलं आणि लहानश्या आजाराने प्राण सोडले. प्राण सोडता सोडता पंढरीकडून दरवर्षी न चुकता वारीला जायचं वचन घेतलं. आता त्याच वचनापायी पंढरी चिंतातूर आहे. शेत ही लावणीला आलं आहे आणि वारीही तोंडावर म्हणजे उद्याच निघावं लागणार आहे, गडीसुद्धा अंथरुणावर आहे नाहीतर त्याच्यावर भार टाकून जाता आलं असतं वारीला, आणि गावात आता सगळेच आपापल्या कामात त्यामुळे कुणाचीही मदत मागता येणार नाही अशा विमनस्क अवस्थेत पंढरी शेताच्या बांधावर बसला होता.

**वारीला पण जाणं गरजेचं आहे, तसं बाबांना वचन दिलंय. आरं, एवढंच ना मग आम्ही लावून देतो की भात, तू जा निवांत वारीला.**

त्याच्या बायकोने परोपरी समजावलं ही की चार दिवस उशिरा लावणी केली तर बिघडलं कुठे ? पण पंढरी तिला कसं समजावून सांगणार की बाई गं काही गोष्टी ठराविक वेळेतच झाल्या पाहिजेत! दिवस कलायला अजून थोडा अवकाश होता. शेताच्या दिशेने तीन चार माणसं येताना दिसली. तसे सगळे अनोळखी वाटत होते. बांध चढून पंढरीच्या जवळ पोहचल्यावर त्यातील सर्वात वयस्कर माणसाने पंढरीसोबत संवाद साधला, "पंढरीनाथा, झाली की नाही तयारी वारीची ?" पंढरीला आश्चर्य वाटलं, या अनोळखी माणसाला कसं माहिती आपण वारीला चाललोय, त्याने त्या म्हातारबुवांना प्रश्न केला, "माफ करा पण मी आपल्याला ओळखलं नाही. " "अरे पोरा, आम्ही तुझ्या बापाचं दोस्त, एकत्र वारीला जायचो पण तो नाही राहिला आणि आता वयोमानानुसार यावर्षी वारी काय झेपणार नाही, म्हटलं तुला भेटून त्या पंढरीरायाला निरोप देऊ." "बरं बरं, बसा ना" असं म्हणत पंढरीने घोंगडी अंथरली. "का रं पोरा,

वारीला चाललाय आणि चेहरा का असा पडलाय?” त्या म्हातारबुवांनी विचारलं. “काका, अहो लावणी तोंडावर आहे, पाऊस पण चांगला आहे, या चार दिवसांत लावणी उरकली असती तर पिकाला तोटा नाही. पण वारीला पण जाणं गरजेचं आहे, तसं बाबांना वचन दिलंय. आरं ,एवढंच ना मग आम्ही लावून देतो की भात, तू जा निवांत वारीला. म्हातारबुवांनी मंदस्मित करत त्याच्या डोक्यावरून हात फिरवत म्हटले. ‘पण काका, ओळख ना पाळख आणि. . . . पंढरीला कळत नव्हतं मदत घ्यावी की नाही. त्यावर पुन्हा एकदा म्हातारबुवांनी त्याच्या डोक्यावर हात फिरवत मंदस्मित केलं आणि म्हणाले “जा पोरा जा,” खुशाल जाठ पंढरीने नकळत नमस्कार केला, त्याच्या मनावरचा भार हलका झाल्यासारखा वाटत होता.



सकाळी लवकर उठून पंढरी तालुक्याला आला. पंढरपूरला जाणाऱ्या बसचं तिकीट आधीच आरक्षित करून ठेवलं होतं त्यानं. बस वेळेत पंढरपूरकडे निघाली. पायी वारीला जायचं म्हटलं तर बरेच दिवस गेले असते म्हणून पंढरीने हा मार्ग स्वीकारला होता. बसमधून सगळेच वारीसाठीच निघाले होते त्यामुळे वातावरण वारीमय झाले होते. विठ्ठल विठ्ठल, ग्यानबा तुकाराम असा नामघोष चालू होता. दुपारपर्यंत बस घाटमाथा ओलांडून सपाटीच्या रस्त्याला लागली आणि पायी चालत गेलेल्या वारकऱ्यांच्या खुणा दिसू लागल्या. तीन चार मुख्य थांबे घेत बस रात्री उशीरा पंढरपूरात पोहचली. दरम्यानच्या काळात पंढरीची बसमधल्या काही लोकांशी ओळख झाली होती. त्यांच्याबरोबर मुक्कामी राहण्याचा निर्णय घेतला होता त्याने, त्यातील अनुभवी वारकऱ्यांनी राहायला जागा शोधली आणि आपलं बस्तान तिकडे हलवलं, त्यांच्याबरोबर पंढरीही गेला. सकाळी सकाळी लवकर उठून चंद्रभागेत आंघोळ आणि मग दर्शनासाठी रांगेत उभे राहायचे ठरले. उद्याच आषाढी एकादशी !!

झुंजूमुंजू होताच पंढरी उठला, तोवर इतर वारकरी सुद्धा उठले होते. पाऊस नव्हताच. वारकऱ्यांनी चंद्रभागा गाठली. ओलसर वाळूचा स्पर्श पायाला गुदगुल्या करत होता. पंढरी चंद्रभागेच्या पात्रात शिरला. क्षणभर आईच्या कुशीत शिरल्यासारखं वाटलं. आंघोळ आटपून बाहेर आला. एक लहानसा मुलगा गोपीचंदनाचा टिळा लावण्यासाठी त्याच्या समोर आला. गोपीचंदनाचा टिळा लावून घेतला आणि आपल्या प्रवासी सोबत्यांसह दर्शनाच्या रांगेत उभे राहण्यासाठी निघाला. रांग अगदी लांबवर होती, अगदी गोपाळपुरापर्यंत ! आजवर पुंडलिक रावांच्या तोंडून त्याने वारी आणि पंढरपूर बद्दल खूप ऐकलं होतं पण आज स्वतः त्याचा अनुभव घेत होता.

अगदी संध्याकाळी त्याला मंदिरात प्रवेश मिळाला. खूप उत्सुकता होती त्याला आता दर्शनाची !! आपला बाप तहानभूक हरपून ज्याच्या भजनी लागायचा त्याला आज

भेटायचं होतं त्याच्याच पंढरपूरात !! पंढरी 'विठ्ठल विठ्ठल' करत गाभाऱ्यात पोचला. डोळे बंद करून हात जोडले, नमस्कार केला आणि डोळे उघडले पण समोर त्याला विठ्ठलाची मूर्ती दिसली नाही. दोन तीन वेळा त्याने आपले डोळे चोळून पाहिलं तरीही नाही. गर्दीच्या रेट्यामुळे तो गाभाऱ्याबाहेर आला. आपल्या प्रवासी सोबत्यांची वाट पाहत उभा राहिला. सोबती आले, दर्शन झाल्यामुळे सारेच खुश होते पण पंढरी खुश नव्हता. तो आता यंत्रवत त्यांच्या बरोबर चालत होता. त्यानंतर रखुमाईच्या मंदिरात निघाले. तिथेही पंढरीला तसाच अनुभव आला. त्यानंतर तडक सगळे बाजाराकडे आले. कुणी स्टुडिओ मध्ये आठवण म्हणून फोटो काढून घेतले. अबीर, बुक्का, प्रसाद घेतला. पंढरीने बायकोसाठी कंकण, मुलांसाठी खेळणी आणि मिठाई घेतली. दुसरा दिवस चंद्रभागेतून वल्ह्याच्या बोटीतून पुंडलिक मंदिराचं दर्शनही घेतलं. पंढरपुरातील सारी लहान मोठी मंदिरे फिरून झाली आणि आता पंढरी परतीच्या प्रवासाला सज्ज झाला काहीशा दुर्मुखल्या चेहऱ्यानेच !!



रात्रीची बस होती त्याच्या तालुक्याला जायला. दुपारपर्यंत तालुक्याला जायला. दुपारपर्यंत तालुक्याला आणि तिथून पुन्हा बस पकडून आपल्या गावात तो पोहचणार होता. बसमध्ये बसल्यावर त्याच्या डोक्यात एकच विचारचक्र सुरू होतं. "खरंच आपल्याला मूर्ती दिसल्या नाहीत की भास होता." तो गाडीत कुणाशीच बोलला नाही. बाकी मंडळी हरिनामात लीन होती. मात्र पंढरी दुर्मुखलेला. त्याच तंद्रीत त्याला झोप लागली. भल्या पहाटे त्याची झोप चाळवली. तो पुन्हा पुन्हा विचार करू लागला, "आपलं नेमकं काय चुकलं , बाबांना दिलेलं वचन पूर्ण केलं का आपण, आपल्याला देव का दिसला नाही ?" आणि अचानक त्याला काहीतरी प्रचिती झाली. डोळ्यातून चंद्रभागा वाहू लागली. तो वारीला निघाल्यापासूनच्या घटनांचा क्रम लावत होता आणि त्याच प्रयत्नात ही प्रचिती त्याला झाली. आता कधी एकदा आपण आपल्या गावी पोहचतोय असं झालं होतं त्याला.

दुपारी अगदी वेळेत गाडी तालुक्याला पोहचली आणि पंढरीच्या गावात जाणारी गाडीही तासाभरात लागली. पुढचा अजून तासाभराचा प्रवास !! पंढरी अस्वस्थ होता. कधी एकदा गाव गाठतो असं झालं होतं त्याला. गाडी गावात पोचताच तो घराकडे न जाता तडक शेताकडे निघाला. पण त्याला एक चिंता सारखी सतावत होती, आपल्याला जे वाटतंय ते तसंच असेल, खरंच असं घडेल? निव्वळ प्रश्न, प्रश्न आणि प्रश्न होते डोक्यात. धावत पळत तो शेतावर पोचला तेव्हा दिवस सांजेकडे वळू लागला होता. त्याने लांबूनच आपल्या शेताकडे पाहिलं, सबंध शेत अवघ्या तीन दिवसांत लावून झालं होतं. त्याला आश्चर्य वाटलं नाही त्याचं एवढं पण एका एका गोष्टीची खात्री पटत गेली. शेताच्या बांधावर पोचला तेव्हा त्या काकांसमवेत सारी मजूर मंडळी परतण्याची तयारी करत होते. पंढरीला पाहून काका

म्हणाले, “पोरा अगदी वेळेत आलास, कशी झाली वारी ,दर्शन झालं ना! ” “काका, मला तुमच्याशी बोलायचं आहे. मी वारीला निघतो काय, तुम्ही अचानक येता काय, तुमच्या बोलण्याला विरोध न करता मी वारीला जातो आणि तिथे गेल्यावर मला विठ्ठल रखुमाई दिसतच नाही.” पंढरी भरभर बोलत होता. “आर पोरा, तुझं सगळं लक्ष शेतात गुंतलेले म्हणून तुला असा भास झाला असेल, नको वाईट वाटून घेऊ.” काका त्याच्या डोक्यावरून हात फिरवत म्हणाले



आणि जाताना जसं भारावल्यागत झालं होतं तसंच पुन्हा पंढरीला झालं. “चल पोरा, आम्ही निघतो” असं म्हणत काका मजुरांसोबत बांध उतरू लागले. “काका, तुमचं नाव गाव तर सांगा” पंढरी भानावर येत त्यांना ऐकू जाईल एवढया जोरात ओरडला. काका आपले जादुई स्मित करत म्हणाले, “पांडुरंग पंधरपूरवाले !!”

पंढरीने साश्रु नयनांनी पुन्हा एकदा नमस्कार केला, त्याच्या साऱ्या प्रश्नांची उकल आता झाली होती.

## वास्तू टिप्स



१. आरोग्यदायी जीवनासाठी झोपताना पुर्वेला व दक्षिणेला पाय करून झोपु नये . आपण कुठे व कसे झोपतो यावर आपले आरोग्य अवलंबुन असते.
२. उत्तम आरोग्यासाठी उत्तर दिशेला पाय करून झोपावे म्हणजे आर्थिक,मानसिक,शारीरिक प्रगती चांगली होते.
३. आजार बरे होत नसतील तर झोपण्याची जागा बदलून पाहा. म्हणजे आजार लवकरात लवकर बरा होईल.
४. बेड समोर आरसा अथवा आरशाचे कपाट येऊ देऊ नये. त्यामुळे शरीरातील उर्जेची हानी होते व आजार वाढतात.
५. आरोग्यदायी जीवनासाठी बॉक्स बेड वर झोपू नये बॉक्स बेड वर झोपणे म्हणजे आजारांना निमंत्रण देण्यासारखे आहे.
६. घरामध्ये सुख-समृध्दीदायक आयुष्यासाठी फुटलेले आरसे,फुटलेली खेळणी,तुटलेले फर्निचर इ .वस्तु ठेऊ नये .
७. भरपूर प्रगतीसाठी आणि यशदायी गतिमान आयुष्यासाठी बंद पडलेले घडयाळ घरामध्ये ठेऊ नये .
झोपताना घराच्या दक्षिण किंवा पश्चिम दिशेमध्ये बेड असावा म्हणजे आरोग्य आणि ऐश्वर्य चांगले मिळते.

SAFETY FOR ALL
ALL FOR SAFETY

सुरक्षाविषयक कार्य करणारी स्वयंसेवी संस्था

# सुरक्षा अभियान

ट्रस्ट नोंदणी क्र. इ-३९५०

**रस्ता सुरक्षेविषयक कार्य करण्याच्या रस्ता सुरक्षा व अन्य सुरक्षाविषयी बाबत जाणून घ्यायचे असेल व या क्षेत्रात कार्य करायचे असेल तर संपर्क साधावा :**

संस्थापक / अध्यक्ष

**डॉ. विलास ज. पवार**

ऑफिस : एम – ३, पॅराडाईज टॉवर, गोखले रोड, नौपाडा, ठाणे (प.) –४०० ६०२

०२२-२५३६४१४१ / ९८२११६१६६२


With Best Compliments from
A G INFRA PROJECT
शुभ दीपावली

# संवाद

**प्रा. अरुण सु. पाटील**

“अगं, आटोप ना लवकर. काय वेळ काढूपणा चालला आहे तुझा? नऊ वाजलेत. अजून आपला नाश्ता झाला नाही. तुला क्लिनिकला जायचं नाही का? बिचारी चिल्लीपिल्ली तुझी वाट पाहत असतील,” डॉ. दिलीप डायनिगं टेबलवर बसनू पेपर चाळत म्हणाले. “कशाला मागे लागतोस?” रडवेली होत विद्या म्हणाली. ’मला नाही खावंसं वाटत. तू नाश्ता करून घे. कंटाळा आलाय मला. तेवढंच दहा मिनिटं पडते जरा. तुझं झालं की मला हाक मार. मग निघू आपण,”

डॉ. विद्या बेडरूमकडे जात म्हणाली. दिलीपनी नाश्ता आटोपला. पण हाका मारूनही विद्याची चाहूल लागेना. म्हणून ते बेडरूम मध्ये गेले. विद्या सुस्तावून शांतपणे झोपली होती. तिच्या निरागस शांत चेहऱ्याकडे बघून दिलीपला तिची कीव आली. हिला मुलांची किती आवड! अगदी वेडी होते लहान मुलांना बघून. मुलांची आवड म्हणून मुद्दाम तिने पिडिॲट्रिक्स मध्ये एम. डी. केलं. म्हणूनच तर ती क्लिनिक मध्येही मुलांत मनापासून रमते. लग्न होऊन पाच वर्ष झाली. पण, अजून तिची इच्छा काही पूर्ण झाली नाही. १-२ दिवस पाळी चुकली, की लगेच प्रेग्नेंसी टेस्ट करायची. आता तर दोन तीन महिन्यांपासून तेही सोडून दिलं. सगळ्या टेस्ट करून झाल्या. पण आपल्या नशिबातच मूल नसावे, अशी आता तिची पूर्ण खात्री पटली आहे. पण, मला बाळासाठी होणारी तिची तगमग दिसतेच. रात्री तर स्वप्नातही कधी कधी लहान मुलांशी बोलत असते. तिला उठवणं दिलीपच्या अगदी जिवावर आलं होतं. पण हॉस्पिटल मध्ये जाणं आवश्यक असल्याने त्यांनी विद्याला हलवून उठवलं. संध्याकाळी विद्या हॉस्पिटल मधून आठ वाजेपर्यंत घरी परत येई. डॉ. दिलीप मात्र जनरल सर्जन असल्याने त्यांना रात्री यायला उशीर होई. उशिरापर्यंत चालणारी ओपीडी, त्यानंतर राऊंड आणि दुसऱ्या दिवसाच्या ऑपरेशनसाठीच्या सूचना, असे करता करता त्यांना यायला बारा वाजत. त्यामुळे ते रात्री बाराच्या आत कधीच घरी परत येत नसत. विद्या मात्र आल्या आल्या थोड्या वेळाने जेवण करून दिलीप येईपर्यंत निवांत वाचत बसे. थोडी डुलकीही घेई. ते तीन चार तास फक्त तिचे स्वतःचे असत. आजही जेवण आटोपून विद्या बेडरूममध्ये पडून पिडियाट्रिक्सचे जर्नल वाचत होती. मुखपृष्ठावरील बाळाचा संदुर हसरा चेहरा बघता बघता केव्हा झोप लागली ते तिला कळलं पण नाही.

**ते तीन चार तास फक्त तिचे स्वतःचे असत. आजही जेवण आटोपून विद्या बेडरूममध्ये पडून पिडियाट्रिक्सचे जर्नल वाचत होती. मुखपृष्ठावरील बाळाचा संदुर हसरा चेहरा बघता बघता...**

“हाय मॉम!”, अर्धवट झोपेतच विद्याच्या कानावर आले. तिला वाटलं आपल्याला भास झाला असावा.

म्हणून तिने एक-दोनदा ति कडे दुर्लक्ष केलं. पण,

थोड्या वेळाने परत तेच!

"हाय मॉम!"

आता मात्र विद्याने नकळत पोटावर हात फिरवून विचारलं "कोण आहे?"

"मी तुझं बाळ, तुझ्या पोटातून बोलतंय! मॉम, कशी आहेस तू?

आनंदाने आश्चर्यचकित होत विद्या म्हणाली, "खरंच माझं बाळ बोलतंय?"

"हो मम्मा"

"हे बघ बाळा, तू मुलगा आहेस की मुलगी मी विचारणार नाही. तुला मी बाळच म्हणेन. चालेल तुला?"

"अग मम्मा, अजून मला तरी कुठे माहिती आहे मी कोण आहे ते? सध्या मी निर्गुण-निराकार



आत्मा आहे. मला ना धड तोंड ना डोळे. ना बोलता येत ना चालता येत, ना काही ऐकू येत. पण टेलिपाथीने माझ्या आत्म्याचा तुझ्या मनाशी संवाद होऊ शकतो. दुसऱ्या कुणाला समजणार नाही ते. फक्त तुला आणि मलाच. पाच-सहा आठवड्यांपासून तुझ्याशी संवाद साधण्याच्या प्रयत्नात आहे. पण तू एवढी तुझ्या हॉस्पिटलमध्ये बिझी आहेस की, तुला तुझ्या मनाकडे लक्ष द्यायलाही वेळ नाही."

"सॉरी बाळा, यापुढे असं होणार नाही. याच सुमारास मी डुलकी घेते तेव्हा मला मनाचा कॉल देत जा. म्हणजे आपल्याला निवांतपणे बोलता येईल. तुझे पप्पा पण रात्री बारा नंतरच येतात. त्यामुळे आपलं गुपितही कुणाला कळणार नाही. बरं माझं बाळ आहे तरी कसं?"

"मम्मा, अगं चार आठवड्यांपूर्वी तर तुझं हे बाळ म्हणजे राजगिऱ्याच्या आकाराच्या पेशींचा पंजुका होतं. नंतर हळूहळू माझं हृदय, आतडं, फुफ्फुसं, रक्तवाहिन्या, लघवीची व्यवस्था तयार व्हायला सुरूवात झाली. आणि सगळ्यात गंमत म्हणजे, तुझ्यात आणि माझ्यात खऱ्या अर्थानंबंध निर्माण झाला तो नाळे मुळे! त्यातूनच तर तू मला प्राणवायू आणि इतर खाणंपिणं पुरवतेस. आता तू भरपूर आणि पौष्टिक खात जा हं. नाहीतर, हे बाळ भुकेलं राहील बरं!"

"नाही रे माझ्या बाळा, मी भरपूर खाईन. माझ्या बाळाला कसं उपाशी ठेवीन मी? पण तुला काय काय

आवडतं ते सांग ना."

"मॉम, तुला पण सगळीच घाई. अगं त्याला वेळ आहे अजून! पाच सहा महिन्यांनंतरच तुम्ही डोहाळे की काय म्हणता ना? त्यावेळेस सांगेन तुला. ओके?"

"बरं बाबा, पण अजून सांग ना तुझ्याबद्दल. माझं बाळ कसं आहे ते?"

"अगं तुला सांगू, पाचव्या आठवड्यात जेव्हा पहिल्यांदा माझं हृदय धडकायला लागलं आणि रक्त वहायला लागलं, तेव्हा तर आधी मला खूपच घाबरायला झालं. पण नंतर त्याच्या तालावर डोलायची मला सवय झाली. आतापर्यंत सगळीकडे फक्त काळाकुट्ट अंधार आणि भयाण शांतता होती. मला नुसता कंटाळा यायचा!

पण, आता हे संगीत सोबतीला असतं. माझ्या नाकपुड्या आणि डोळे पण आता तयार व्हायला लागले आहेत. थोडे थोडे हात पाय पण. जसं काही बेडकाचं पिल्लूच!

एका ठिकाणी बसून बसून एवढा कंटाळा आला होता म्हणून सांगू. पण सहा आठवड्यां नंतर मला हलता यायला लागलं. मला वाटलं भूकंप झाला की काय? पण तसं नव्हतं, मी पोहायला लागलो होतो. आता तुझं हे बाळ आठ आठवड्यांचं झालं आहे. किडनी बीन एवढं! सारखं फिरायचंहा एकच चाळा. आता पापण्या पण तयार होत आहेत आणि हळूहळू माझे सगळे अवयव काम करायला लागले आहेत. बरं मम्मा, भेटू नंतर परत. आता मी थकलो. तू पण आराम कर. पप्पांची वाट बघत उगाच जागू नकोस. पण माझ्या कॉलकडे लक्ष ठेवत जा, नाहीतर गाढ झोपशील आणि माझा कॉल मिस होईल. "

"नाही रे बाळा, झोप तू, गुड नाईट"

"गुड नाईट"



विद्याला एवढा आनंद झाला की, ती नाचायलाच लागली पाय थकेपर्यंत. पण, उत्साहाचा भर ओसरल्यावर तिला अचानक जाग आली. तिला वाटलंकी, हा आपल्या मनाचा खेळ तर नाही? मागची पाळी चुकल्यावर आपण कंटाळून प्रेग्नेंसी टेस्ट केलीच नाही. आता दुसरी पाळी टळूनही चार पाच दिवस झाले. सकाळी उठल्या उठल्या प्रेग्नेंसी टेस्ट करायला पाहिजे नंतरच दिलीपला सांगेन. सकाळची वाट पहात पहात विद्या रात्रभर झोपलीच नाही. सातच्या सुमारास उठून ति ने "प्रेग्नन्सी टेस्ट कीट" काढून टेस्ट पट्टीवर युरीनचे दोन-तीन थेंब टाकले. टेस्ट पट्टीवर २ दाट निळ्या रेषा उमटल्याचे दिसताच ती एवढ्या मोठ्याने आनंदात ओरडली की, दिलीप जागे होऊन काय झाले म्हणून पाहायला आले. तर विद्या बाथरूममध्ये नाचत होती. दिलीपला पाहताच ती त्याला बिलगून आनंदातिशयाने म्हणाली, "दिलीप, आय ॲम प्रेग्नेंट! आय एम गोइंग टू बी मदर ॲंड यू आर वूल्ड बी फादर!"

दिलीपनं विद्याला कवटाळून पटापट तिची चंबुनं घेतली. दोघांच्याही डोळ्यातनू गंगायमुना वाहायला लागल्या. दिवसभर विद्या विचार करत होती, काल आपलं स्वप्नात बाळाशी बोलणं झालंते खरंच होतं की!. पण तिनं ठरवलं की, आपलं आणि बाळाचा गुपित अगदी दिलीपला पण नाही सांगायचं. कारण, कोणीच विश्वास ठेवणार नाही की, स्वप्नात बाळ माझ्याशी बोलतं! वेडी म्हणतील मला. मुलांसाठी आई वेडीच असते ना! आहेच मी वेडी! पण हे गुपित आमचं दोघांचंच.

संध्याकाळी विद्याला डुलकी लागली पण, कॉल काही आलाच नाही. पूर्ण आठवडा गेला पण बाळाशी काही संवाद झाला नाही. विद्याला वाटलं आपल्या बाळाच्या अति हव्यासापायी आणि वेडापायी आपल्याला प्रेग्नन्सीत भास होत असावे. निराश होऊन तिचा डोळा लागला असतांना, तिला पोटात कुणीतरी आतून लाथा मारल्यासारखे वाटले आणि त्याबरोबर कॉल!

"हॅलो मम्मा! हॅलो मम्मा!"

"आज आठवण झाली होय तुला? जा, मी बोलणारच नाही तुझ्याशी."

"सॉरी मम्मा, माझं ऐकून तर घे. अगं मागच्या दहाव्या आठवड्यात माझ्या शरीरात सार असंख्य अवयवाचं काम सुरू होतं. किडनी, पोट, मेंदू, फुफ्फुस, हृदय या सगळ्या अवयवांचं टेस्टिंग चालू होतं. सारखं लक्ष द्यावं लागतं मला. घरात फर्निचर तयार करतांना द्यावं लागतंना तसंच! थोडंसं दुर्लक्ष झालं आणि एखाद अवयव बिघडला म्हणजे पूर्ण आयुष्याचं नुकसानच! त्यामुळे वेळच नाही मिळाला. मग सांग, माझं काही चुकलं का?"

"सॉरी बाबा, उगाच रागवले मी तुझ्यावर. जरा नीट लक्ष देऊन सगळे अवयव व्यवस्थित बसवून घे आणि चांगले चालतात की नाही, ते पण पाहून घे. माझ्याशी बोलायला उशीर झाला तरी चालेल." "आता आपण पप्पांची गंमत करू या. पप्पांना स्टेथेस्कोप तुझ्या पोटाला लावून माझ्या हृदयाचे ठोके पण ऐकता येतील. त्यांना समजेल ती हृदयाची भाषा! मला पण भेटायचं गं त्यांना. सांग ना त्यांना लवकर. पुढच्या दोन आठवड्यात माझ्या शरीराचे बरेचसे अवयव बसवून होतील. मी गिळायला आणि उड्या मारायला पण लागेन"



"व्हेरी गुड. लवकर मोठं होऊ दे माझं बाळ. बाबांनाही आवडेल तुला भेटायला."

"मम्मा तुला सांगतो, आता माझ्या शरीरात कामाचा नुसता झपाटा चालू आहे. तुला आणि बाबांना लवकरच भेटायला यायचंय ना! त्याच्यासाठी सगळी तयारी जोरात चालू आहे त्यामुळे, मी आता तुला महिन्यानेच भेटत जाईन. खूप कामं आहेत गं सध्या. चालेल ना?"

"चालेल चालेल, तू तुझ्या तब्येतीची काळजी घे. ओके गुड नाईट."

"गुड नाईट"

विद्याला चौथा महिना लागल्यावर उलट्यांचे प्रमाण कमी झाले. आता निदान अन्न तरी पोटात थांबायचं. नॉशियाही कमी झाला होता. पाचवा महिना सुरु झाला तशी विद्याची भूक वाढली. अंग भरायला लागलं. तिला वेगवेगळे पदार्थ खावेसे वाटायला लागले. एका संध्याकाळी मनसोक्त अळूवडी खाऊन झाल्यावर तिला डुलकी लागली. आणि बाळाचा कॉल आला.

"हॅलो मम्मा! अळू वडी काय मस्त झाली आहे ग! माझी आवड पूर्ण केलीस. खूप आनंद झाला."

"अळूवडी आवडते म्हणून तू मला कळवताच, तुझ्या आजीने कौतुकाने माझे डोहाळे पुरवले. तुला अजून काय काय पाहिजे? तस मला नुसत टेलिपाथीनं कळवलंस तरी पुरे. सध्या खूप कामात असशील ना?"

"मला माहित आहे. मागच्या चौथ्या महिन्यात तू माझी खूप आठवण काढत होतीस ना? सारख्या उचक्या लागत होत्या. पण काय करू खूप कामात होतो ना! आता तुझ्या बाळाचा पूर्ण गर्भ झाला आहे. पण त्यामुळे खूप जबाबदाऱ्या पण वाढल्या आहेत. आता मलाही पूर्वी सारखा

कंटाळा येत नाही. नाळेशी मी सारखा खेळत असतो. पोहत असतो. आता मला फुफ्फुसानंश्वास पण घेता येतो. गिळताही येतं. चेहऱ्यावर वेगवेगळे हावभाव पण दाखवू शकतो. पण काय उपयोग? तुला नाही दाखवू शकत. पंचेंद्रियांच्या नसा पण आता माझ्या शरीरात तयार होत आहेत. हाडांमुळे शरीराचा आकार माणसात येतो आहे. आता थोड्याच दिवसात, सहा महिने झाल्यावर तुझं बोलणंही मला ऐकता येईल आणि मला समजेलही. तेव्हा आपण बोलूच. मला प्रत्यक्ष बोलता येणार नाही पण टेलीपाथी आहेच. आणि दृश्यांची भाषा पण आहेच. तुला ती हळूहळू कळेलच. चल आता. माझी बोटं चोखायची वेळ झाली. ओके, गुड नाईट!"



आता सातव्या महिन्यात, बाळाच्या हालचाली खूपच वाढल्या होत्या. पोटावर हात फिरवला की, त्याला बरं वाटायचं. पण पुन्हा खोड्या सुरूच. एकदा मला म्हणाला, "मम्मा, आता मी खूप मजेत आहे.

झोपतांना तू गाणी लावतेस ना, ती मला खूप आवडतात. आता मला डोळ्यांची उघड झाप पण करता येते.

नियमित झोप आणि जागही येते. मेंदूने विचारही करता येतो. आता आठ महिन्यांचा झाल्याने फुफ्फुस आणि पचनसंस्थाही पूर्णपणे तयार झाली आहे. मला पाहताही येतं. उजेडाला डोळेही मिचकावता येतात.

आता हळूहळू तुला प्रत्यक्ष भेटण्यासाठी तयारी सुरू करायची आहे. बाहेर येण्यासाठी माझं डोकंही खाली आलं आहे. हळूहळू मी खाली घसरतो आहे. लवकरच भेटू बाय!"

नवव्या महिन्यात शेवटपर्यंत विद्या क्लिनिकला जात होती. शेवटी ओटीपोटात कळा यायला लागल्यावर दिलीपने विद्याला तिच्याच गायनाकॉलॉजिस्ट मैत्रिणीच्या हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केले. चार तासानंतर तिला लेबर रूममध्ये घेतले. आणि अर्ध्या तासातच बाळाच्या ट्यॅंहाऽऽट्यॅंहाऽऽचा मधुर स्वर विद्याला ग्लानीतही ऐकू आला. नर्सने बाळाला स्वच्छ करून दुपट्यात गुंडाळून ते आनंदाचं गाठोडं दिलीपच्या हातात दिलं. दिलीपने क्षणभर त्याला छातीशी कवटाळून अलगद विद्याच्या कुशीत दिलं. आणि ग्लानीत असतांनाच विद्याला ऐकू आलं, "हाय मॉम!"

## आपले पर्सनल कपडे

१) आपले कपडे कोणासही देऊ नयेत, म्हणजे आपले कपडे आपल्याच नातेवाईकाला देऊ नये, कारण आपल्या कपड्यांना विशिष्ट energy लागलेली असते, मग ती (negative / positive) कुठलीही असो त्याचा त्रास आपल्याला होत असतो.

२) ज्यांचा तुमच्या लोकांशी संबंध येत नाही त्यांनाच अशी वस्तू घ्या.

३) आपल्या कपड्यांच्या चिंध्या असतात त्या घरात पुसण्यासाठी वापरू नयेत. पुसण्यासाठी विकत कापड आणून पुसणे.

# आपल्या घराची स्टेअरकेस

१) स्टेअरकेस म्हटलं तर वजन आलं आणि वजन नेहमी दक्षिण-पश्चिम-नैर्ऋत्य भागातच पाहिजे.

२) पूर्व-उत्तर-ईशान्य भागात अजिबात वजन नको.

३) आग्नेय आणि वायव्य भागात ५०%पेक्षा जास्त वजन असेल तर ती दिशा ५०% positive व ५०% negative होते पण जर उत्तर,ईशान्य, पूर्वेला वजन आलं तर ती दिशा negative होते.

४) पूर्व दिशेला स्टेअरकेस आली तर म्हणजे वजन आलं तर, पूर्व negative होते, असं झालं तर चांगल्या संधी येण्याचं प्रमाण कमी किंवा कधीकाळी आलेली संधी त्यांना encash करता येत नाही म्हणजे प्रगतीच्या संधी त्यांना घेता येत नाहीत.

५) ईशान्य भागात स्टेअरकेस आली तर कर्त्यापुरुषाची स्थिती अशी होते की तोंडापर्यंत घास येतो पण त्यांना तो घेता येत नाही.

६) पूर्वेला वजन create झालं तर म्हणजे कपाट, wardrobe टाकलं तर चांगली संधी नाही, असा माणूस हताश व निराश झालेला असतो, म्हणजे अस्वस्थ झालेला माणूस होतो.

७) उत्तर दिशेला staircase आली तर पैशाच्या related problem चालू होतात, कारण दिशा lock होते. Staircase म्हणजे वजन.

नवरा- वकिलसाहेब, मला लवकरात लवकर घटस्फोट हवा आहे. गेले ६ महिने माझी बायको माझ्याशी एक शब्द सुध्दा बोलली नाही.
वकिल- परत एकदा विचार करा. इतकी गुणी बायको पुन्हा मिळणार नाही ...



खोटं बोलायला पण काही लिमिट असते.. .
काल एकाला उधारी मागण्यासाठी घरच्या लॅंडलाईनवर फोन केला तर तो म्हणतो,
अरे यार, थोडा वेळाने फोन कर मी आता गाडी चालवतोय.. .

# भय इथे संपत नाही

**अनामिक**

२००९ चा ऑगस्ट महिना होता आणि दिल्लीहून ऑर्डर आली कि एका विदेशी महिला संशोधकाला घेऊन मी कान्हा व्याघ्र प्रकल्प आणि चिलापी रेंज मध्ये जावे. तिचा प्रकल्प फार मोठा होता आणि जागतिक बँक आणि WWF ने त्यांत कित्येक दशलक्ष डॉलर्स ची गुंतवणूक केली होती. जेस्सी मॅडम, दोन प्राणी संशोधक, त्यांची एक विद्यार्थिनी एक कॅमेरामन, मी आणि एक स्थानिक गाईड शी एकूण ७ लोकांची पार्टी होती आणि आणखी ६ हमाल आम्ही बरोबर घेतले होते. एक टेम्पो आणि एक जीप जंगलातील वाटांतून जाण्यासाठी वाहन म्हणून होते. अनेक प्रकारच्या झाडांची सॅम्पल्स, प्राण्यांचे फोटो, दगडांचे नमुने वगैरे गोळा करायचे होते.

अनेक लोकांना वाटते कि जंगल म्हणजे घनदाट पशु पक्ष्यांची भरलेले वातावरण पण तसे नसते. जंगल कितीही मोठे आणि घनदाट असले तरी बहुतेक ठिकाणी तुम्हाला पक्षी प्राणी दिसत नाहीत. तसेच प्रत्येक जंगलांत आत आदिवासी हे असतातच. अगदी कान्हा व्याघ्र प्रकल्पांत सुद्धा कित्येक आदिवासी भाग आहेत.

मी फॉरेस्ट ऑफिसर असलो तरी शहरी माणूस. बंदूक वगैरे घेऊन जंगलात फिरायला आवडते पण तिथे राहायला आवडत नाही. चिलापी रेंज मध्ये माझी नेमणूक झाली तेंव्हा मी सर्वप्रथम राहायला कुठे मिळेल ह्याची चौकशी केली. ह्या भागांत एकही फॉरेस्ट ऑफिसर राहत नव्हता त्यामुळे तशी काहीच व्यवस्था नव्हती पण सरकारी कागदांत एका ब्रिटिश सैन्य अधिकाऱ्याने इथे फॉरेस्ट हाऊस बांधले आहे अशी माहिती मिळाली. डोंगरी ह्या भागांत एक आदिवासी कसबा आहे तेथील लोकांनी मला त्या फॉरेस्ट हाऊस चा पत्ता दिला. मी सरकारी पैशानी सर्वप्रथम तिथे जाण्यासाठी एक कच्चा रास्ता बांधून घेतला. फॉरेस्ट हाऊस अगदी पक्क्या चिऱ्यांचे बांधले होते. ग्लास खिडक्या तुटल्या होत्या पण आंतील लाकडी जिना अजून मजबूत होता.

**रात्री मला जाग आली ती सूर्याच्या ओरडण्याने. आम्ही पळत बाहेर गेलो तर काय आश्चर्य. पावसाने सरोवराचा स्तर खरे तर वाढायला पाहिजे होता पण ते सरोवर चक्क आटले होते.**

माझे पहिले ६ महिने फक्त हे घर साफ करून राहण्यायोग्य करण्यात गेले. वीज अजून ह्या भागांत पोचली नव्हती म्हणून एक जनरेटर आणि एक भली मोठी तेलाची टाकी मागून घेतली. टाकी इतकी मोठी होती कि नंतर आजूबाजूच्या गावातले लोक पेट्रोल मागणीसाठी येऊन धडकू लागले.

मदतनीस म्हणून मी सूर्याला ठेवले हाच आमचा गाईड गाईड सुद्धा होता. तो शिकार करण्यात सुद्धा तरबेज असल्याने अधी मधी चांगली सागुती सुद्धा बनवायचा. कायद्याने मला फक्त छोटे पक्षी आणि कधी कधी हरणे

मारण्याची परवानगी मिळत असे.

जेस्सी मॅडम आल्या तेंव्हा मी त्यांना ह्याच घरांत ठेवले तर त्यांच्या इतर सहकार्यांनी बाहेर तंबू ठोकला. हनुमान टीळा म्हणून जंगलात आंत खोलवर एक छोटा पहाड होता तिथपर्यंत जीप किंवा टेम्पो जात होता. त्यामुळे आधीचे तीन दिवस प्रवास फक्त हनुमान टीळा पर्यंत प्रवास करायचे ठरवले होते. प्रत्येक दिवशी आम्ही काही ४ मैल जायचो तंबू ठोकायचो आणि नंतर संशोधक मंडळाची गाईड वगैरे सॅम्पल्स गोळा करायला जंगलांत जायचे. मी आणि जेस्सी ह्या सगळ्यावर नजर ठेवायचो. जेस्सीला भारतीय जंगले, झाडे, त्यांची हिंदी नावे, आयुर्वेदिक वापर ह्यांची फार खोलवर माहिती होती.

सर्व काही सुरळीत चालले होते. हनुमान टीळा पर्यंत तरी आम्हा सर्वांचे काम अगदी मनाप्रमाणे झाले होते. आता पुढे पायी प्रवास करायचा होता. त्यामुळे जेस्सी आणि त्यांची विद्यार्थी सामंथा ह्यांनी ४ हमालांना सॅम्पल्स घेऊन परत बेसकैम्प वर पाठविले. ३ हमाल आमच्याबरोबर पायी आले. मला इतिहासाची प्रचंड आवड त्यामुळे मी सरकारदरबारी असलेले सर्व कागद वाहकाला होते. मी ज्या घरांत राहत होतो त्याचे मूळ मालक कॅप्टन हॅरिसन जोन्स हे ईस्ट इंडिया कंपनीत कामाला होते आणि नंतर त्यांनी ते काम सोडून आपले आयुष्य भारतीय जंगलांत घालवले. जंगलांत आंत वर जाऊन विस्मृतीत गेलेली मंदिरे, महाल वगैरे ते शोधून काढत असत. १९०१ मध्ये कॅप्टन जोन्स चिलापी रेंज च्या जंगलांत गायब झाले. त्याच्या सोबत आणखीन किमान ९ लोक गायब झाले होते. ब्रिटिश सरकारने शेकडो सैनिक त्यांना शोधण्यासाठी पाठविले होते. पण कुणालाही ते सापडले नाहीत. त्यांचे नक्की काय झाले हे एक न उलगडलेले गूढ आहे जे आजही आदिवासी भागांत कुजबुजले जाते.



जेस्सी आणि सामंथाला ह्या गुढाची माहिती मी दिली आणि दोघीनाही ह्याचे विलक्षण आश्चर्य वाटले. . पण माझ्याकडे कॅप्टन जोन्स ची डायरी होती. त्यांत त्यांनी जंगलात आतवर असलेल्या एका सरोवराबद्दल लिहिले होते. ह्या सरोवराला नाव नव्हते पण आम्हा सर्वानाच तिथे जायची अतिशय मनापासून इच्छा होती. पुढील ४ दिवस सलग मेहनत केल्यानंतर आम्ही बाकीच्या पोर्टर लोकांना सुद्धा माघारी पाठविले. इतर संशोधक मंडळी सुद्धा मागे गेली. मी सूर्या, ख्रिस, सामंथा आणि जेस्सी इतकीच मंडळी आता बाकी होतो.

सरोवरावर पोचलो तेंव्हा रात्रीचे ९ वाजले होते. थकून आम्ही कसे बसे तंबू लावले. इतक्यांत आभाळ

भरून आले आणि कधी नाही तो पाऊस पडायला लागला. ऑगस्ट मध्ये इथे पाऊस पडणे अगदी अशक्य होते. त्यांत आम्ही तंबू पाण्याच्या जवळ लावला होता त्यामुळे पाणी आंत येईल अशी भीती वाटत होती. मी तसाच खुर्चीवर झोपी गेलो. रात्री मला जाग आली ती सूर्याच्या ओरडण्याने. आम्ही आम्ही पळत बाहेर गेलो तर काय आश्चर्य. पावसाने सरोवराचा स्तर खरे तर वाढायला पाहिजे होता पण ते सरोवर चक्क आटले होते. पाऊस अजून पडत असला तरी आम्ही पळत सरोवरात शिरलो. आधी किमान २०० मीटर लांब असलेले सरोवर आता फक्त २५ मीटर उरले होते. आणि जसे जसे आम्ही आंत चालत गेलो आम्हाला लक्षांत आले कि सरोवराच्या खाली एक प्रशस्त काळ्या पाषाणाचे मंदिर वजा स्ट्रक्चर होते, मंदिराचं म्हटले असते पण त्याला कळस नव्हता.



नंतर आम्ही सरोवराचा अभ्यास करून जिऑलॉजिकल सर्वे ऑफ इंडिया मध्ये पेपर पब्लिश केला. खरे तिथे तीन जमिनीत तीन प्रकारची भगदाडे होती. त्यातील एक जमिनीवर असल्याने ते सरोवर वाटायचे. तेथून काही अंतरावर जमिनीत दुसरे भगदाड होते पण ते अंडरगाऊंड होते. आणि त्याहूनही खाली जमिनीत एक पोकळ भाग होता जो फक्त कशा किरणांनी शोधू शकला जात होता. मधल्या पोकळींत एक प्रचंड लाकडी मोट होती. हि कुणी माणसानेच केली असावी. ह्यावर अजूनही रिसर्च चालू आहे.

पाऊस पडला की सर्वप्रथम हि मधली पोकळी पाण्याने भरायची आणि त्यामुळे त्यातील लाकडी मोट वर यायची. असे झाले कि सरोवर आणि तिसऱ्या पोकळीला जोडणारा एक पाषाणी मार्ग होता तो उघडायचा आणि सरोवरातील पाणी प्रचंड वेगाने त्यांत ड्रेन व्हायचे. हे सर्व पाऊस एका ठराविक वेगाने सुरु आहे त्याच वेळी होऊ शकत होते. आणि ह्या भागांत असा पाऊस क्वचितच पडायचा. कॅप्टन जोन्स कदाचित अश्या पावसाच्या वेळी ह्या सरोवरातील मंदिरांत शिरला असावा आणि पाऊस बंद झाल्यानंतर सरोवरात पुन्हा पाणी भरले असावे आणि तो त्या मंदिरात बुडून मेला असावा. नंतरच्या शोध कर्त्यांना हे मंदिर दिसणे सुद्धा अशक्य होते.

आम्हाला म्हणून त्या मंदिरात जायला भीती वाटत होती पण सूर्याने एक भाला मोठा दोरखंड टाकून आम्हाला आंत जाण्यास मदत केली. पाणी भरलेच तर दोरी वापरून आम्ही वर येऊ शकत होतो. त्या मंदिरात प्रवाह करताच हे मंदिर नाही हे लक्षांत आले. तिचे असलेले शिलालेख हे एक थडगे आहे असे दर्शवत होते. हिंदू संस्कृतीत थडगे हि संकल्पना अतिशय कमी आढळून येते.

पण आम्ही त्या छोट्याच्या मंदिरातील सर्वांत

आतील भागांत प्रवेश केला आणि आम्हाला एक भाला मोठा दरवाजा दिसला. पाषाणी दरवाजा. आम्ही तो जोर लावू उघडला तर आंत काहीही नव्हते. पूर्ण रिकामी. फक्त होते ते काही काही काजव्या प्रमाणे चकाकणारे कीटक जे उडून बाहेर गेले. आमच्या विजेरीच्या उजेडाने कदाचित ते चमकले असावेत.

आम्ही परत येताना आम्हाला सूर्याची किंचाळी ऐकू आली. तो "मला वाचावा वाचवा" असे आर्ततेने ओरडत होता. मी पळत वर गेलो आणि इतर मंडळी मागे आली. वर आलो तर सूर्य कुठेही नव्हता. कुठेच नाही, अगदी नख सुद्धा नाही. कुणा जनावराने हल्ला केल्याचे सुद्धा चिन्ह नव्हते. आम्ही सुन्न झालो. इतक्यांत सामंथा ओरडू लागली. आम्ही तिच्याकडे पहिले तर तिच्या हातावर आणि तोंडावर काही काजवे होते. मी विजेरीचा प्रकाश टाकताच ते उडून गेले पण त्यांनी अक्षरशः तिचे तोंड आणि हातावरचे मास ओरबाडले होते. ती किंचाळत होती आणि जेस्सी ने तिला घट्ट पकडून फर्स्ट ऍड दिला.



मग आमच्या लक्ष्यांत आले कि ते काजवे नसून कसले तर नरभक्षी कीटक होते हे फक्त उजेडाला घाबरत होते. जे कीटक त्या मंदिरात बंद होते आणि कदाचित कप्तान जोन्स नंतर आम्ही त्यांना मुक्त केले होते. ती संपूर्ण रात्र आम्ही घाबरून काढली आम्ही रात्रभर तंबूत विजेरो चालू ठेवून होतो. सुदैवाने LED असल्याने रात्रभर दिवा चालू राहू शकत होता. कधी काही ते काजवे आम्हाला तंबूच्या बाहरे घुटमळताना दिसत असत. सकाळ होताच आम्ही तेथून पोबारा केला.

सुदैवाने ड्युटीच्या नादात पुन्हा कधी त्या कीटकांची भेट नाही झाली अन त्यानंतर तिथे अनेक संशोधक गेले पण कुणाला हि ते पुन्हा आढळले नाहीत.

सूर्याचे काय झाले तो कुणालाच सापडला नाही. अगदी कपडे किंवा हाडे सुद्धा नाही. जेस्सी ने नंतर ह्या विषयावर मला जास्त माहित पाठविली.

हजारो वर्षे पूर्वी आपली पृथ्वी अशी नव्हती. इथे भयानक प्रकारचे प्राणी, कीटक आणि जंतू राहत होते. ह्यातील बहुतेक काळाच्या ओघांत नाहीसे झाले पण त्यातील काही अंटार्टिकावरील हिमनगांत, कॅलिफोर्निया मधील रेडवूड्स ह्या मोठ्या आणि जुनाट झाडांत वगैरे अडकून हिमनिद्रेंत आहे. अनेकदा काही जाती एखाद्या वृक्षाला किंवा जंगलाला देव/देवराई वगैरे मानून तिथे काहीही तोडण्यास मज्जाव करते ज्याचे पारंपरिक कारण हेच आहे. अगदी मेक्सिको, अल्बार्टा, अलास्का, रशिया, इरलंड इत्यादी भागांत सुद्धा अश्या प्रकारच्या परंपरा आढळतात.

त्या भागांत भारतीय शास्त्रज्ञांना विशेष काही सापडले नसले तरी त्या सरोवराच्या भागांत जी विशिष्ट रचना आमच्या पूर्वजांनी केली होती ती त्या कीटकांना अडकवून ठेवण्यासाठीच केली होती. आमच्या हस्तक्षेपामुळे ते त्यादिवशी सुटले आणि त्यांनी सूर्याचा बळी घेतला. . . .

# समजतच नाही काय चुकले?

**साधना झोपे**

सानवी आणि कृपा दोघी जीवलग बालमैत्रिणी. अगदी बालवाडीपासून कॉलेजपर्यंत एकत्र. अभ्यासासोबत खेळातही दोघी पुढे असायच्या. दहावीला दोघींना सारखेच मार्क मिळाले त्यामुळे त्यांना एकाच कॉलेजमध्ये प्रवेश मिळाला. दोघींच जाणे येणे कायम बरोबर असायचे. सर्वांना त्यांच्या मैत्रीचा कायम हेवा वाटायचा. दोघींमध्ये तिसरे कुणीच नसायचे. घरच्यांचेही त्यामुळे घरोबाचे सबंध निर्माण झाले होते. कुणाच्याही घरी एकीच्या आवडीचा खाण्याचा पदार्थ बनला की, तीला त्यादिवशी आवर्जुन आमंत्रण असे. कृपापेक्षा सानवी जरा पक्की होती त्यामुळे कृपाला तिचा खूप आधार वाटायचा.

त्यादिवशी पण दोघी हसतखेळत कॉलेजला गेल्या. परत येत असतांना अचानक एक गाडी त्यांच्या बाजूला आली आणि त्यातील टारगट मुलं कृपाची छेड काढु लागले. दोघीही त्यांचा प्रतिकार करत होत्या. रस्त्यावरून येणारे जाणारे फक्त बघ्याची भूमिका घेत होते. सावनीने पोलिस हेल्पलाइनला फोन केला,पण पोलिस येईपर्यंत काय? सावनीने दगड मारायला सुरुवात केली. पण त्यामुलांनी तीला जोरात चापट मारली, त्यामुळे ती रस्त्यावर खाली पडली. दोघी जीवाच्या आकांताने ओरडून मदत मागत होत्या. पण कुणीही त्या मवाली मुलांच्या तावडीतून त्यांची सुटका करण्यासाठी पुढे येत नव्हते. जरावेळाने पोलिसांच्या गाडीचा आवाज आला तसा ते मुलं गाडीवरून पळून गेले. पोलिस इंन्सपेक्टर पाटील दोघींना पोलिस स्टेशनला घेऊन आले. त्यांना काय झाले ते विचारले पण केस फाईल केली नाही. ते म्हणाले, ठकेस फाईल केली तर तुम्हाला पण त्याचा त्रास होऊ शकतो. नंतर उद्या पालकांसोबत यायला सांगुन घरी पोहचवले. त्या घरी आल्यावर त्यांना बिल्डिंगच्या बहुतेकांनी पोलिसांच्या गाडीतुन आलेले बघितले. लोकांमध्ये लगेच कुजबुज सुरु झाली. सावनीने घरी आल्यावर आई वडिलांना सर्व हकीकत सांगितली. त्यावर ते तीला म्हणाले, तुला काय गरज होती असे करण्याची. उद्या ते मुल तुझी छेड काढतील. मुर्ख आहे. असे कसे म्हणतात तुम्ही? कृपा माझी खास मैत्रीण आहे. आणि हेच जर माझ्यासोबत घडले असते तर? उलट बोलते. असे म्हणत सावनीच्या बाबांनी तीला जोरात चपराक दिली. इकडे कृपाच्या घरी वेगळाच किस्सा तीचे आई वडील तीलाच दोष देत होते. दोघींच्या घरी रडत कशीबशी रात्र गेली.

**दोन्ही मैत्रीण घरात कुणालाही न सांगत बिल्डिंगच्या गच्चीवर आल्या आणि दोघींनी विष पिऊन आत्महत्या केली पण त्यापुर्वी एक चिठ्ठी लिहून ठेवली.**

दुसऱ्या दिवशी दोघींना पोलिस स्टेशनला बोलवण्यात आले. पण इंन्सपेक्टर पाटील यांना अचानक काही कामानिमित्ताने गावी जावे लागल्याने ती केस इंन्सपेक्टर देशमुखांकडे आली. त्यांनी दोघींना खुप विचित्र प्रश्न विचारले. एव्हाना ही बातमी मिडिया कडे गेली. मिडियावाले लगेच कॅमेरा घेऊन हजर. दोघींना काय बोलावे काही सुचत नव्हते. घरी आल्यावर सोसायटीमधील

लोक पण विचित्र नजरेने दोघींकडे बघत होते. जे मुलं त्यांच्याशी बोलायला पण घाबरत होते ते आता बिनधास्त म्हणू लागले, "मी तर चांगला होतो. मला कधी लाईन नाही दिली." आता दोघींनी बाहेर पडायच बंद केले. पण पोलिस स्टेशनला जावे लागायचे.

दोघींचे आठ दिवस अतिशय तणावात गेले. पण आज त्यांनी निर्णय घ्यायचा ठरवला. दोन्ही मैत्रीण घरात कुणालाही न सांगत बिल्डिंगच्या गच्चीवर आल्या आणि दोघींनी विष पिऊन आत्महत्या केली. पण त्यापुर्वी एक चिठ्ठी लिहून ठेवली. इन्सपेक्टर पाटील आजच परत आले होते. त्यांनी सावनी आणि कृपाच्या केस विषयी चौकशी केली तेव्हा त्यांना समजले की, इन्स्पेक्टर देशमुखांनी ती केस फाईल केली. ते देशमुखांना म्हणाले, "देशमुख काय केले हे तुम्ही अहो त्या मुलींच्या आयुष्याचा प्रश्न आहे हा". तेवढ्यात त्यांच्या टेबलवरचा फोन खणखणला आणि त्यांना लगेच निघावे लागले. जिथून फोन आला तिथे ते आले. दोघींना बघुन तर ते अगदी हतबल झाले. त्यांनी चिठ्ठी वाचली त्यात लिहिले होते, आम्ही आत्महत्या करत आहेत. कारण नाही सहन होत आता हे सारे. मुलीवर अन्याय झाला तर नको नको ते प्रश्न विचारतात आणि मग स्वतः च्या शरीराचीही लाज वाटायला लागते. मिडियावाल्यांना तर आयतीच ब्रेकिंग न्यूज मिळते,आणि हं. . . ज्यांना आपण आपले शेजारी म्हणतो त्यांच्या कुत्सती नजरा नाही सहन होत. हा सर्व जाच नाही आम्ही अजून सहन करु शकत. त्यात एक दुर्दैव की घरचे पण आमच्यावर विश्वास ठेवत नाही. आमची विनंती आहे की आमच्यासोबत घडले ते कोणासोबत घडू देऊ नका. "पाटीलांनी ती चिठ्ठी मोठ्याने वाचून दाखवली. सारे जण खाली मान घालुन ऐकत होते. सावनी आणि कृपाचे आई वडील खुप रडत होते पण आता त्याचा काही उपयोग नव्हता. ते सारखे म्हणत होते," आम्ही फक्त लोक काय म्हणतील का विचार करुन मुलींना बोलत राहिलो. लोक तर बोलतच राहिले पण आम्ही मात्र आमच्या सोन्यासारख्या मुली कायमच्या गमावून बसलो. त्यांची काही चूक नसतांना. पाटीलांना तर काय बोलावे सुचत नव्हते. दोघी मैत्रीणींनी शेवटी बरोबरच आयुष्य संपवले. त्या दिवस सोसायटीमधुन फक्त दोन प्रेत नाही तर संपूर्ण सोसायटीचे प्रेत बाहेर पडले.





सासरेबुवांना बातमी लागते की मुलीच्या गावाला वादळ झालंय,
ते जावयाला फोन लावतात,
काय जावईबापू वादळ काय म्हणतंय ?
जावई - स्वयंपाक करतंय, फोन देऊ का ?

# बोंडवाची गाडी

किसन रामचंद्र पेडणेकर

आंबे काजु मोहोरले की कोकणातील वातावरण अगदी प्रसन्न असतं. शेतकरी आपल्या आंबा-काजूच्या बागेतील झाडांची थोडी जास्तच काळजी घेऊ लागतो अगदी एखाद्या गरोदर असलेल्या मुलीसारखी. खरंच आहे ना, आंबा-काजूच्या झाडांना आलेला मोहोर जपणे खुप महत्त्वाचे असते. बऱ्याचदा भयंकर किड लागून अगदी तयार होत असलेली फळे गळून पडतात. कित्येकदा अवकाळी पावसामुळे मोहोर पूर्ण काळा पडून खूप नुकसान होते. म्हणूनच शेतकरी राजा आपल्या पोटच्या गोळ्याप्रमाणे झाडांची काळजी घेत असतो. त्यांना वेळेवर औषध फवारणी, खत घालणे,तिथे कीड लागली तर त्यावर औषधे इत्यादी. साहजिकच पूर्ण वर्षभरासाठी लागणारी मिळकत ती झाडेच देणार असतात ना.

यावर्षी सुद्धा चांगल्या प्रकारे आंबे तयार होत होते. काजू पूर्ण तयार झाले होते, तसे ते काढून सुकवून ते बाजारात नेऊन विकायचे याची तयारी होत होती. पण काजू विकायची पण एक विशिष्ट वेळ असते असे आमची माईआजी म्हणते. बाजारात काजूचे भाव कमीजास्त होत असतात. जेवढा काजू चांगला सुकलेला तेवढा भाव जास्त आणि ओल्या काजूला भाव कमी. काजू चांगले सुकवून ठेवायचे आणि काजूचा भाव जास्त वाढला की मग जाऊन काजू विकून यायचे. काजू सोबत बोंडू पण विकले जायचे. ज्याची उत्तम प्रकारे फेणी बनवली जाते आणि गोव्यात या फेणीला खूप चांगला भाव आहे. आणि हे बोंडू न्यायला खास गोव्यातून या फेणी बनवणाऱ्या कारखान्यातील गाड्या येतात सिंधुदुर्गात.

अश्याच एका सायंकाळी साधारण साडेतीन वाजले असतील, गाडी नंबर जी. ए. ०२ के २९०६ वळणावरून येताना दिसली. जरी लांब वळणावर असलेल्या गाडीचा नंबर दिसत नसला तरी त्या एक दिवस आड येणाऱ्या टेम्पोचा आवाज अचूक ओळखून माईआजी सरसावत पुढे येऊन उभी राहीली. रस्त्याच्या कडेला ठेवलेल्या टोपल्या पुन्हा एकदा हलवून जराश्या पुढे सरकवल्या आणि हात वर करून गाडीला थांबायचा इशारा करू लागली. माई आजी आयुष्याची डायमंड ज्युबिली साजरी करतेय पण तिच्या आयुष्याची परवड काही थांबली नव्हती.

**भाऊ बोलता बोलता विषय काढतो, माई काय झाला? काय अडचण आसा तर सांग मगे. अशी दोघायजणा उपाशी रवा नकात. पैश्याची अडचण आसली आणि माझ्या दुकानातसून काय सामान होया आसला तर बिनधास्त येवन घेवन जा.**

"आवशी कशी आसय गे?" असे म्हणत त्या बोंडू न्यायला आलेल्या टेम्पोतुन खाली उतरत पात्रावने माईआजीला विचारले.

"मिया बरा आसय रे झिला. तिया बरो मा? हाली येय नाय तो होतंय खय इतके दिस. बायल पोरा बरी आसत मा?"

"होय गे आवशी. मिया पण सामको आसय आणि माझी लगीन नाय झालेली बायल आणि न झालेली पोरा पण

एकदम सामकी आसत. कितींदा सांगलय तुका काय माझा आजून लगीन नाय जावक हा. आणि हे सगळे टोपले तुझेच आसत मा ? आज पकल्याचे नाय टोपले ?''.

"होय होय हे सगळे टोपले माझेच आसत. अरे त्या पकल्याक वायच नजा आसा. रात्रीपासून ताप भरलो हा आंगात तेच्या, तेवा नाय जावक आज सड्यार तो. पुढच्या पैऱ्याक असतलो''.

"बरा हा. काळजी घेवक सांग तेका. आता आमी सोमारा येतलो हा''.

"होय होय. माझे डबे कितके झाले रे ? लियलंय मा बरोबर? म्हातारेक फसवं नकात रे पोरानु''.

"नाय गे आवशी तुका फसोवचो. तुका फसोन आमका जिता रवाचा हा मा. तुझे पाच डबे झाले. सोमवारी इलो काय पैसे देतंय तुझे ह्या आठवड्याचे'', असं म्हणत टेम्पो निघून गेला.



माईआजी रिकाम्या टोपल्या घेऊन घरी निघाली. माईआजीची एकूण पंधरा काजूची झाडे होती. तसेच वीस आंब्याची झाडे होती. अण्णा म्हणजे माईआजीचा नवरा, त्यांनीच ही झाडे लावली होती, त्यांना माई-अण्णा दोघांनी जोपासले होते, नेहमी खतपाणी घालून खूप चांगल्या प्रकारे काळजी घेतली होती आणि याचंच फळ म्हणून आज म्हातारपणात त्यांना पोटापाण्यासाठी कोणाकडे हात पसरावे लागत नव्हते. आंबे, काजू तसेच बोंडू विकून त्यांच्या हातात चार पैसे येत असत. त्यातून त्यांना त्यांचे औषध पाणी आणि इतर खर्च भागवता येत होते. यंदा आंब्याच्या पिकाने धोका दिला होता, आलेला मोहोर अवकाळी पावसाने जळून गेला आणि घेतलेली मेहनत आणि पैसा जणू वायाच गेला. परंतु काजू आणि बोंड थोडे उशिरा मोहोर आल्याने वाचले आणि ते विकून थोडेफार पैसे तरी मिळत होते.

तरुण वयात भरपूर अंग मेहनत केलेल्या अण्णांना आता वय झाल्याने जास्त काही काम करायला जमत नसे. पण आजी काकांना काम करू न देता स्वतः सातत्याने काम करत राहायची. आजही आजीने घरी आल्यावर सर्वप्रथम काकांसाठी चहासाठी चुलिवर आधण ठेवलं. आलं घातलेला कडक चहा करून त्यांना आणून दिला, आज गाडीवर किती डब्बे बोंडू दिले ते सांगितले आणि मग स्वतःसाठी चहा घेतला. त्यानंतर दुसऱ्या दिवशी आंघोळीचे पाणी गरम करण्यासाठी चुलीत घालायला लागणारा पतारा आणायला निघून गेली.

इकडे तो टेम्पोवाला आजीजवळचे बोंडु घेऊन निघाल्यावर पुढे जायच्या आधी वाटेतच असलेल्या भाऊच्या दुकानाजवळ थांबला. आणि टेम्पो थांबल्यावर पात्राव काही बोलायच्या अगोदरच आतून आवाज आला, "बोल पात्राव किदे रे, काय काय ऑर्डर आसा''

त्यावर पात्राव बोलतो, "काय भाऊ, कधीतरी आमकां बोलाक दि मरे. एक काम कर सहा वडा पाव, चार उसळ पाव, दोन बुर्जी पाव आणि आठ चहा ठेय, त्या रॉकल्याक दोन पेले चाय लागता. आणि थोडो उशीर झालो तर राव हा, बंद करू नको. दोन दिवस आता येवचो नाय मा, म्हणांन आज सगळ्यांकडचे बोंडू घेवन येतलो. कोणाचे रवले तर कोणाक टाकून दिवक नका''

ठीक हा आणि तिया आरामात ये रे. घाई करू नको. आम्ही खय जानो नाय. झोपलो तर हॉर्न वाजोन उठय नायतर दरवाजो वाजय, भाऊ असं बोलल्यावर पात्रावने ड्राइवरला गाडी चालू करायला सांगितली आणि हसत हसत बोंडू घ्यायला निघून गेले. खरंतर ही बोंडू न्यायला येणारी गाडी एकदिवस आड करून येत असे. पण उद्यापासून म्हणजे शनिवार रविवारी काही काम असल्याने टेम्पो येणार नव्हता, त्यामुळे शनिवार रविवार दोन दिवस टेम्पो बंद राहणार होता. आणि सगळ्या बोंडू देणाऱ्यांचे पैसे हा पात्राव दर शनिवारी देत असे. पण ह्यावेळी त्याने सांगितल्याप्रमाणे ह्या आठवड्याचा हिशोब सोमवारी होणार होता.



भाऊच्या घरगुती खानावळीत संध्याकाळी आजूबाजूच्या तीन-चार गावातील बोंडू खरेदी करून येताना टेम्पो थांबत असे आणि सगळेजण भरपूर पोटभर नाष्टा करत असत. हा टेम्पो गेली पाच वर्षे या गावात येत असे आणि भाऊंच्याच खानावळीतच नाष्टा करायला थांबत. एकतर भाऊचा स्वभाव आणि दुसरीकडे भाऊच्या हातच्या पदार्थांची चव. दोन्ही गोष्टीनी त्यांना जोडून ठेवले होते. जरी उशिरा आले तर अगदी घरच्यासारखा त्यांना गरमागरम, व्यवस्थित नाष्टा करायला मिळायचा. दिवसभर थकल्यावर पैसे किती खर्च होतात यापेक्षा पोट किती भरतंय आणि काय खातोय त्याची चव पण त्यांना गरजेची होती आणि भाऊ याचीच जास्त काळजी घ्यायचा.

सोमवारी भाऊ संध्याकाळी नेहमीच्या वेळेत टेम्पोचा आवाज येतोय का वाट बघत होता पण टेम्पो काही आला नाही. भाऊला तर आश्चर्य वाटलं की असं कसं, सांगीतल्याप्रमाणे येणारा पात्राव आज अजून कसा नाही आला बर. उशीर होईल म्हणून त्याने अजून वाट बघितली पण टेम्पो काही आला नाही. कितीजण असतील त्यानुसार वडे, आणि इतर काही नाष्टा करायला हवा म्हणून त्यासाठी सामान जमा करून पुढची तयारी करावी लागेल म्हणून भाऊ वाट बघत होता. कदाचित टेम्पो दुसऱ्या रस्त्याने घातला असेल म्हणून ऑर्डर द्यायला आला नसेल म्हणून भाऊने साधारण नेहमीच्या ऑर्डर असतात त्यानुसार वडे आणि बुर्जी आणि इतर काही पदार्थ बनवून ठेवलेत. रात्री दमून येतील आणि काहीच खायला नसेल तर पोरांना उपाशी गोव्याला जावं लागेल. रात्री कुठे दुकानंपण उघडी मिळणार नाहीत त्यांना. रोजची वेळ झाली तशी भाऊने बायकोला आणि मुलांना तयारीत राहायला सांगितलं, टेम्पो आला की सगळ्यांना प्रथम पाणी आणि चहा तयार ठेवायला सांगितले. रात्र उलटून जात होती, अकरा वाजायला आले पण टेम्पोचा काहीच पत्ता नव्हता. भाऊने टेम्पो आला की उठवतो असं सांगून मुलांना झोपायला जायला सांगितलं आणि तो आणि बायको अंगणात टेम्पोची वाट बघत बसले. खरंतर तो टेम्पोवाला आणि त्यासोबत काम करणारी मुले

काहीच संबंध नसणारी, परंतु या एवढया वर्षात त्या पात्रावने आपल्या स्वभावाने सगळ्यांना स्वत:वर जीव लावायला भाग पाडले होते. बारा वाजले- एक वाजला- दोन वाजले परंतु गाडी काही दिसत नव्हती. आतामात्र भाऊच्या बायकोने सांगितलं की अहो पात्राव एवढा उशीर कधी करत नाही. बहुतेक आज आलाच नसेल.

"नाही गं असा कसा नाही येणार. तो बोललेला ना की आज येणार आहे म्हणून. कदाचित गाडीतील पेट्रोल संपलं असेल किंवा गाडी खराब झाली असेल. तू झोप मी वाट बघतो थोडावेळ. टेम्पो आला की मी तुला उठवतो".



आगादी आपल्या घरातीलच कोणीतरी व्यक्ती उशिरापर्यंत घरी आला नाही या भावनेने भाऊ व्याकुळ होत होता. सारखा येरझाऱ्या घालू लागला. न राहवून शेजारी राहणाऱ्या मंगेश रिक्षावाल्याला उठवले. त्याला रिक्षा काढायला सांगितली आणि नेहमी ज्या ज्या मार्गावरून पात्राव बोंडू घेऊन यायचा त्या मार्गावर जाऊन भाऊ, पात्राव आणि त्याच्या बोंडवाच्या गाडीचा शोध घेऊ लागला. साधारणपणे दहा-बारा किलोमीटर अंतरावर जाऊन शोध घेतला पण कुठेच गाडीचा मागमूस नाही लागला. आता मंगेशच बोलला की भाऊ आता घरी जाऊया आपण, सकाळी चौकशी करूया आजूबाजूला. जवळपास चार वाजलेत, खूप उशीर झालाय. किती फिरणार आहोत आपण. नाईलाजाने भाऊने मंगेशला रिक्षा मागे फिरवायला सांगितली आणि जाताना रिक्षा वाटेत असणाऱ्या सरकारी हॉस्पिटलमध्ये थांबवायला सांगितली. तिथे जाऊन इथे कोणी गंभीर अपघात झालेला पेशंट दाखल झालाय का याची चौकशी केली. परंतु तिथेही निराशा पदरी आली. गेल्या चार दिवसात असा कोणताही अपघातग्रस्त व्यक्ती इथे दाखल झालेल्याची नोंद तिथे नव्हती. तिथूनही नाईलाजाने भाऊ मागे परतला. घरी पोहोचेपर्यंत सकाळचे साडेपाच वाजले होते, खुर्चीत बसला तिथेच डोळा लागला. अचानक रस्त्यावर कोणाच्यातरी गाडीच्या हॉर्नच्या आवाजाने भाऊ दचकून जागा झाला आणि ओरडला, 'पिंट्या अरे बोंडवाची गाडी इली रे, चल चुलीत लाकडा सार. आणि तोंका पाणी दि पटकन." आणि स्वत: धावत बाहेर आला. बघतो तर काय ती गाडी दुसऱ्याच कोणाची तरी होती. भाऊला झोपेत भास झाला होता की पात्राव आला आहे म्हणून.

भाऊने सगळीकडे विचारपूस केली बोंडवाची गाडी आलेली का म्हणून, जवळच्या पोलिसांच्या चेक पोस्टवर पण जाऊन चौकशी केली की कुठे गाडीच्या अपघाताची बातमी कळाली का. पण अशी कोणतीही माहिती मिळाली नाही. भाऊ त्यादिवशी दुपारी पुन्हा वाट

बघत बसला की आज तरी येईल पात्राव गाडी घेऊन परंतु आजही गाडी आली नाही. भाऊला आता जास्तच काळजी वाटू लागली.

तेवढ्यात आवाज ऐकू आला, "ए भाऊ, अरे बोंडवाची गाडी इल्ली काय रे रात्री ? कालपासून खय पत्तो नाय तेंचो. माझे कालपासूनचे बोंडू काढून ठेयलंय ते तशेच पडले कुसत. काल येवक नाय म्हणजे आज तरी येतीत म्हणांन आजय आणलय काढून तर येव रे फटकी तेंचार आज पण नाय येवक. तुझ्या दुकानार थांबतत ना रात्री नाश्तो करूक म्हणांन म्हटला तुका ईचारुया. इल्ले काय रे रात्री किंवा आता गेल्ले काय आवाज दिवन ?"

भाऊ बाहेर येऊन बघतो तर माईआजी आवाज देत होती. "अगे माई, नाय गे येवक कालपासून बोंडवाची गाडी. मिया तर काल रात्री सगळो नाष्टो तयार करून वाट बघी होतंय पण येवकच नाय. वाट बघून मग मिया मंगेशाक घेवन पण गेललंय शोधुक गाडी-बीडी खराब झाली आसात तर पण खय्येक नाय गावाक. कंटाळान मगे इलो परत आमी. सरकारी हॉस्पिटलात पण चौकशी केली पण कायच कळाक नाय. आजय नाय येवक गाडी. खय आसत काय म्हायती पॉर. बरे आसांदे रे देवा. "

"होय रे बाबा, बरे धडधाकट आसांदे. माझे बोंडू कुसान गेले तरी चलात पण पॉर परत येवंदेत सगळे सुखरूप. भाऊ काय समाजला तर कळय रे. येतंय मिया आता, हेंका जेवक वाढुचा आसा. गाडयेची वाट बघीत रवलंय तर उशीरच झालो."

माई म्हणाली खरं की बोंडू कुसून गेले तरी चालतील पण आता घरी जाऊन आजोबांना काय सांगायचं हा विचार करत चालू लागली. भाऊच्या घरापासून काही अंतर चालत गेली आणि धाडकन खाली कोसळली. भाऊने आवाज ऐकला आणि माईआजी पडलेली बघून धावत तिथे गेला. तिला हाताला धरून उठवलं आणि पिंट्याला आवाज देऊन बोलावलं. दोघांनी हळूहळू हाताला धरून तिला आणून ओसरीवर बसवली. ती थोडी स्थीर झाल्यावर तिला भाऊने विचारले,ठमाई, अगे काय झाला ? चक्कर कशी इली ? सकाळपासून काय खावक नाय वाटता. पिंट्या आवशीक जरा चुलीत आग करून जेवाण गरम करून माई आजयेक वाढुक सांग".

"अरे झिला नको रे माका जेवक. घराकडे हे उपाशी आसत. माका जावक होया. चलतय मिया हळूहळू".

"अगे काकांची काळजी तिया नको करू. मिया पिंट्याक पाठयतय तुझ्या घराकडे आणि काकांना जेवन घेवक सांगतंय"

हे ऐकल्यावर आजीच्या डोळ्यात पाणी आले. ती पदराला डोळे पुसत रडू लागली. भाऊला काहीच कळे ना काय झालं ते. तो पण घाबरला आणि विचारू लागला, 'माई अगे काय झाला ? तिया रडतय कित्या ? तिया रडतय कित्या ? तिया आधी गप रव आणि सांग मगे काय झाला ता"

माई बऱ्याच वेळाने शांत झाली आणि सांगू लागली की, "अरे झिला काका कशे जेयतले, घरात काय केल्ला असला तर खातले मा. काल पासून चूल पेटाक नाय हा घरात. चाय आणि बिस्कीट खातो दोघाय काल दुपारपासून. आज तरी बोंडवाची गाडी इल्ली आसती तर तुज्याकडसून तांदूळ गोटे नेवन कायतरी शिजयलय असतंय".

"अगे माझ्या आवशी, तुका काय होया होता तर घेवन जावचा होता मगे. मिया काय तुझ्याकडे सोमते पैशे मागलय असतंय ? "

"अरे तुका काय म्हायती नाय काकांचो स्वभाव. उपाशी रवतीत पण कोणाकडे कधी हात पसरुचे नाय आणि माकाय मागाक देवचे नाय. "

"होय गे बाये, पण गरजेक एकमेकांच्या उपयोगाक नाय इलो तर काय फायदो. आधी तुका काय होया ता घेवन जा आणि बापाशीक माझ्या जेवक करून घाल. मगे सावकाश काय झाला ता सांग. थांब पिंटो येयत सामान घेवन सायकलवरसून, तिया चलतचलत जा हळूहळू. जमात मा काय मंगेशाक बोलव रिक्षा घेवन".

"नको रे रिक्षा मिया जातंय चलत, अस म्हणत आजी अगदी गरजेचं सामान भाऊला द्यायला सांगते आणि पैसे लवकर देते अस सांगून घरी जाऊ लागते.

भाऊ सगळं सामान बांधून घेतो आणि पिंट्याला न पाठवता स्वतःच सामान घेऊन माईआजी च्या घरी जातो. माई पटापट वरणभात बनवते आणि स्वतःला आणि काकांना जेवण देते. सोबत भाऊला पण देते जेवण. भाऊ बोलता बोलता विषय काढतो," माई काय झाला? काय अडचण आसा तर सांग मगे. अशी दोघायजणा उपाशी रवा नकात. पैश्याची अडचण आसली आणि माझ्या दुकानातसून काय सामान होया आसला तर बिनधास्त येवन घेवन जा. मिया काय सोमते पैशे मागतय तुमच्याकडे. जमितीत तसे दिया".

"होय रे झिला म्हायती आसा. पण हेंका कोणाकडे उधारी मागाची म्हणजे जीवार येता. मिया मागतंय म्हटलय तरी माकाय अडयतत."

"काय ओ, माझ्याकडे मागाक पण लाज वाटता तुमका. अहो तुमी फसोवच्यात नाय ह्येची खात्री आसा माका."

आता काका बोलतात की, अरे आमी नाय रे फसोवचो पण आता आमचोच भरोसो नाय आमकां. पिकलेली पाना आमी, कधी गळान पडू काय म्हायती. तेवा आमच्यान जेवढा झेपात तितक्याच करूचा असा ठरयला आमी. उद्या आमी दोघाय एकदम ढकाललो तर तुमची उधारी कोण चुकयतला. आमच्या मागसून कोण नाय जा येवन तुमचे पैशे दियत. तेवा पुता माझ्या तिया राग धरू नको पण आयुष्यभर कोणाचा फुकटचा खावक नाय आणि आता मरताना पण ता नाय करूचा हा.

भाऊच्या डोळ्यात पाणी येतं, तरीही स्वतःला सावरून घेत माई आणि काकांना धीर देत सांगतो की, "काका माका काय म्हायती नाय काय तुमचो स्वभाव. पण तरी कधी काय लागला तर हक्कांन तुमचो झिल म्हणांन हाक मारा. माझ्याकडसून जमात ती मदत नक्की करीन. नुसतो झिला आणि पुता म्हणा नकोत."

असं म्हणत बाहेर पडतो आणि स्वतःलाच प्रश्न विचारू लागतो, किती भयंकर परिस्थिती ओढवली आहे या देवमाणसांवर. आयुष्यभर ताठ मानेने जगले, एकुलता एक मुलगा त्याला भरपूर शिकवलं, पाण्यासारखा पैसा खर्च करून परदेशी शिक्षणासाठी पाठवलं. तोही मन लावून अभ्यास करून परीक्षा पास झाला आणि तिथेच नोकरी करू लागला. परदेशात एवढा रमला की परत गावाला यायचं त्याला भानच नाही राहील. गावी आपले वृद्ध आईवडील आहेत हे तो जणू विसरूनच गेला. सोबत शिकत असलेल्या एका मुलीबरोबर तेथेच लग्न करून कायमचं तिथल्या देशाचं नागरिकत्व स्वीकारून परदेशवासीय झाला. सुरुवातीचे काही दिवस नित्यनियमाने आईवडिलांना घरखर्चाला पैसे पाठवत होता नंतर खर्च वाढल्याचे कारण सांगून तेही पाठवणे बंद केले. इथे या उभयतांनी आंबे-काजू विकून जे काही मिळेल त्यात आपली गुजराण चालू ठेवली. पण ते तरी किती पुरणार, मग असे कधीतरी चहाबिस्किट तर कधी पाणी पिऊन दिवस ढकलू लागले.

दुसऱ्या दिवशी माई परत भाऊच्या घरी आली आणि बोंडवाच्या गाडीची काय खबर मिळाली का म्हणून चौकशी करू लागली. भाऊने पण नाही म्हटल्यावर ती काहीशी सुन्न झाली. भाऊने पुन्हा विचारल्यावर सांगू

लागली की, "अरे भाऊ तो पात्राव मागच्या आठवड्याचे बोंडवाचे पैशे सोमवारी दितलो असतो. त्या पैश्याच्या भरोश्यार मिया घरात राशन भरतलय असतंय. आता पात्राव असो कधी चुकना नाय, एक दिवस नाय इलो तरी दुसऱ्या दिवशी नक्की येता. पण आज बुधवार झालो पण तेची काय बातमी नाय म्हणांन भय वाटता रे. आता तुझेपण पैसे देवचे आसत. हेंका आजून सांगाक नाय मिया काय, नायतर वगीच जीव घालयतले. काजीय सुकाक नाय, तेतरी नेवन इकलय असतंय तर."

"माई तिया माझ्या पैशाची काळजी करू नको. मिया मागलय तुझ्याकडे? कोणतरी गोयाक जाणारो गावलो तर मिया सांगतंय चौकशी करूक नायतर. मिया कोणाकतारी घेवन जायन गोयाक आणि शोधीन त्या पात्रावाक आणि त्या गाडयेक. तिया नको भिया मिया आसय मा. अगे माझे पण मागच्या आठवड्याचे आसत पैसे घेवचे त्या पात्राव कडसून. तिया आता गप घराक जा आणि काकांची काळजी घे. सगळा नीट होतला"

भाऊने माईला समजवून घरी पाठवलं आणि कोणी गोव्याला जाणारा मिळतोय का ते बघू लागला. पण दुर्दैवाने त्या चार-पाच दिवसांत कोणीच नाही मिळालं. आणि शोधणार तरी कुठे होता. असेच आठ दिवस निघून गेले आणि एका दुपारी टेम्पो थांबल्याचा आवाज आला. भाऊला वाटलं की बोंडवाची गाडी आली म्हणून तो धावत बाहेर जायला उठला पण कदाचित हल्ली नेहमीप्रमाणेच होणारा भास असेल असं समजून पुन्हा जाग्यावर बसला. पुन्हा हॉर्न वाजला आणि मागोमाग आवाज आला, "भाऊ खय रे गेलंय? निजलय की काय? असो सामको भायर ये."

हा तर पात्रावचा आवाज आहे हे भाऊने ओळखले आणि क्षणार्धात बाहेर आला. बघतो तर काय तीच बोंडवाची गाडी आणि पात्राव टेम्पोत बसलेला. भाऊ बोलला की, "अरे पात्राव ये खाली, वायच चाय घेवया".

"भाऊ खाली नाय रे उतराक जमाचा. आणि उतारलय तर परत चढाक नाय जमाचा गाडयेत".

"अरे पण झाला तरी काय? असा म्हणत भाऊन जावंन गाडयेचो दरवाजो उघडल्यानं आणि बघता तर काय पात्रावच्या पायाक प्लास्टर होता आणि हातात काठी.

"अरे हयता काय झाला पात्राव?"

त्यावर पात्रावने सगळी घडलेली घटना भाऊला सांगितली. त्यानंतर पात्राव बोलला की भाऊ मला आधी त्या माईच्या घरी घेऊन चल. तिला भेटायचं आहे मला. तिचे बिचारीचे पैसे द्यायचे आहेत. कशी राहिली असेल काय माहीत एवढे दिवस.

"होय रे तुझी खूप आठवण काढता रोज. मिया मदत केलंय तिका जमात तशी. पण माई आणि काका तसे स्वाभिमानी माणसा, फुकटचा किंवा कोणाचे उपकार घेवन जगणारी माणसा न्हय. एकुलत्या एका झिलान फसयल्यानं. एक रुपयो नाय पाठयना त्या म्हाताऱ्यांका. अत्यंत खराब दिवस जगतत बिचारी दोघाय. आता तुका बघून वायच धीर येयत त्या दोघांका."

भाऊ पात्रावला घेऊन माईआजीच्या घरी जातो. दारात टेम्पो थांबला ते बघून माई बाहेर आली आणि कोण रे इला म्हणून विचारू लागली.

पात्राव जमत नसताना, त्रास होत असताना सुद्धा गाडीतून खाली उतरला आणि जाऊन माईच्या पायाला स्पर्श करण्याचा प्रयत्न करत बोलला की,

"माई माफ कर गे झिलाक तुझ्या. तुझे हक्काचे पैसे देवक खूप वेळ लायलय".

शेवटी आईचा काळीज ता, भले सख्खा मुलगा नसेल तो पात्राव पण ज्या काळजीने त्याने माईला हाक दिली त्या हाकेने ती हेलावली आणि त्याची अवस्था बघून विचारू लागली,

"अरे ते पैसे मरांदे, तुझ्या पायाक काय झाला? खय पडलंय? मेल्या बघून चलोक येना नाय गाडी. कोणाक ठोकलय?"

माई अगे मिया नाय गे कोणाक ठोकुक. शुक्रवारी रात्री बोंडू घेवन गेलंय आणि रविवारी आमकां सुट्टी होती म्हणांन बाजारात मासे आणूक गेलंय. मासे घेवन बाजारातसून भायर ईलय आणि स्कुटर वर बसतलय इतक्यात मागसून एक कारवालो इलो आणि तेंनी उडयल्यानं फुटबॉलसारखो. तर नेमको पायाक मार लागलो. हाताक वायच खरचाटला आणि नशीब बरा म्हणांन जिवंत रवलंय. आठ दिवस हॉस्पिटलमध्ये होतंय कालच डिस्चार्ज गावलो. मी हॉस्पिटलमध्ये असल्यामुळे आमची गाडी पण बंद ठेयली आठ दिवस. आजच भायर पडलो. माका सगळ्यात जास्त काळजी माई तुझी होती. माफ कर गे आवशी माझ्यामुळे खूप त्रास झालो तुका.



"अरे नाय रे झिला. पैश्याची गरज तर होती रे आमकां पण तुका काय झाला असता तर तुझें आवस बापुस उघड्यार पडले असते मरे. म्हातारी आवस एकटी काय काय आणि खय खय बघतली असती रे. घरातल्या कमावत्या माणसानं पाठ फिरयली काय कशी हालत होता ता माझ्याशिवाय कोणाक म्हायती असतला. आज आमचे हे असे जाग्यार बसले म्हणांन माका अशी वणवण करूची लागता. जी होती ती मिळकत सगळी झिलाच्या शिक्षणाक आणि नोकरेक खर्च केल्यानी. आता एका येळेच्या जेवणाक महाग झालो आम्ही"

"धन्य आसय तिया माऊली. पण गरजेक कोणाची मदत घेवक काय हरकत आसा. पैसे इले काय देव होये परत"

"नको रे झिला. आमच्यार लोकांचो इश्वास आसात रे पण आता आमचो स्वतःचो स्वतार इश्वास नाय हा. कोणाचे चार पैसे घेतले तर रात्रभर झोप लागना नाय. म्हणांन असे दिवस ढकलता"

"धन्य आसात तुम्ही दोघाय माऊली, साष्टांग नमस्कार तुमका. पण ह्यो पात्राव आज तुमका शब्द देता, कधीय काय लागला तर बिनधास्त सांगा. पैसे नसतीत तर भाऊकडे जावन बिनधास्त मागान हाड. उपाशी रवा नकोत. तुमचो एक झिल फॉरेनाक गेलो तरी ह्यो झिल आसा हयसर. मिया मरापर्यंत तरी भीती नाय आता तुमका. उरलेला आयुष्य आता तुमका सुखात काढुचा आसा. बोंडू संपले तरी ही बोंडवाची गाडी घेवन मिया आठवडयातसून एकदा तरी जेवक येतलय. घालतलय मा जेवान माका?."

"होय रे पोरा, होया तेव्हा ये, आणि पॉटभर जेवन जा".

(बोंडवाची गाडी धूर सोडत निघून गेली, माई आणि भाऊ पाठमोरे बघत राहिले)

# आई

**निलेश बामणे**

नववीच्या वर्गात शिकणारी प्रतीभा आज वर्गात अस्वस्थ दिसत होती. वर्गात शिक्षक फळयावर काय शिकवित आहेत याकडे तिचं अजिबात लक्ष नव्हतं. ती कोणत्या तरी मोठया संकटात सापडल्याप्रमाणे चेहरा करून विचार करत गप्प बसली होती.नेहमीच गालाला सुंदर खळी काढून हसणा-या प्रतिभाचा उदास चेहरा पाहुन तिच्या मैत्रिणीही आपसात कुजबुज करू लागल्या होत्या "आज नक्कीच शाळेत येण्यापूर्वी प्रतिभाचं कोणाबरोबर तरी भांडण झालं असांव" पण तिला तिच्या दु:खाच कारण विचारण्याची हिंमत कोणाला होत नव्हती कारण प्रतिभा मुळातच खुप तापट स्वभावाची तर होतीच त्याचबरोबर विनाकारण विचारलेल्या प्रश्नांची उत्तर देणे तिला आवडत नसे. प्रतिभाचा स्वभाव तापट असूनही वर्गात सर्वांबरोबर हसून-खेळून वागत असल्यामुळे वर्गातील सर्वजणी तिच्या चांगल्या मैत्रिणी होत्या. वर्गात प्रतिभा अतिशय हुशारअसण्या बरोबरच वकृत्व आणि अभिनय याचीही तिला योग्य जाण होती. शाळेत होणाऱ्या वत्कृत्वआणि नाटयस्पर्धेत ती नेहमीच भाग घेत असे त्यात तिला बक्षीसही मिळत असे आपल्या यशाचे श्रेय प्रतिभा नेहमीच आपल्या आईला देत असे. ते देतानाती म्हणे, "माझ्या आईने मला नेहमीच मी मुलगी असूनही एखादया मुलाप्रमाणे स्वतंत्र दिलं ! ती नेहमीच माझ्याबरोबर माझी आई म्हणून नव्हे तर मैत्रिण म्हणून वावरली. माझ्या आवडी निवडी तिने जोपासल्या. माझ्या यशा - अपयशा पेक्षा तिन मला अधिक महत्व दिल म्हणून माझी आई मला वेगळी वाटते. माझ्या आईने माझ्याकडून कोणत्या अपेक्षा केल्या नाहीत कारण तिला खात्री आहे तिची प्रत्येक अपेक्षा पूर्ण करण्यास तिची मुलगी नक्कीच समर्थ आहे."

**आपल्या मुर्खपणाबद्दल स्वत:ला दोषदेत प्रतिभा स्वत:शीच म्हणाली,"स्वप्नीलने आपल्याला हे काही पहिलं प्रेम पत्र लिहलं नव्हतं. त्याने पहिल्यांदा जेव्हा आपल्याला प्रेमपत्र लिहलं तेव्हाच त्याला पुन्हा तसं न करण्याची सूचना दयायला हवी होती.**

प्रतिभाच्या मैत्रिणी समजत होत्या तसं प्रतिभाचं शाळेत येण्यापूर्वी कोणाबरोबर भांडण वगैरे झालं नव्हत. तिच्या दु:खाच कारण थोडं वेगळच होतं. प्रतिभाच्या शाळेतच दहावीच्या वर्गात शिकणा-या स्वप्नीलने तिला प्रेमपत्र लिहल होत. रात्री झोपता-झोपता ते पत्र ती वाचत होती. पत्र वाचुन झाल्यावर ते उशाखाली ठेवून ती झोपी गेली. सकाळी उठल्यावर ते उचलून दुसरीकडे ठेवायला ती विसरली. शाळेत आल्यावर तिला त्या पत्राची आठवण आली. आता अंथरूण सरळ करताना ते आईला सापडले आणि आई ते पत्र बाबांना दाखवेल तर? आई-बाबा आपल्यावरील अतिविश्वासाबद्दल आणि आपल्याला दिलेल्या अवास्तव स्वातंत्रबद्दल स्वत:ला दोष देतील. कदाचित उद्यापासून आपल्यावर अनेक बंधनेही लादली जातील ते पत्र स्वप्नीलच्या आईबाबांना दाखवून त्यालाही ताकीद दिली जाईल, कदाचित आतापर्यंत गुलदस्त्यात

असणार आमच प्रेम चोहीकडे उधळलं जाईल. आम्ही दोघं आमच्या मित्र-मैत्रिणींच्या टीकेचा विषय होऊ असा विचार मनात मनात येऊन प्रतिभा अस्वस्थ होत होती. शाळा सुटायला पाच-दहा मिनिटे असताना प्रतिभा अधिकच अस्वस्थ झाली शाळा सुटल्यानंतर तिचे पाय वर्गातून बाहेर पडत नव्हते पणशेवटी नाइलाजाने वर्गातून बाहेर पडून घराच्या दिशेने चालू लागली. जस जसे तिच घर जवळ येऊ लागलं तस तसे तिच्या हृदयाचे ठोके वाढू लागले. तिनेघरात पाऊल ठेवताच नेहमीप्रमाणे आईने तिच दप्तर घेतल. तिचे हात पाय धुवून झाल्यावर तिला जेवण वाढलं क्षणभर प्रतिभाला वाटलं आईला चिठ्ठी सापडली नसावी म्हणूनच आईच्या वागण्यात काही बदल झाला नाही. जेवण झाल्यावर संपूर्ण खोली पालथी घालूनही तिला ती चिठ्ठी सापडली नाही त्यामुळे प्रतिभा अस्वस्थ झाली. त्या अवस्थेत ती तेथेच बिछान्यावर आडवी झाली आणि गाढ निद्रेच्या अधिन झाली. संध्याकाळी झोपेतून जाग आल्यावर तिच्या मनात अनेक विचार थैमान घालू लागले. ती स्वतःशिच म्हणाली स्वप्नीलची चिठ्ठी आईला सापडली असणार यात शंका नाही. पण ती सापडूनही आईच्या स्वभावात बदल झाला नाही म्हणजे केला नाही ! याचा अर्थ रात्री बाबा आल्यावर बरसण्याचा विचार दिसतोय.



आपल्या मुर्खपणाबद्दल स्वतःला दोषदेत प्रतिभा स्वतःशीच म्हणाली, "स्वप्नीलने आपल्याला हे काही पहिलं प्रेम पत्र लिहलं नव्हतं. त्याने पहिल्यांदा जेव्हा आपल्याला प्रेमपत्र लिहलं तेव्हाच त्याला पुन्हा तसं न करण्याची सूचना दयायला हवी होती पण तस मी केल नाही कारण त्यान प्रेमपत्रात माझ्या सौंदर्याच केलेल वर्णन वाचून मला स्वतःलाच माझ्या सौंदर्याचा हेवा वाटू लागला होता. स्वप्नील आपल्या प्रेमात पडण्याला आपणच तर जबाबदार होतो. त्याने लिहलेल्या नाटकात आपण त्याचाच हिरोईनचा रोल केला नसता किंवा त्याच्या अभिनयाला सतत दाद देण्याबरोबर स्वतःकडे काही न राखता अभिनय केला नसतातर तो आपल्यावर मोहीत झाला नसता. आपल्या सौंदर्यापेक्षाही आपल्या अभिनयावर त्याचं जास्त प्रेम आहे ही गोष्टनाकारता येणार नाही. आपणही स्वप्नीलच्या सौंदर्यावर मोहीत झालो होतो म्हणून सतत त्याच्या संपर्कात रहाण्याचा प्रयत्न करत होतो पण त्यावेळी आपण त्याच्या प्रेमात वगैरे पडलोय याची जाणीव झाली नव्हती. पण स्वप्नीलने प्रेम पत्रे लिहील्यावर ती वाचून आपण स्वप्नीलच्या प्रेमात पडलोय याची जाणीव झाली. म्हणून आपण त्याच्या प्रेमाला विरोध करण्याऐवजी त्यांच्या

प्रेमाला अबोल प्रतिसाद देत राहिलो त्याचाच हा परिणाम आहे. या विचारात गुंग असतानाच प्रतिभाची आई चहा घेऊन आली. चहा पिऊन झाल्यावर प्रतिभा फ्रेश होऊन आभ्यासाला बसली. थोडयावेळाने प्रतिभाचे बाबा ऑफिसमधून आल्यावर प्रतिभाच हृदय धडधडू लागल. पण! आई तिच्या बाबांना काहीच न बोलल्यामुळे प्रतिभाला आश्चर्यवाटलं. रात्री जेवण झाल्यावर उलट प्रतिभाच्या बाबांनी प्रतिभाच्या आवडीच आईसक्रीम तिला आणून दिल. रात्री झोपण्यापूर्वी जेव्हा प्रतिभाची आई तिच्या खोलीत आली तेव्हा ती धास्तावली पण! तिची आई तिच्या डोक्यावर हळूवार हात फिरवून गालात गोड हसून गुडनाईट करून झोपायला गेल्यावर प्रतिभाला काही कळेनास झाल. त्यानंतर स्वप्नीलन प्रतिभाला पुन्हा कधी प्रेमपत्र लिहले नाही कारण त्याच्याच दुस-या दिवशीपुन्हा आपल्याला प्रेमपत्र न लिहण्याची ताकीद स्वप्नीलला देण्याबरोबर मी फक्त एक मित्र म्हणून तुझा आदर करते असं प्रतिभानं स्वप्नीलला स्पष्टपणे सांगितलं होत. त्यानंतर प्रतिभाच शालेय शिक्षण पूर्ण होऊन प्रतिभा कॉलेजला जाऊ लागली. कॉलेजला शेवटच्या वर्षात शिकत असताना कॉलेजमध्ये झालेल्या नाटयस्पर्धेतील प्रतिभाचा अभिनय पाहून एका निर्मात्याने आमच्या



नाटकात काम करशील का? म्हणून विचारणा केली असता तिन चटकन होकार दिला. त्या निर्मात्यानं तीला आपल्या नाटकाचा लेखक, दिग्दर्शकआणि अभिनेता म्हणून स्वप्नीलची ओळख करून दिली. जवळ-जवळ चार-पाच वर्षानंतर स्वप्नीलला पाहून प्रतिभा चक्रावली कारण स्वप्नील नावाच्या एका अल्लड मुलाच एका परीपक्व तरूणात रूपांतर झालं होत. जो आता पूर्वीपेक्षाही सुंदर दिसत होता. क्षणभर प्रतिभाच्या चेहऱ्यावरून चोरीला गेलेल हसू पुन्हा तिला गवसलं याची जाणीव तिच्यासह सर्वांना झाली. थोडयाच दिवसात नाटकाचा पहीला शो ही झाला. नाटकाला प्रेक्षकांचा उत्सपूर्त प्रतिसाद मिळाला. नाटक संपल्यावर प्रतिभाची आई प्रतिभाला म्हणाला,तुझ्या नाटकापेक्षा तुझ्या नाटकाचा हिरो मला खुपच आवडला. एक दिवस त्याला आपल्याकडे जेवायला का बोलवत नाहीस. आईच्या सांगण्याप्रमाणे प्रतिभाने स्वप्नीलला जेवायला आमंत्रण दिले असता एका रविवारी तो प्रतिभाच्या घरी गेला तेव्हा प्रतिभाच्या आईच्या पाया पडून म्हणाला, आज मला जे काही यश मिळाल आहे त्याच सारं श्रेय तुम्हाला जातं ! त्यावेळी तुम्ही मला योग्य ती समज देऊन माझ्यातील कलेची जाणीव करून देत माझं कर्तव्य पटवून दिल नसत तर कदाचित मी आज एवढा यशस्वी होऊ शकलो नसतो. हे दाराआडून ऐकणा-या

प्रतिभाला काही कळेनास झालं. जेवण झाल्यावर प्रतिभा स्वप्नीलला सोडून येण्याचा बहाणा करून त्याच्याबरोबर निघाली. रस्त्यात ती स्वप्नीलला म्हणाली, "तुझ्या यशाचं श्रेय तू माझ्या आईलाका देतोस? मी दाराआडून सारं ऐकलय ! आज तुला ते सांगावच लागेल." त्यावर स्वप्नील हसून म्हणाला. तुला आठवतं मी तुला प्रेमपत्र लिहल होत आणि ते तुझ्या आईला सापडल होत. त्यानंतर दुसऱ्या दिवशी तू जेव्हा मला तुला प्रेमपत्र न लिहण्याची ताकीद दिलीस आणि त्यानंतर मी पुन्हा कधी तुझ्या वाटेला गेलो नाही. तू मला पुन्हा भेटेपर्यंत.

तुला असं वाटत असेल की तू मला ताकीद दिल्यामुळे मी पुन्हा पत्र लिहिले नाही किंवा भेटलो नाही पण तसं नव्हतं. त्याच्या दुसऱ्या दिवशी तुझी आई आपल्या मुख्याध्यापकांची खास परवानगी काढून मला भेटली. मी तुला लिहलेल पत्र त्यांनी माझ्या हातात दिल ते पाहून माझे पाय थरथरु लागले तेव्हा माझ्या खांदयावर हळूवार प्रमाने हात ठेवत तुझी आई म्हणाली, तुझं शाळेतील शेवटच वर्ष आहे. तेव्हा अभ्यासाकडे लक्ष दे! मला माहीत आहे तू चांगला लेखक - अभिनेता आहेस पणजर तुला खरोखरच एक मोठा लेखक - अभिनेता व्हायचं असेल तर शिक्षणाचीही गरज आहे. मला माहीत आहे एक मोठा लेखक - अभिनेता होण हे तुझ स्वप्न असणार मग ! असं प्रेमपत्र लिहीण्यात वेळ वाया घालवण्याऐवजी आपलं स्वप्न कसं पुर्ण होईल याचा विचार करण्यात वेळ घालव. भविष्यात जर तुझ स्वप्न पूर्ण झाल तर प्रतिभासारख्या कितीतरी तरुणी तुझ्यासमोर रांगेत उभ्या राहतील. मला खात्री आहे तू नक्कीच यशस्वी होशील ज्या दिवशीतुला भरभरुन यश मिळेल तेव्हा तुला आपला जावई करुन घेण्यास माझ्यासारख्या कितीतरी जणी उत्सुक असतील. तुला वाटत असेल तुझ्या आणि प्रतिभाच्या मैत्रिला माझा विरोध आहे पण तस अजिबात नाही पण तुमच्या प्रेमाला माझा विरोध आहे कारण प्रेमाचा खरा अर्थ कळल्याखेरीज प्रेमात पडणं हा निव्वळ मुर्खपणाच ठरतो. ज्या दिवशी तुम्ही दोघ खऱ्या अर्थाने प्रौढ व्हाल आणि प्रेमाचा खरा अर्थ तुम्हाला उमगला असेल त्या दिवशी तुमच्या प्रेमाला माझा नक्कीच विरोध नसेल. त्यानंतर शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर अभ्यासाबरोबर मी अभिनयाकडे जास्त लक्ष केंद्रीत केलं आणि ते करता करता मी सतत तुझ्या आईच्या संपर्कात राहीलो. त्यामुळे योग्यवेळी तुझ्या आईच योग्य मार्गदर्शन मला मिळत राहिलं. तुझ्या आईनेच एका नाटय निर्मात्याबरोबर माझी ओळख करुन दिली आणि त्यानंतर मला मागे वळून पाहण्याची गरज भासली नाही. आपल्या दोघांची पुन्हा भेट घडवून आणण्यात तुझ्या आईचाच हात आहे. त्यांच्या सांगण्यावरून आपल्या नाटकाच्या निर्मात्यांनी तुला नाटकात काम करशील का म्हणून विचारणा केली. तुला आश्चर्य वाटेल पण आपल्या नाटकाचे निर्माता विजय जाधव तुझ्या बाबांचे वर्गमित्र आहेत. तू कॉलेजला जाऊ



लागल्यानंतर तुझ्या चेहऱ्यावरील उदासी सतत तुझ्या आईला जाणवत राहिली. ती असह्य झाल्यावर एक दिवस तुझी आई मला म्हणाली, तू प्रतिभाला पुन्हा भेट आणि



तिच्या चेहऱ्यावरून चोरीला गेलेल हसू तिला परत कर पण तेव्हा मी स्पष्ट नकार दिला होता कारण तोपर्यंत मला प्रेमाचा खरा अर्थ समजला होता आणि तुला समजण्याची वाट पहात होतो. आज तुलाही प्रेमाचा खरा अर्थ नक्कीच समजला असेल पण माझ्यापेक्षा जास्त त्रास तुला सहन करावा लागला कारण मला माझं प्रेम मिळणार याची खात्री होती आणि तुला आपल प्रेम गमवल्याचं दु:ख होत. तुझ्या आईने आपल्या दोघांना सावरण्याबरोबर आपल भविष्यही सुरक्षति केल. ते करताना आपल प्रेमही यशस्वी होईलयाची दक्षता घेतली. खरंच तुझ्या आईसारखी आई नशिबानेचमिळते. त्यावर प्रतिभा पाणावलेले डोळे पुसून गालात गोड हसत प्रतिभा म्हणाली "हो ! हे खरंच !! माझी आई जगात भारी" !!!



## जरा हसा पाहू

### टूथ ब्रश

**एका डॉक्टरचा प्रश्न :** टूथ ब्रश किती दिवसांनी रिटायर केला जातो.

**चायनीज व्यक्ती :** १ आठवडा

**ब्रिटिश व्यक्ती :** १ महिना

**अमेरिकन व्यक्ती :** ३ महिने

**भारतीय व्यक्ती :** भारतात तर टूथ ब्रश कधीच रिटायर होत नाही.

सर्वात आधी दात स्वच्छ करण्याच्या कामी येतो मग हेअर कलर करण्याच्या कामी येतो.

त्यानंतर मशीनच्या स्वच्छतेच्या कामी येतो आणि जेव्हा त्याचे केस गळतात तेव्हा पायजम्याचा नाडा टाकण्याच्या कामी येतो.



### थंडी

**पत्नी :** कुठे जात आहात.

**पती :** मरायला चाललोय सुसाइड करीन.

**पत्नी :** कुठेही जा पण स्वेटर घालून जा बाहेर खूप थंडी आहे. आजारी पडल्यावर तुमची खैर नाही.

# मुलांच्या प्रगतीसाठी अंमलात आणा या वास्तू टिप्स...

★ घरामध्ये नकारात्मक शक्ती प्रवेश करू नये म्हणून मुख्य दरवाजा जवळ तुळस असणे आवश्यक आहे.

★ दरवाजाच्या चौकटीवर आतून बाहेरून विघ्नहर्त्याची म्हणजेच गणपतीची टाईल्स लावणे आवश्यक आहे.

★ घराच्या प्रत्येक रूममध्ये खडे मिठाचा बाऊल ठेवावा.

★ आठवड्यातून एकदा खडे मिठाच्या पाण्याने फरशी पुसणे यामुळे घरामध्ये सुखसमृद्धी राहते.

★ मुलांची शैक्षणिक प्रगती चांगली होण्यासाठी त्यांना पूर्वेला डोके आणि पश्चिमेला पाय करून झोपवावे.

★ मुलांच्या उत्तम शैक्षणिक प्रगतीसाठी पूर्वेला तोंड करून अभ्यासाला बसवावे.

★ लहान मुलांना घराच्या नैर्ऋत्य दिशेमध्ये झोपवू नये. त्यामुळे त्यांच्या शैक्षणिक प्रगतीत अडथळे येऊ शकतात.

★ घरामध्ये पैसा, संपत्ती, ऐश्वर्य टिकवून ठेवण्यासाठी घराच्या नैर्ऋत्य दिशेमध्ये तिजोरी किंवा पैशाचे कपाट ठेवावे.

★ घरामध्ये शैक्षणिक, आर्थिक प्रगती व्हावी यासाठी भडक रंगाचे कपडे वापरणे टाळावे.

★ ईशान्य दिशेला वास्तुदोष असेल तर मुलांच्या शिक्षणावर आणि आरोग्यावर खूप वाईट परिणाम होतात.

★ नवीन घर बांधताना किंवा विकत घेताना घराचा आकार आयताकृती किंवा चौकोनी असावा.

★ मुलांच्या उत्तम शैक्षणिक प्रगतीसाठी सरस्वतीचे प्रज्ञावर्धन स्तोत्र आणि गणपती अथर्वशीर्ष मुलांनी रोज म्हणावे.

★ उत्तम वैवाहिक आयुष्यासाठी नवरा-बायकोने दोन जोडलेल्या बेडवर झोपू नये.

★ नवीन घर घेताना पहिल्या व शेवटच्या मजल्यावरचे घर विकत घेणे टाळावे.

★ आरोग्यदायी जीवनासाठी घरामध्ये पिवळा, काळा, लाल हे रंग कोठेही येऊ देऊ नये.

★ घर बांधताना यशस्वी जीवनासाठी नैर्ऋत्य दिशेला बोअरिंग, विहीर, पाण्याची टाकी बांधू नये.

★ दक्षिणेला पाय करून झोपू नये. कारण आरोग्य, पैसा यांची हानी होते व मानसिक ताण येतो.

★ घराच्या मुख्य दरवाजाजवळ उतरता किंवा चढता जिना असेल तर अनेक वाईट घटनांना सामोरे जावे लागते.

★ घराच्या मुख्य दरवाजासमोर लिफ्ट असेल तर घरामध्ये आर्थिक, शारीरिक व मानसिक हानी होते.

★ हिंस्त्र पशु-पक्ष्यांची, जंगली जनावरांची तोंडे घरामध्ये लावू नयेत.

★ घरात किंवा घराच्या बाहेर काटेरी वनस्पती ठेवू नयेत.

★ उत्तम प्रगती हवी असेल तर काळ्या शाईचे पेन वापरू नये.

★ उत्तम प्रगतीसाठी तांब्याची अंगठी करंगळीशेजारच्या बोटामध्ये म्हणजेच अनामिकेमध्ये धारण करावी.

★ कोणतेही काम करताना प्रत्येक गोष्टीला हो म्हणावे. नकारात्मक बोलणे टाळावे.

# सत्यासाठी संघर्ष

**संतराम पाटील**

शनिवारची संध्याकाळची वेळ, दिवसभर राबराबुन गावातील बाया आणि गडी माणसं आप आपल्या घरात नुकतीच दाखल झालेली. कोण शेतातून आल्या आल्या गाई म्हशीची शेण मुत्र काढून धारा काढायच्या नादात; तर कोण काढलेल दुध डेरीला घालायला जायच्या नादात ,तर कोण दुध डेरीला घालून आपल्या घरी परतत होते. दिवस भरशेतात कामकरुन शिणुन आलेले हे लोक, आप आपली घरातील इतर काम करुन विश्रांती घेत होते. मी सुद्धा दिवसभराच्या कामामुळे दमून आल्याने घराच्या पुढच्या लगीवर चटई टाकून निवांत पडून टी व्ही वरच्या बातम्या पहात होतो. ईतक्यात हालगी कडकडायला लागली, हालगीचा आवाज कानावर पडताच मी टी. व्ही चा आवाज कमी केला. तर गल्लीत कृष्णा तराळाच्या हालगीचा ठोका चालू होता तसा हा कृष्णा पटीचा हालगी पट्टू होता. त्याच्या हालगीचा ठोका चालू होतातसा हा कृष्णा पटीचा हालगी पट्टु होता. त्याच्या हालगीचा ठोका भल्या भल्याना फेर धरून नाचायला लावायचा, म्हणून गावकरी त्याच्या हालगीच्या ठोक्याला दाद द्यायचे. आणि कृष्णाच्या भोवतीन जमायचे. लोक जमलेलेचा कृष्णा फायदा घ्यायचा आणि आपल्या दवंडीचा विषय सांगायचा. आजची दंवडी जरा विशेषच होती तो म्हणाला "ऐका हो ऐका . . . उद्या सकाळी दहा वाजता गाव पंचायतीत गाव सभा बोलीवलीया हो. . . . "

**आमच्या पोलीस स्टेशनच्या हदिदतील चाळीस गावातील दारूबंदी करणेचा निर्णय या पोलीस स्टेशनने घेतला आसुन, या गावातील दारूबंदी करावी.अशीमागणी समता सामाजिक संघटनेने अंदोलन करण्याचा इशारा ही दिला आहे.**

म्हणजे उद्याची गाव सभा थोडी महत्वाची असणार, हे मला जाणवलच. कारण सरकारने महिला साठी पन्नास टक्के आरक्षण केल्यामुळे, आमच्या गावचं सरपंच पद हे ओबीसी महीले साठी आरक्षति आसल्याने, गावची सरपंच म्हणून गावातील कोळ्याची शांताबाई झाली होती.

शांता ही पांडू कोळ्याची बायकु. शांता म्हणजे नऊवारी साडी, ती सुद्धा दोन्ही टांगेवर पायाच्या घोट्यापर्यंत सोडलेली. आणि कपाळावर लाल भडक कुंकवाचा मोठाच्या मोठा टिळा लावायची, ती दिसायला फार काय सुंदर नव्हती; पण ईतर बायकांच्या पेक्षा थोडी बोलकी होती. तिच्या घरची परिस्थिती सुद्धा फार चांगली नव्हती. पांडू कोळ्याचा गावातील तळ्यातील मासे विक्रीचा व्यावसाय होता. प्रत्येक वर्षी ग्रामपंचायत या तळ्यातल्या माशांचा लिलाव करायची, आणि गावात कोळ्याचं एकच घर असल्यामुळे प्रत्येक वर्षी हा लिलाव पांडू कोळ्यालाच मिळायचा. त्यामुळे पांडुची आणि गावातील राजकारणी पुढाऱ्याची फार सलगी होती. म्हणून तर सरपंच ओबीसी महिला झाल्यावर गावात सुतार, न्हावी कुंभार, अशी

ओबीसी घराणी आसताना, आणि या जातीतली मतांची संख्या आधिक आसुन ही गावातील सगळ्या पुढाऱ्यांनी विश्वासातला माणूस म्हणून त्याच्या बायकोला म्हणजे शांताला उमेदवारी देऊन सरपंच पद बिनविरोध निवडून आणलं होतं. आणि राहिलेल्या आठ जागांसाठी निवडणूक लावुन दोन्ही पार्ट्यांनी आपल्या जागा निवडून आणल्या होत्या. त्या पैकी तिन जागा केरबा पाटील गटाला तर पाच जागा श्रीरंग तांब्याच्या गटाला मिळाल्या होत्या. त्यामुळे श्रीरंग तांब्याच्या गटाचा उपसरपंच झाला होता. पण सरपंच शांताबाई मात्र दोन्ही गटाना मान्य आसलेली होती. त्यामुळे गावाचा कारभार तसा सगळ्याना विश्वासात घेऊन चालु होता.



गावात कुणाच्याही गटाची बाई जर निवडून आली, तर ती काय तिचा पाच वर्षाचा कार्य काळ संपेपर्यंत पंचातीचा उंबरठ्यावर सुद्धा पाय ठेवायची नाही. कारण खेडेगावात बायका शक्यतो घराच्या बाहेर कधीच पडायच्या नाहीत. मग प्रत्येक मिटींगची आणि ठरावावरील त्या पंच बाईची सही ही पंचायतीच्या शिपायानं तिच्या घरातून जाऊन आणायची. असा सर्व साधारण गावपंचायतीचा रिवाज होता. पण हि बाई त्याला आपवाद होती.

ग्रामपंचायतीच्या पहिल्याच मिटींग साठी पंचायतीचा हरीबा शिपाई तिच्या कडे सही साठी गेला आणि म्हणाला "शांताका मिंटीग ऊद्याच्याला हाय, मिटींग रजिस्टर वर तुमची सही पायजेल म्हणून शान आलुया"

तर ती म्हणाली कशी'सही काय माळावर पडलीया व्हय गा, हरीदादा पह्यला मिटींग कशासाठी हाय तीच सरक्युलर दाखीव ते वाचुन सही करतु."

तवा हरबा तिला म्हणाला "आता पतुर कोण इचारत नव्हतं, म्हणून शान मी फकस्त वहीच घीवून आलोया. तवा बिगीच्यान सहीकरा म्हणतुया."

"हे बघा हरीदादा तवा सरपंच मी नव्हते, दुसरं कुणी तरी सरपंच आसल. त्यो तेचा नियम आसल, आता म्या सरपंच हाय तवा मी सांगेन तशीच पंचायत चाललं. समजतय नव्हं"

हे आसं शांताबाई बोलताच हरबाचा नारबाचं झाला. त्याला तिच्या पुढं काय बोलायच हेचं कळणा. हरबा नेहमी प्रमाण काखेत प्रोसिडिंग घेऊन मिटींग झाली; आशीच सरपंच बाईची सही न्यायला आला होता. तरीही त्यातुन धाडसं करून त्यो सरपंच बाईला म्हणाला .

"हे बघं शांताक्का पंचायतीची मिटींग ही आशिच व्हुतीया. कोण कवा मिटींगला येतोय; प्रत्येकाच्या घरात जाऊनसह्या गोळा करून मी पंचायतीत न्हेतुया आणि गिराम सेवक साहेबास्नी देतुया हि आशिच रित हाय बगा"

"हे बघा हरीदादा ती रित या आधी आसल आता मी सरपंच हाय, आता रित बदलायची हाय."

आता हरी चांगलाच आडचणीत आला. त्याची

बोलती बंद झाली. तो सरळ पंचायतीकडे वळला. त्यान थेट ग्रामपंचायत गाठली. तो आजपर्यंत कधीच सरपंच बाईचीच काय ईतर पंचाच्या सुद्धा सह्या घ्यायला प्रोसिडिंग घेऊन पंचायतीच्या बाहेर गेला नाही. अशी शिस्त बाईनी ग्रामपंचायतीच्या कारभाराला लावली होती. पण ती शिस्त या बेशिस्त पुढारी लोकांना आवडत नव्हती. त्यामुळे प्रत्येक गावसभेत आणि पंचायतीच्या मासिक मिटींग मधे सरपंच विरूध्द ईतर पंच यांच्या मधे हंगामा व्हायचा. त्यात आणि बाईंचा दुसरा एक नियम; महिलांच्या जागी पुरूषाने मिटींग साठी यायच नाही. हे या पुढारी लोकांना अवघड जागेच दुकन झाले होते. ते म्हणजे बाई निवडुन आली, तर त्या जागी त्या बाईनच मिटींग साठी यायच ईतरांना प्रवेश नाही. त्यामुळे या पुढारी लोकांना मासिक मिटिंगला जायाची मोठी आडचण झाली होती. बाईंच्या या कार्यपध्दतीवर पुढारी नाराज आसल्याने बाईंच्यात व त्यांच्यात वैचारीक भिंत तयार झाली होती. त्यामुळे या गावसभेला थोडं महत्व आलं होत. गावात दवंडी देऊन गावसभेला जास्ती जास्त गावकरी उपस्थित ठेवण्याचा प्रयत्न सरपंच बाईंचा होता.

दुसऱ्या दिवशी रविवार आसल्याने गावात खडतर दिवस पाळतही होता. त्यामुळे लोकांनी सुद्धा गावसभेला जायाची तयारी केली होती. आणि दुसरा दिवस एकदाचा उजाडला गावाच्या मध्यभागी ग्रामदैवत जोमकाई देवीचे मंदिर आणि मंदिरा भोवती छान अशी फुलझाडांची वेगवेगळ्या सुंदर फुलांनी फुललेली बाग. ही मनोहरी बागसुध्दा या सरपंच बाईच्या कारकिर्दीत तयार केली होती. ती अलिकडेच फुलायला लागली होती. त्यामुळे देवळाचा परिसर मनमोहक असा वाटायचा. हा सगळा परिसर आज लोटून चकाचक केला होता. मंदिरासमोर आकर्षक अशी रांगोळी काढलेली होती. मंदिराच्या आवारात सप्तरंगी कापडी पडदे लावलेला मंडप सुद्धा उभारला होता. मंडपात दहा ते पंधरा लाकडी खुर्च्या टाकून त्या खुर्चीवर सरपंच उपसरपंच, ग्रामसेवक, पंचायतीचे सदस्य आणि गावातील काही प्रतिष्ठित व्यक्तींची नावे आसलेल्या कागदी पाट्या चिकटलेल्या होत्या. हे आसं का तर गावातील काही प्रसिद्धीस हपापलेले लोक खुर्चीवरची जागा पटकावतील आणि मग महिला सदस्य, मागासवगीर्य सदस्यांना जमिनीवर बसाव लागेल, म्हणून हा उपाय सभेच्या आधीच करून ठेवला होता. सभेची वेळ जसजसी जवळ आली तशी गावकऱ्यांनी सभा मंडपात गर्दी करायला सुरवात केली. पंचायतीचे ऑफिस जवळच होते. शिपाई आणि क्लार्क यांनी पंचायतीतील सभेस उपयुक्त दप्तर आणुन टेबलावर ठेवायला सुरवात केली. सह्यांचे रजिस्टर सभा मंडपात फिरवून सह्या घ्यायला सुरुवात झाली होती. एक एक आसे करत गावकरी येत होते या मधे महिला सुद्धा येत होत्या. त्यामुळे महिलांची बसायची व्यवस्था वेगळी आणि पुरूषांची वेगळी अशी वेगवेगळ्या जमिनीवर केली होती. मधुन यायला जायला वाट ठेवली होती. आता सह्यांचा कार्यक्रम संपत आला होता सभा मंडपात सरपंच सदस्य येणे बाकी होते. मंडपात सुरवातीला ग्रामसेवक काखेत काहीतरी दप्तर घेवून हजर झाले. नवी कोरी सफारी टाईप कपडे, डोळ्यावर रेबॉनचा गॉगल, हातात महागडया किमतीचा मोबाईल, चारी बोटात सोन्याच्या अंगठ्या, असा रुबाबातच आला होता. अखंड मंडपात हे एक रूबाबदार असं व्यक्तिमत्व होतं. त्याना रूबाबदार का म्हणायचं तर सभा मंडपात सगळे शेतकरी शेतमजुर लोक, गोरगरिब जळकटलेल्या चेहऱ्याने आणि मळकटलेल्या कपड्यात बसले होते. पाठोपाठ ऊवारी हिरव्या गडद रंगाची साडी कपाळावर भला मोठा कुंकवाचा टिळा लावुन पायात करकर वाजणाऱ्या चपल्या घालुन डौलदार थाटात दोन महिला सदस्या, एक मागास वर्गीय सदस्यासह हजर झाल्या त्या पाठोपाठ सगळे सदस्य हजर झाले. आणि आपल्या नावाची पाटी आसलेल्याच खुर्चीवर बसले.आणि

सभेला सुरवात झाली .

सुरवातीला उपसरपंच सयाजीराव तांबे यानी प्रास्ताविक केले, आणि ग्रासभेला आलेल्या सर्व गावकऱ्याचे स्वागत केले. ग्रामसभेचे पदसिध्द अध्यक्ष सरपंच बाईना सभेला सुरवात करण्याची सुचना केली. त्यांच्या सुचनेनुसार गावसभेला सुरवात झाली. ग्रामसेवक उत्तम साठे यानी कार्यक्रम पत्रिका वाचुन दाखवली. आणि मागील सभेचा इतिवृतांत वाचला. मागील सभेच्या सर्व जमा खर्च आणि कामांना सभेची मंजुरी घेतली. ऐन वेळेच्या विषयावर चर्चा करायला सुरवात केली. पहीलाच विषय पोलीस खात्याने पंचायतीला पाठवलेल्या पत्राचा घेतला ते पत्र सरपंच बाईनी ग्रामसेवक साहेबाना वाचुन दाखवायला सांगितले ग्रामसेवक उभे राहिले आणि वाचायला सुरवात केली ते म्हणाले "मा. सरपंच ग्रामपंचायत याना या पत्रातून आपणास आम्ही अशी विनंती करत आहोत की; आमच्या पोलीस स्टेशनच्या हदिदतील चाळीस गावातील दारूबंदी करणेचा निर्णय या पोलीस स्टेशनने घेतला आसुन, या गावातील दारूबंदी करावी. अशी मागणी समता सामाजिक संघटनेने अंदोलन करण्याचा इशारा ही दिला आहे. तरी हा विषय आपल्या गावच्या गाव सभेत मांडुन त्यावर चर्चा घडवुन पोलीस पाटलाकडून पोलीस स्टेशनला रिपोर्ट पाठवावा व आपल्या गावातील दारूबंदी तात्काळ करावी. अशी विनंती आम्ही करीत आहोत" ग्रामसेवक पत्र वाचुन खुर्चीवर बसले आणि चर्चेला सुरवात झाली सुरवातीला धनाजि सावंत उभा राहिला आणि म्हणाला 'हे आम्हाला मंजुर नाही, ते पतरच परत पोलीसासनी हुत तसं परत पाठवा" आसं त्यान म्हणताच सभागृहात हास्य कल्लोळ सुरू झाला. तर काही जन आपापसात चर्चा करायला लागले. तो पर्यंत उपसरपंच तांबे यानी सभागृहातील लोकांना शांत रहाणेचे आवाहन केले. आणि सभागृहात शांतता पसरली. लोक एकमेकांच्या तोंडाकडे बघायला लागले. आता गावातील पुढारी आणि त्यांच्या राजकारणाची खरी कसोटी होती. कोण कुणासाठी का आणि कशाला राजकारण करतो, हे गावाला बघायला, ऐकायला मिळणार होते. त्यामुळे प्रत्येक पंचायत सदस्य सावध हलचाली करीत होता. या गावच्या सरपंच पदावर जशी शांताबाई कोळी विराजमान झाली; त्यावेळी पासून गावात प्रत्येक प्रश्नावर राडाच झालेला गावान पाहीला आहे. आणि आज सुद्धा तो होणारच होता. कारण विरोधी राजकारण करणारे केरबा पाटील यांचे गावात देशी दारुचे दुकान होते. आणि आजच्या गावसभेत ते दारू दुकान बंद करणेचा ठराव करून तो तालुक्यात पाठवायचा होता. पंचायती मधे या गटाचे तीन सदस्य होते. ते काय पवित्रा घेतात यावर बरेच काही अवलंबून होते. पण ही गावसभा आसल्याने त्याना आज बोलता येत नव्हते. आज फक्त गावकरी मत मांडणार होते तसे सभेला आलेल्या मधे विरोधी गटाचे लोक सुद्धा



होतेच; त्यामुळे हा सामना रंगतदार होणार होता. आता गावातील दगडु नाईक चुळबुळ करत धोतराचा सोगा हातात धरून मोठ्याने ओरडत हातवारे करीत सरपंच बाईच्या कडे बघतच म्हणाला “हे आता जरा जास्तच व्हुतय बघ, गावात दारुच दुकान बंद करुन परगावला जाऊन दारु प्याची काय . . हे. . हे आसलं गावाला वळण बरं नाही बघा. . हं सरपंच बाई!!!”

हे दारुच्या दुकान मालकाच पाळीव पिलू होतं. हे सगळं गावकरी जाणुन होते, पण त्याची बायकु गंगुबाई सुद्धा सभेत हजर होती. तीला सुद्धा कड निघाला नाही. आणि गप्प बसली तर ती गंगुबाई कसली; डोक्यावर घेतलेला पदर कमरल खोचतच ती उठली. नि आपल्या नवरोबाकडे हातवारे करीत म्हणाली “सगळ्या गावाचा मक्ता काय हेनंच घेतलाय. सकाळ पसन संध्याकाळ पतुर ढोसतोय, गावभर धुंडाळत फिरतोय. हेला दुसर कायकाम हाय व्हय; हे बघा आया बाप्यानु ते दुकान चालु करा नायतर बंद करा. आमाला त्यात घिवुन पडु नगा. या माझ्या दाडल्याला काय आक्कल नाय, म्हणून शान सांगतुया !”

तिच्या या बोलण्याची साथ घेत सगळ्या महिला गोंधळ घालून बोलायला लागल्या. आणि दारू दुकान बंद करा, बंद करा, आसा आवाज सभा मंडपात घुमायला लागला. कोण बोलतय आणि कोण नाही याचा अंदाज यायला तयार नव्हता. परत उपसरपंच यानी सभागृहातील लोकांना शांत केले आणि शांतपणे आपली मते मांडायची सुचना दिली. परत सभागृह शांत झाले. सभागृहात दारूपिणारे किती हे मोजायला किती वेळ लागेल हे सांगता येत नव्हते. पण न पिणारे मात्र मोजता येत होते. हा विषय घेत एक जन म्हणाला प्रश्न पिणाऱ्या आणि नाय पिणाऱ्यांनी एका बाजुला थांबून रहावे.”

मग काय सांगता विसेक माणसं सभागृहात एका बाजुला होऊन उभी राहीली. पण त्यात सरपंच बाईचा नवरा होता. ही बाब प्रामुख्याने सगळ्या गावाला जाणवत होती. त्यामुळे सरपंच बाई काय भुमिका घेते हे महत्वाचे होते. कारण तिचा घरात कोणीही दारूच घेत नव्हतं. मग देवळाचा पुजारी म्हणाला “पोलीस काय बी म्हणतील,आज दारूच दुकान बंद करा म्हणत्यात, उद्या जेवु नगं म्हणतील, मग हे ऐकायचं काय सांगा लोकानु ”

“आहो . . . . . दारु नाही ते गाव कसलं आसं जग दुनियात तरं गाव हाय काय ?” एक जन म्हणाला

“आरं. . च्या ही काय बैदा झाली म्हणायची आगा ही दारु काय आज पैदा झाली काय? देवा दानवाच्या काळापासून हाय ही. हीला देवानी सुद्धा चौदाव रत्न म्हटलय. आगा हे ग्रंथात सुद्धा हाय ” दुसरा

“छे. . . छे. . . आसल्या फंदात कुणी पडायच नाही. ज्यो कोण पितोय त्यो पदरच्या पैशान पितोय. त्या पोलीसांच नि संघटणेचं काय जातय ; ते काय पैसे देणार हाईत काय ?. . का कोण आमच्या गावचा तेंच्याकडं पैसे मागाय गेलाय ? उगाच. . . काय तरी ” तिसरा म्हणाला

आता गोविंदा उठला नि म्हणाला “हे बघा हे सरकारी काम हाय, तसा पोलीसांचा हुकुम हाय, तवा दारुच दुकान बंद करुन टाकुया आणि सरकारला तसं कळवुया उगाच झोंबड कशाला गावात” तेला सदु परटान खाली खेचला, आणि आपण बोलायला लागला. दारु सरकारची, दारुचा कारखान्याला सरकारी परवानगी, पोलीस बी सरकारच, मग पोलीसासनी कळवा,सरकारला हे सगळेच बंद कराय सांगा म्हणूशान, आयला पोलीसांच बेस, दरवाजा मोकळा, नी न्हानीला बोळा.

“ये सदबा खाली बस कोण इचारतय ह्या सभेला, दारु बंद व्हायची नाय” लोकांनी आवाज दिला नी घोषणा बाजी सुरु झाली “नही चलेगी . . नही चलेगी. . . दारु बंदी . . . नही चलेगी” याला उत्तर म्हणून महीलानी सुद्धा घोषणा द्यायला सुरवात केली “दारु बंदी. . . झालीच . .

झालीच पाहीजे ? झालीच. . . पाहिजे. . दारुबंदी. .झालीच पाहीजे”

दारु पिणाऱ्याचे करायचे काय . . . खाली डोकं वर पाय आसा गोंधळ सुरु झाला. पण आता कोण कुणाच ऐकायला तयार नव्हतं. सभा संपायच्या मार्गावर होती. वातावरण तापले होते लोकांनी विचारलेल्या प्रश्नांना सभा अध्यक्षानी उत्तर द्यायचे काम बाकी होते. तोवर कुणी तरी सगळ्या सभागृहात चहा पाणी वाटपाचा कार्यक्रम राबविला होता. अर्थात हा चहा पंचायतीचा नव्हता. मग तो कुणी दिला याची आधिक चौकशी केली आसता आसं समजल, हा चहा देशी दारुचे दुकान दार केरबा पाटील यानी दिला होता. लोक मिंधे करण्यासाठी. म्हणजे ते खेळात डब्बल गेम करत होते. हे लक्षात यायला फार वेळ लागला नाही. आता लोकांनी विचारलेल्या प्रश्नांना आणि पोलीस स्टेशनच्या पत्रावर सभाअध्यक्षानी उत्तर द्यायची वेळ झाली होती. ग्रामसेवक घाई घाईने उठले आणि म्हणाले आता आपल्या समोर सरपंच मॅडम बोलतील ते आपण शांत पणे ऐकुन घ्यावे. सरपंच बाईनी आपल्या भाषणाला सुरवात केली “गावकरी बंधु भगीनीनो, आज तुम्ही या गावसभेला इतक्या संख्येने हजर राहिल्या बद्दल या गावची सरपंच म्हणून मी तुम्हा सर्वांचे सुरवातीला स्वागत करते. मी या गावची सरपंच झाले,तेच मुळात अपघाताने कारण कोणतीही निवडणूक लढवण्याची ऐपत माझ्या कुटुंबाची नाही. पण तुमच्या सगळ्या गावकरी मंडळीच्या कृपेने गावात आमच एकच कुटुंब असुनही तुम्ही मला निवडून दिलात, या बद्दल तुमचे खुप खुप आभारी आहे.



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सविधाना मुळे महीलाना पन्नास टक्के जे आरक्षण मिळाले, त्यामुळे या गावचे सरपंच पद ओबीसी महिला झाले. म्हणून मला सरपंच होण्याची संधी मिळाली. पण माझे सरपंच पद हे नेहमी वादातीत ठरले. बरे आसो आजची गावसभा जरी वेगवेगळ्या विषयावर झाली आसली तरी, या सभेचा मुख्य विषय दारूबंदी करणेचा आहे. याची चर्चा तुम्ही मघापासुन केली. तुम्ही खुलेपणाने चर्चा केली एकमेकांच्या मताना विरोध सुद्धा केला, या विरोधातुन काही चुकीच्या गोष्टी समोर आल्या. आणि खऱ्या आणि चांगल्या लोकोपयोगी गोष्टीना समाजातून होणारा विरोध कसा तिखट आसतो हे जाणवले. म्हणून काय आपण हिथंच थांबायच नाही. कारण आम्हाला या गावात संपुर्ण दारूबंदी करायची आहे त्या साठी कितीही विरोध झाला तरीही. म्हणुन हा ठराव पास झालाय आसं मी जाहीर करीत आहे. जर कुणाला या ठरावाला विरोध करायचा आहे त्यानी ग्रामपंचायतीला तसं लेखी कळवावे. त्यांचा विरोध योग्य

आसेल आणि सकारात्मक आसेल तरच त्याचा योग्य तो विचार होईल, आता मी माझे विचार इथेच थांबवते" आसं म्हणून सरपंच बाई बसल्या आणि ग्रामसेवकानी सर्व गावकऱ्याचे आभार मानुन हि सभा संपल्याचे जाहीर केले .

गावात दारूबंदी झाली याची चर्चा एका मिनटात गावभर झाली. पिणारे बेवडे सैरभैर झाले. आपापसात खमंग चर्चा करून या प्रश्नाला राजकीय रंग भरू लागले. तिकडे केरबा पाटील काय काय आडाखे तडाखे मांडत आसेल आणि आपलं दारू दुकान चालू करणेसाठी प्रयत्न करीत आसंल याची पिणाऱ्यांना भलतीच काळजी लागली होती. आता एक एक करीत बेवडा चोरपावलांनी केरबा पाटलाच्या घराकडे सरकत होता. केरबाच घर ईलेक्शन काळात जस कार्यकर्त्यांनी भरते तस भरायला लागले होते. तोही घरातच घारीसारख्या जीण्यावरून खाली आणि खालुन जीण्यावर आसं फेऱ्या मारत होता हे चालू आसताना एकजण म्हणाला. "आण्णा, आता एक जागी बसुन घ्या. पुढचा ईचार कराय पाहिजे."

केरबा त्याला संतापुन म्हणाला

"आरं कसलं काय आणि कशाच काय . . .हे. ला... काय म्हणायचं कावळा केला कारभारी, आणि शान आणलं दरबारी. . . दरबार नासला मर्दानु" म्हणत तो कपाळावर हात मारून घेऊ लागला. पुढे काय करायच हा एकच प्रश्न त्याला सतावत होता. कारण बंद होणारं दारू दुकान हे केरबा पाटलाची आर्थिक रक्त वाहिनी होती. आता ती चॉकप होणार होती. केरबा त्याची फॅमिली या एका निर्णयामुळे रस्त्यावर येणार होती. हा मुद्दा कळीचा होता. आता केरबाला भेटाय आलेल्याची मिटींग बसली होती. शंकर सुतार याचा म्होरक्या झाला. त्याला कोण पुढे करत नव्हतं पण त्याला दांडगी हौस पुढे पुढे करायची. त्यानच विषयाला हात घातला तो म्हणाला

"केरबा आण्णा, हेच्यावर काय तर मार्ग काढायला पाहिजे गप्प बसून चालणार नाही "

"आरं, मग तु गप्प का, काढकी कंचा तरी मार्ग. तुला काय सुचतोया बघुया "

"मी काय म्हणतोय, जेणं कुणी तक्रार केलीया तेलाच चार पैसं देऊया, नी थोडं पोलीस खात्याला मदत करूया, म्हंजे विषयाचा कडंकाच हुतुया बघा. पटतय का आण्णा."

"आरं शंकऱ्या पोलीस कायदा पाळणार आणि ते कसं पैसे घेतील, मग संघटना अंदोलन करील, मग रहाता राहिला संघटणेचा प्रश्न संघटनेला मिटवायच आसते तर, मग अंदोलनाचा फास कशाला केला आसता. हे बघ शंकर संघटणेचा अध्यक्ष आमच्या गावातला हाय. त्यामुळे पोलीस आम्हाला कसलीही मदत करणार नाहीत, आसं समजून मार्ग काढायला पाहिजे." आसं म्हणून केरबा थांबला आणि जमलेले सगळे शांत राहिले घरात एवढी शांतता पसरली की एखाद्या घरात मयत झाल्या नंतर जस वातावरण आसते तशी परिस्थिती झाली. पण या वेळी प्रत्येकाच्या डोक्यात एकच प्रश्न होता की या सगळ्या घटणेला सरपंच बाईच जबाबदार आता या बाईला पदावरून काढून टाकुन घरचा रस्ता दाखविणे. आणि मग एकाने हा विषय ऐरणीवर आणलाच. तो हळूच म्हणाला

"बाईवर जर अविश्वास ठरावच आणला तर ?"

"विषय थांबवा आता यावर उद्या बसुया" केरबा म्हणाला आणि मग एक एक जणघराबाहेर जाऊ लागला. पाच मिनिटात केरबाचं घर मोकळे झाले.

केरबाला उद्या म्हणजे, आजची रात्रच होती. त्याच्या डोक्यात नसलेली युक्ती शंकर सुताराने त्याला सुचवली होती. त्यासाठी त्याला विरोधी गटाची मदत पाहिजे होती. विरोधी गट म्हणजे सयाजी तांबेचा गट. सयाजी आणि केरबा यांचे नाते फार लांबचे नव्हते, ते दोघं मेव्हणे पाहुणे होते. सयाजीची बहीण केरबाला दिली होती.

त्यामुळे केरबाने अविश्वासाचा बेत पक्का केला आणि रात्री बारा वाजता केरबाचा दिवस उजाडला. ठेवणीतल धोतर बाहेर काढलं आणि कसबसं दोन्ही पायावर गुंडाळल. तीन बटणाचं कुडत अंगावर चढवली डोक्यावर टोपी, पायात चप्पल घालून रात्री बाराला स्वारी तांबेवाडी कडे प्रयाण झाली. गल्लीतील मोकाट कुत्री भुंकत होती, पण त्यांना दाद न देताच त्यानी तांबेच घर गाठल, घराबाहेरचा झीरो बल अंधुक प्रकाश देत होता. त्यातुन फक्त दरवाजाकडे जाण्याचा मार्ग दिसला. केरबान दाराची कडी वाजवली तसं तांबे उठला

"आरे कोण ते इतक्या रातीला आलय ? "

"मी केरबा दार उघडा !"

तांबेने दार उघडल केरबा घरात गेला .दोघं मेव्हणे पाहुणे त्या अंथरूणावर बसून चर्चा करू लागले

"इतक्या राती कसं येणं केलं ?"

"विषय तसा गंभीर हाय म्हणून आलुया "

"काय ते बोलुन टाका "

"मघाशी गावातील मंडळी आली होती.त्यांच म्हणनं हाय दारूबंदी विषयावर सरपंच बाई वर अविश्वास ठराव आणायचा."

"मग आणुया की एवढ आवघड काय त्यात, उद्याच आमचं पंच बोलवून घेऊ."

आता दोघांनी एकमत करायच ठरवलं. पण हे अग्नीदिव्य उचलन ईतक सोपं नव्हतं. कारण सरपंच बाई एकटी नव्हती. तीच्या पाठीमागे गावातील स्त्रीशक्ती आणि समता सामाजिक संघटणेचे कार्यकर्ते होते. गावातील बऱ्यापैकी युवकांची फौज सरपंच बाईच्या पाठीशी होती.

पण हे शिवधनुष उचलण्या शिवाय केरबाला पर्याय नव्हता, कारण आजपर्यंत या गावात सुर्य जरी उगवायचा म्हटलं तर केरबाला विचाराव लागत होतं. केरबा विरूध्द बोलणाऱ्यांच आणि राजकारण करणाऱ्यांच केरबान जिवन उधवस्त केलं होत. आसा गावात केरबाचा गावात, हम करोसे कायदा होता. बऱ्याच वेळी विरोधी राजकारण करणाऱ्याच्या केरबा अर्थिक नसा कापायचा, पण या प्रकरणात सरपंच बाईनी हळू हळू केरबाची अर्थिक नस कापायला सुरवात केली होती. म्हणून केरबा सुडाने पेटला होता. त्याच्यातला सुडाग्नी त्याला स्वस्थ बसु देत नव्हता. त्या रात्री तो आपली कुस बदलत राहीला. पण त्याला झोप काही लागली न्हाई .

सकाळ झाली तो कामाला लागला हरी शिपायाला बोलवून घेतला. आणि ग्रामपंचायतीत निवडून आलेल्या सगळ्या पंचाना आपल्या मळ्यात यायचा निरोप धाडला. आणि हरीच्या हातावर शंभराची नोट सरकली.

दुपारचे एक वाजले होते. केरबा आपल्या मळ्यातल्या घरात आधीच जाऊन बसला होता. तो पंचाची वाट पहात होता ईतक्यात तांबेची गाडी आली त्याच्या गाडीवरून मसणु सुतार आणि सुभाणा कांबळे आले दगडु कुंभार, श्रीपती पाटील, गणपती माने ही मंडळी चालत लबेलबे हात हालवत येताना दिसत होती. हे पाहून केरबा समाधान पावत होता. त्याने तिथ एक भला मोठा जाजम टाकला, एक पाण्याची कळसी ग्लास आणि मोठा तुंब्या मधोमध ठेवला आणि निवांत झाला. लोक आले पटापटा जाजमावर बसले. बैठकीला रंग भरायला सुरवात झाली. ती घोट घोट भर घेऊनच. सयाजीने विषय मांडला

"हे पहा मित्रांनो आमच्या गावची सरपंच बाई ही आमच्याच गटाची हाय पण बऱ्याचदा ती गटाचा निर्णय मानत नाही. आता कालचच प्रकरण बघा दारूबंदीवर आमचं कुणाचेच एकमत नसताना तीन स्वतः तो निर्णय घेतला. आम्हाला विश्वासात न घेता. म्हणून आम्ही ठरवलय सरपंच बाईवर अविश्वासाचा ठराव आणायचा तुमचं म्हणणे सांगा. आसं म्हणून तो थांबला पण निवडुन आलेला एक ही पंच बोलायच्या मनस्थितीत नव्हता. कारण सयाजी हे सांगे

पर्यंत हे पंच चंद्रावर जाऊन पोहचले होते. कारण गेले दोन दिवस गावात दारू मिळत नव्हती तो उपवास ते सोडत होते. त्यामुळं सर्वांची बत्ती गुल झाली होती तरी सुद्धा त्यातुन गणपा माने नशेतच बोलला"

"हा उपाय योग्य नाही. . . ठराव पास झाला तर बाई जात नाही . . . कारण ती गावात बिनविरोध निवडून आलीया, तवा ईतकं झेंझाट केल्या परास पुढच्या महिन्यात गाव तळ्याचा माशाचा लिलाव आहे; तो त्या कोळ्याला द्यायचा नाही. तो आम्ही कोणीतर घ्यायचा मग कोळी बेकार फिरल आणि बाई आपोआप रस्त्यावर येईल. हाय का नाही चांगली आयडीया "

त्यावर दारूच्या नशेतच मसणु सुतार म्हणाला

"मग बाई सूतासारखी सरळ व्हईल की "

गणपाने सुचवलेली आयडिया ही बाईच्या आर्थिक नाड्या कापणारी होती त्यामुळे ती सर्वच पंचाना पटली होती. आणि ही मिटींग अविश्वासाच्या ठरावाविणा उठली होती. उद्याच्या लिलावाच्या आशेपोटी उपसरपंच तांबे यानी परस्पर ग्रामसेवकाची भेट घेतली. आणि गाव तळ्यातील माशाच्या लिलावाची जाहीर नोटीस काढून गावभर दवंडी देणेची सुचना ग्रामसेवकाना केली. आणि निघून गेले. ग्रामसेवकानी रितसर नोटीस काढून त्यावर सरपंच बाईची सही घेऊन ती नोटीस बोर्डावर लावली. रात्री दवंडी वाल्यांने दवंडी दिली

"ऐका... हो... ऐका... उद्या...गावतळ्यातल्या. .. माशाचा . . . बारा. . . वाजता लिलाव आहे. . . . हो "



दुसऱ्या दिवशी बारा वाजता गावकरी आणि पंच नेहमी प्रमाणे लिलावासाठी बसले, सरकारी लिलाव बोली दहा हजार लावली. आणि लिलाव बोलणाऱ्याने पाच हजार डीपॉझिट भरण्याचा नियम ठेवला. प्रत्येक वर्षी हा लिलाव व्हायचा, पण तो औपचारिक असायचा. कारण हा लिलाव फक्त पांडु कोळी घ्यायचा. आता मात्र लिलावदारांच्या संख्येत पंधराने वाढ झाली होती. त्यामुळे पांडु कोळ्याला कळून चुकलं होतं की हा लिलाव मला मिळत नाही.पण त्याने सुद्धा पाच हजार भरून लिलावात भाग घेतला होता.

लिलाव प्रक्रिया सुरू झाली शिपायाने पुकारा केला "गावतलावातील मासे एक वर्षासाठी. . . . "

सरकारी लिलाव दहा हजार एक वार

पहिला बोलला "बारा हजार "

दुसरा बोलला "पंधरा हजार" एकदम "वीस हजार. . ." पांडु कोळी बोलला आणि सगळ्यांची बोलती बंद झाली शांतता पसरली परत शिपाई बोलला

"पांडु कोळी. . . . वीस हजार" पुढे कोण बोलत नाही हे लक्षात आल्यावर परत शिपाई पुकारला

"पांडु कोळी " एक वार . . . . दोन वार वीस हजार

हाय का कोण आसं म्हणून तिसरा वार बोलणार इतक्यात एकजण बोलला

"तीस हजार!"

असं बोलत बोलत हा लिलाव वर्षाला दहा ते पंधरा

हजारला होणारा पन्नास हजार वर गेला पांडु कोळी हातबल झाला. आणि तो घरी निघुन गेला. हा लिलाव पांडु कोळी यांच्या कडून काढुन घेतला आसला तरी, तो कुणी आयर्या गहिऱ्याने घेतला नव्हता, तर तो दुसरा माणुस पुढे करून दस्तुरखुद्द केरबा पाटील यानी घेतला होता. कारण त्याला पांडु कोळी यांचा संसार रस्त्यावर आणायचा होता. तो प्लॅन यशस्वी झाला होता. आता जर कोळी यांचा धंदा जर चालवायचा असेल तर सरपंच बाईला केरबा पाटील यांचे पाय धरण्या पलीकडे कोणताही पर्याय नव्हता. आणि या वेळेची केरबा पाटील वाट पहात होता. पण तसं घडायचे काही चिन्ह दिसत नव्हतं, लिलावाची सभा संपली होती. लोक उठून आपापल्या घरी निघुन गेले. सरपंच बाईनी लिलावाची रक्कम रोख भरून घ्यायला ग्रामसेवकाना सांगुन घरी निघुन गेल्या . . . .

घरात पांडु कोळी जाऊन स्थानापन्न झाला होता. झाला प्रकार दोघांनाही माहिती होता. त्यामुळे त्यावर उभयतांची फार चर्चा झाली नाही. दोघानीही काय समजायचं ते समजून घेतल होतं प्रकरण आता ईरेला पेटल्याची जाणीव दोघांनाही झाली होती. पण या सगळ्या प्रकरणात गावातील काही मोजकी मंडळी सरपंच बाईच्या पाठीशी ठाम उभी होती. त्यामुळे सरपंच बाई आपल्या निर्णयावर ठाम होत्या. केरबा पाटील यांचे राजकारण हे नेहमी सुडबुद्धीने पेटलेले होते. आणि या सुडाच्या राजकारणात सरपंच कोळी बाईंचा बळी जाणार आसच गावकरी मंडळीना वाटत होतं. पण बाईसुध्दा आपल्या निर्णयावर ठाम होत्या. त्यानी येईल त्या प्रसंगाला सामोर जाण्याचा निर्णय घेतला होता. पांडु कोळी सुद्धा ईरेला पेटला आणि एमआयडीसीला जाऊन काम करायचे पण माघारी नाही असा निर्णय त्यानेही घेतला. ईकडे केरबा पाटील न्यायालयात गेला आणि दुकान चालू करणे साठी प्रयत्नशिल राहिला. त्याने आपल्या दुकानामुळे कुणालाही धोका नाही आपलं दुकान सरकार मान्य असुन ते सरकारी नियमा प्रमाणे चालते आणि ते चालू ठेवण्यासाठी परवानगी द्यावी अशी मागणी करणारा सातशेहून जास्त माणसांच्या सहीचा अर्ज दिला. त्या अर्जावर जिल्हाधिकारी यानी गावातील महिलांचे मतदान घेण्याच्या सुचना दिल्या.

बाटली उभी की आडवी असा मतदानाचा निर्णय होता. तो निर्णय घेण्याची जबाबदारी त्या गावातील महिलांची होती. जर गावातील दोन तृतीअंश महिलांचे मतदान जर आडव्या बाटलीला झाले तर; गावातील दारूबंदी कायम होणार होती. आणि ती बाटली आडवी न होता ति उभी करण्याचे आवाहन केरबा यांच्या समोर आ वासुन उभे होते. त्या दृष्टीने त्यांची तयारीही चालू होती.

ईकडे सरपंच बाईना ते आव्हान पेलणे म्हणजे एका बोटावर महाकाय डोंगर उचलण्या सारखे होते. पण ते आव्हान पेलण्या शिवाय त्याना गतेंतर नव्हतं. ही बातमी दुसऱ्या दिवशी कोल्हापूर मधील प्रसिद्ध दैनिका मधे प्रसिद्ध झाली. आणि या प्रकरणाला व्यापक वळण लागले. दारूबंदी या विषयावर कोल्हापूर मधे काम करणारी एक स्वंयसेवी संस्था हे प्रकरण हाताळायला तयार झाली. या संघटनेचे कार्यवाह नरेश झोडे हे आपल्या सहकार्यासह गावात येऊन सरपंच बाईना भेटले आणि हि दारूबंदी या गावापुरती कायम करणेसाठी आम्ही तुम्हाला मदत करू अशी सुचना देऊन ते निघुन गेले. ते बाईंचा होकार घेऊनच. आता या गावच्या दारूबंदीचे स्वरूप बदलले होते. कारण या कार्याला प्रबोधनाची जोड तर मिळणार होतीच. पण या चळवळीला जिल्ह्यातील महिला संघटनांचे बळ प्राप्त झाले होते. इथे आता सरपंच बाई एकटी नव्हती. तिला संघटणेच्या रूपाने दहा हत्तीचे बळ प्राप्त झाले होते. तर केरबा पाटील याना जिल्ह्यातील देशी दारू असोशिसनचा पाठींबा तर होताच, शिवाय गावातील जे जे पुरूष संध्याकाळी घेतल्या शिवाय थांबत नव्हते त्या सगळ्या

पुरूषांचा पाठिंबा होता. याच महिन्यात अठ्ठावीस तारखेला मतदान होणार होते. मतदानाला फक्त दहा दिवस बाकी होते पण प्रचार फक्त नऊ दिवसच करायचा होता.

आता प्रचाराला सुरवात झाली होती. गावात आज दारूबंदी विषयावर प्रसिद्ध व्याख्याते प्रसाद जोगडे येणार होते. संध्याकाळी सात वाजता व्याख्यान होते. सरपंच कोळी बाई अध्यक्ष स्थानी होत्या. ईकडे केरबाने आपलं गुण उधळायच काम केले होते. सभेच्या ठिकाणी कुणीही महिला येता कामा नये अशी जोडणी केली. सभेला फक्त सरपंच बाईना मानणार्या आणि केरबाला न जुमाननाऱ्या पंचवीस महिला हजर झाल्या तर पन्नास भर पुरूष उपस्थित झाले. हि बाब चळवळी साठी फार चांगली होती. प्रसाद सरांनी आपल्या भाषणात श्रोत्यांना संबोधीत केले ते म्हणाले, बंधु भगीनीनो या गावची जनता अत्यंत शहाणी आहे. म्हणून तर त्यानी कोळी बाईना सरपंच म्हणून निवडले आहे. त्यानी दारूबंदीचा घेतलेला निर्णय हा क्रांतिकारी निर्णय आहे. या निर्णयाने गावात दारूबंदी झाली, तर गावाला सुबत्ता प्राप्त होईल आणि गावाचे नाव महाराष्ट्राच्या नकाशावर व्यसनमुक्त गाव म्हणूनकोरले जाईल आणि येणारा हरेक दिवस तुमच्या सगळ्यांचा सुखाचा होईल. गावातील तरुण विधवांची संख्या कमीच होईल. आणि पिणारा सुद्धा न पिता राहिला तर त्याला उत्तम आरोग्य प्राप्त होईल, अशी भुमिका मांडत त्यानी दारू पिण्यासाठी आयुष्य भर किती पैसा लागतो आणि त्या पैशात पिणारा किती पितो. याचा जमा खर्च मांडला. आणि हे पैसे जर तुम्ही बचत केले तर किती फायदा होतो. याचा हिशोब मांडला. व्याख्यान संपवले थोडी ईकडची तिकडची चर्चा केली, उरलेल्या आठ दिवसाचा कार्यक्रम ठरवून गेले.



त्यानी जो कार्यक्रम ठरविला तो आसा पहिला दिवशी देसाई सरांचा एकपात्री प्रयोग, दुसरा दिवस लोकशाहिर रंगराव पाटील यांचा शाहिरी जलसा, पथनाट्य, भारूड, नाटीका आणि कोपरा सभा हे सगळे कार्यक्रम फक्त दारूबंदी या विषयावर होते. या सगळ्या कार्यक्रमानी गल्ली नी गल्ली पिंजून काढले आणि गावभर वातावरण टाईट करून सोडले गल्ली बोळात आणि प्रत्येक माणसाच्या तोंडी दारूबंदी शिवाय विषय नव्हता, मतदान उद्या होणार होते.

सकाळी मतदानाला सुरवात झाली मतदानच्या बुथवर पोलींगी एजंट ही सगळी मंडळी ही केरबाचीच होती. विरोधी बाजु सरपंच बाईची, त्या बाजुने एकही बुथ लावला नव्हता किंवा त्यांचा मतदान केंद्रात एकही प्रतिनिधी नव्हता. हे आसं त्या कोल्हापूरच्या समाज सेवी संघटनेच्याकार्यकर्ते मंडळीने केले होते. ही दारूबंदी करणारी मंडळी गल्ली वार फिरून महिलांना मतदान करणेचा आग्रह करून केंद्रात पाठवत होती. हे आसं करीत अखंड दिवस संपला. मतदानाची वेळ संपली अटीतटीने

ऐंशी टक्के मतदान झाले. दुसऱ्या दिवशी निकालाचा दिवस.

कोल्हापूर येथे शासकीय गोदामात मतमोजणी होणार होती पाच वाजेपर्यंत निकाल लागणेची अपेक्षा होती. आगदी वेळेवर मत मोजणी झाली. बाटली आडवी झाली निकाल दारूबंदीच्या बाजुने झाला. केरबाचे गुंड गावभर दहशत माजवत फिरू लागले होते. आडव्या झालेल्या बाटलीचा गावात आनंदोस्तव साजरा झाला नाही; पण गावात दारूबंदी करावी असा येथील महिलांचा कौल होता. सरपंच बाईचा विचार जिंकला होता. विरोधकांना मात्र हार पत्करावी लागली होती.

दुसऱ्या दिवशी वर्तमानपत्रात बाटली आडवी झाल्याची बातमी पहिल्या पानावर झळकली. केरबाचा फार मोठा अपमान झाला होता. त्याचा राजकीय ईगो दुखावला होता. या वेदना त्याला शांत बसु देत नव्हत्या. त्याच्या कडे विरोधी बाजुला नमवण्यासाठी अनेक पर्याय होते. त्यातील एक पर्याय त्यांनी बाहेर काढला. सरपंच बाईची अर्थिक नाकेबंदी करायची सरपंच बाई काय त्या गावातील उच्चभ्रू घराण्यातील नव्हती. ती एक सामान्य कुटुंबातील महिला होती. तीला नमविणे हा केरबाच्या हातातील मळ होता. तिचा पती आणि मुलगा यांच्या उत्पन्नावर तिचं कुटुंब चालायचे ते बंद झाले की बाई रस्त्यावर येईल, यावर त्याचा ठाम विश्वास होता. पण रोज वेगवेगळ्या कामावर जाणाऱ्या माणसाचा रोजगार रोखून ठेवणे हे काम फार आवघड होते. आणि त्यांचे काम घालवणे हे सुद्धा बरोबर नव्हतं. मसणु सुतार हा केरबाचा एक नंबरचा फंटर, तो खाल्ल्या तुकड्याला जागणारा माणूस होता. त्याच्या डोक्यातली ही शक्कल बाईच्या मुलाला आणि नवऱ्यालाच दारूच व्यसन लावायच त्या साठी रोज एक हजार रूपये खर्च झाले तरी चालेल, त्या साठी या दोघांचे जवळचे मित्र शोधावे लागणार होते. ईतक्या लहान गावात हे काम फार आवघड नव्हते. आणि ते काम मसणुने पुर्ण केले. पुढे ठरल्याप्रमाणे काम चालू झाले. समंधीताना रोज एक हजार रूपये फक्त चैनिसाठी द्यायला सुरवात केली, रोज हजार रूपये म्हटल्यावर लोक तयार झाले. ते ही "फुकटच गावलं नी बाप लेक धावल " या म्हणीप्रमाणे.

ईकडे गावातील तरुण मंडळानी एकत्र येऊन गावात कोण दारू पिऊन येईल त्याची दाढी डोई करून सवाध्य गाढवावरून धिंड काढायचे ठरविले होते. त्याला बरेच दारूडे बळी पडत होते. पण ते सरपंच बाईवर रोष पत्करून बाहेर पडायचे. त्यामुळे पुरूष वर्गात आणि मध्यपी मधे बाईची दुष्मनी वाढली होती. त्याच्याच मुळे काही महिने बाईचा मुलगा व पती शिकाऱ्याच्या हाती लागायला वेळ लागला होता. पण हळूहळू शिकारी लोकांचे काम फत्ते होत होते.

एरु काळा दिवस असा उजाडला तो बाईंच्या नशिबातील धोक्याची घंटा देणारा ठरला. दस्तुरखुद्द त्यांच्या दारात तरुण मंडळी गाढव, केस कापणारा, वाद्यांचा ताफा, घेऊन हजर झाली. घरात कुणाला काय कळण्या आधिच पती पांडु कोळी याना तरूणांनी उचलून गल्लीत घेतले. त्याच्या दाढी मिशा केस कापले आणि गावभर गाढवावरून मिरवणूक काढली. ती बातमी जिल्ह्यातील सर्व वर्तमानपत्रात छापून आणली. या मधे लढाऊ बाईचे खच्चीकरण झाले, पण हार न पत्करता ठाम रहाण्याचा निर्णय तीन घेतला. त्यापुढे एक दिवस मुलगा तर दुसऱ्या दिवशी पती अशी तिच्याच दारातून तिच्या कुटुंबातील सदस्यांची गाढवावरून मिरवणूक सुरू झाली. हे प्रकरण हाता बाहेर जात आसताना एक दिवस विषारी दारू पिऊन का आणखी कशाने सरपंच बाईचा मुलगा हे जग सोडून गेला. त्याचवेळी या विषारी दारूने चार लोकांचे बळी गेले होते. त्यामुळे शंकेला जागा नव्हती. मुलगा तर जग सोडून गेलाच. आता का जगायच कुणासाठी जगायचं,

हा प्रश्न पांडुरंग कोळ्या समोर उभा होता. त्यामुळे त्याच्या पिण्याचा जोर वाढतच होता. रोज कोणीतरी येऊन फुकट दारू देऊन जात होता. आणि रिकामी बाटली हातात देऊन त्याला मद्यधुंद अवस्थेत गावाच्या पार कट्ट्यावर बसवून जात होता. आता पांडु कोळी सुद्धा पुर्ण दारूच्या आहारी गेला होता. तो डोक्यावर परिणाम झालेल्या माणसासारखे दगट गोटे नाचवत गावातून फिरत होता. तो कुठेही झोपायचा कोण काय देईल ते खायचा. महिना महिना घरी जायचा नाही. अंघोळ तर नाहीच पण कपडेही धुणेचा नाही. या अशा घडामोडीत दोन तीन वर्षे निघुन गेली. घरावर डोंगरा एवढी संकट आली. पण सरपंच बाई आपल्या धोरण आणि उदिष्टा पासून मागे हटली नाही. ती लढताच राहिली तीलाअजून काही सामाजिक संस्था मंडळांचा पाठींबा मिळत राहीला. तिच्या चरित्राचे हणन करणेचे सुद्धा काही समाज कंटक काम करू लागले. पण तीने आसल्या गोष्टी पाठीवर टाकल्या. समाज सुधारणावादी भुमिकेला ती नेहमी चिकटून राहिली.



फार तिढेबाजी केली तरी हि बाई वठणीवर येत नाही. आणि आपलं देशी दारूच दुकान काय चालू होत नाही. आता पुढची चाल कोणती खेळायची याच्या विचारात पाटील होते ईतक्यात तिथं परटाचा सदबा आला. त्याला राजकारणाचा मोठा नाद, उगाचच परीट घडीची कपडे घालून गाव पुढाऱ्याच्या पाठीमागे फिरणे एवढच तेच काम. पण बातम्या मात्र या सदबाला सगळ्या मुलखातल्या लागलीच कळायच्या. गावात तो ताज्या बातमीचा संपादक म्हणून प्रसिद्ध होता. त्याच्या कडुन आलेली कोणतीची बातमी खोटी नसायची. तो अदबीने जवळ येऊन म्हणाला.

"केरबा आण्णा, पंचायतीचा कार्यक्रम डीक्लेर झाला वाटतय"

"हि आणि कुठली बातमी आणलीस. खरी तरी हाय नव्ह" केरबा म्हणाला

"शंभर टक्के खरी हाय, लावता काय बाटलीची पैज" सदबा म्हणाला

"आरं पैजन कसली पितोस. माझी कधी प्याला नाहीस व्हयरं गाढवा" केरबा म्हणाला.

केरबाने गाढवा असं म्हटल नी सदबाच्या डोळ्या समोर तारे चमकले. त्याच्या नजरे समोर मंडळाचे कार्यकर्ते, तो केस कापणारा, मिशा भादडणारा, वाजंत्री आणि गाढव आणि त्या गाढवावरून आपली निघालेली मिरवणूक हे चित्र त्याच्या डोळ्यासमोरून काय केल्या हाटेना. घाईघाईने जीभ चावत तो केरबाचे पाय धरीत म्हणाला "राम राम राम. . . नको नको आण्णा बाटली सोडून बोला" तो स्वतःच्या गालावर थपड्ड मारून घेऊ लागला. केरबाने त्याचे हात हातात घेतले नी म्हणाला "हे बघ सदबा, या गाढवावरून काढणार्या धिंडीची गावातील प्रत्येकान दहशत घेतलीय; हे मला माहिती हाय. म्हणून काय आपण सोताला शिक्षा करायची नाय. ज्यानी कुणी

आम्हावर हे संकट उभं केलय तेचा सुफडासाफ करायचा. हे एवढ ध्यानात घे मजे झालं."

"आण्णा, काय बी करून या ईलेक्शनात बाईला पाणी पाजायचंच" सदबा बोलला त्याच्या समोर हात पुढे करून केरबा म्हणाला "दे तर मग टाळी" हा संवाद या दोघात चालू आसताना केरबाचे मेहुणे श्रीरंग आले, या दोघात निवडणूक लागल्या बद्दल चर्चा झाली. मेहुणे पावण्यांची भेट झाली ते तिघेही निघुन गेले. आपापल्या कामालाच येऊ घातलेल्या निवडणुकीची चर्चा गावभर चालू होती. पण फिक्स कार्यक्रम कुणाला कळला नव्हता. दुसऱ्या दिवशी निवडणूक कार्यक्रम गाव चावडी ग्रामपंचायतींच्या बोर्डावर लावणेत आला. निवडणूक म्हटले की दारूड्यांची दलबदलुंची दिवाळीच. तर गावातील राजकीय पुढाऱ्यानी अग्नी परीक्षाच या निवडणुकीतुन अनेक जन आपले हात धुऊन घेतात. तर काहींचे नुकसान ठरलेले आसते. त्यातल्या त्यात नोकरी करणारे फारच अडचणीत येतात. म्हणून या लोकांना निवडणूक बिनविरोध व्हावी असेच वाटते. तर काहीना निवडणूक लागली पाहिजे असेच वाटते. शक्यतो गाव पातळीवरील निवडणूक कधीच बिन विरोध होत नाही. गाव जरी लहान आसले, तरी त्या गावातील लोकांचे व्यक्तीगत हेवेदावे किरकोळ वाद असे अनेक पदर या निवडणुका भोवती गुंफलेले आसतात. त्यामुळे निवडणूक लागतेच. त्यात अधिक भर म्हणजे प्रत्येक नागरिकाला ग्रामपंचायत निवडणूक लढवुन गावाचा सरपंच व्हायला पाहिजे अस वाटत आसते पण अलिकडे काळ बदलत चाललाय निवडणूक आणि पैसा असे समीकरण झाले आहे. त्या मुळे "एस मणी तो साहेबा वाणी. . . . नो मणी उसे पुसत नाही कोणी" अशी अवस्था निवडणूक लढीवणाऱ्याची होते. म्हणून निवडणूक कोणतीही असेल तर उमेदवार पैसे वाला निवडला जातो.अपवादात्मक एखाद्या कार्यावर आणि माणुसकी वर निवडून जात असेल पण तो उमेदवार लाखात एक.

गावात झालेली दारूबंदी आणि सरपंच बाईचा कारभार मासेमारीचा लिलाव अतिक्रमण हटाव, अशा बाबीतुन या निवडणुकीत राजकीय चुरस वाढलेली होती. त्यातच प्रस्थापित राजकारणी लोक सरपंच बाईच्या विरोधी गेले होते. गेल्या निवडणुकीत ओबीसी महिला सरपंच आसल्याने ती एक जागा बिनविरोध करून उरलेल्या आठ जागेसाठी निवडणूक लागली होती. आता ती स्थीती नव्हती. निवडणूकी नंतर सरपंच पदाचे आरक्षण पडणार होतं. त्यामुळे नऊच्या नऊ जागा महत्वाच्या होत्या. निवडणूक लागल्या मुळे गटबांधनी चालू होती. गल्ली वार जात वार आपली मते किती आहेत, आणि निवडुन येणे साठी किती मताची गरज आहे. कुणाला उमेदवारी दिली तर विजयासाठी लागणारी मते अपसुक मिळतील, तर विरोधी उमेदवार कोण असतील, त्यांची अर्थिक कुवत आणि आपण उभे करणाऱ्या उमेदवाराची अर्थिक कुवत किती आहे. याची मोजदाद गटप्रमुख करत होते. त्याच बरोबर गटांची आघाडी करून संभाव्य उमेदवाराचा शोध घेत होते. गेल्या निवडणुकी प्रमाणे या ही निवडणूकीत विरोधी आघाडी भक्कम होऊ नये याची जबाबदारी श्रीरंग तांबे आणि केरबा पाटील हे मेहुणे पाव्हणे घेत होते. तर विरोधी बाजु सुद्धा तरुण मंडळ आणि सामाजिक काम करणारी मंडळी एकत्र येऊन भक्कम करीत होती. या बाजुची एक जमेची बाजु म्हणजे चालू सरपंच शांताबाई कोळी यांना पाटील तांबे गटाने नाकारल्या मुळे सरपंच कोळी ह्या विरोधी गटातून उभ्या रहाणार होत्या. पण या गटाची मोठी कसोटी होती. त्यांच्या कडे एकच उमेदवार हुकमी होता. इतर उमेदवार त्याना मिळेल याची खात्री नव्हती. आधी उमेदवार घोषित करणे हे दोन्ही बाजुना धोक्याचे होते. म्हणून दोन्ही गटानी नऊ जागेसाठी

प्रत्येकांनी पन्नास पन्नास उमेदवारी फॉर्म भरायचे निश्चिंत केले .

उमेदवारी अर्ज भरायला चालु झाले होते. तालुक्यातील बरीच गावं या टप्प्यात होती. त्यामुळे तहसीलदार कार्यालयावर रोज जनसागर जमत होता. पंचाग बघणारे, मुहूर्त काढून देणारे, भविष्य सांगणारे, तेजीत होते. ते येणाऱ्या प्रत्येक उमेदवाराला बंधन बांधून देऊन खुश करून सोडत होते. त्यानी चांगले पैसे कमवले होते. केरबा पाटील तांबे गटाने सुद्धा बंधन बांधून देऊन खुश करून सोडत होते. त्यानी चांगले पैसे कमवले होते. केरबा पाटील तांबे गटाने सुद्धा बंधन बांधून ठेवूनच अर्ज भरायला मुहूर्त काढला होता. त्यानी शुक्रवारचा मुहूर्त शोधुन अर्ज भरले. आणि विजयाची खात्री करून पन्नास अर्ज दाखल केले. दुसरा गट विद्यमान सरपंच कोळी बाईच्या नेतृत्वाखाली लढणार होता. त्यांनी कोणताही मुहूर्त न बघता पंचाग, भविष्य न पहाता शनिवारी आपल्या गटाचे पन्नास अर्ज भरले.

प्रस्थापित राजकारणी गट म्हणून पाटील आणि तांबे यानी आपले दबाव तंत्राचे हत्यार उपसले. उमेदवारी उमेदवारी अर्ज भरलेल्या कमकुवत आसलेल्या माणसाना दमदाटी द्यायला सुरवात केली. म्हणून बरेच उमेदवार कोळी बाई आणि गटप्रमुखाना भेटुन आपली उमेदवारी नको म्हणून सांगुन आली .

अर्ज माघारीचा आजचा दिवस आज तालुक्याला जाऊन अर्ज माघारी घ्यायचे होते. गावात दमदाटी करून श्रीरंग तांबे, केरबा पाटील यांनी आपल्या गटातील आडतीस आणि विरोधी गटातील वीस इच्छुकांच्या माघारीच्या फॉर्मवर आधिच सह्या घेतल्या होत्या. पण यांच्याच गटातील तीन उमेदवार माघारी घ्यायला तयार नव्हते. त्यांची मनधरणी करून हे लोक थकले होते. पण त्याचा काहीही उपयोग झाला नाही. नवजवान तरुण मंडळाचे अध्यक्ष सुरेश देसाई, आता पर्यंत पाच निवडणूकीत उमेदवारी डावललेले होते. वयोवृद्ध सामाजिक कार्यकर्ते गावातील प्रतिष्ठित नागरिक विष्णू घोटणे आणि शंकर जाधव आसे हे तीन कार्यकर्ते पाटील आणि तांबे यांच्या समोरची चर्चेची दारे बंद करून शांता कोळी गटात सामील झाले. आणि नेमके तेच कोळी बाईच्या फायद्याचे झाले .

अर्ज माघारी नंतर कोळी गटाकडून सात उमेदवार राहीले. तर तांबे पाटील गटाकडून नऊ उमेदवार राहीले. तांबे पाटील गटाचे दोन उमेदवार बिनविरोध निवडून आले. आणि उरलेल्या सात जागा साठी चौदा उमेदवार समोरा समोर उभे राहीले. निवडणुकीच्या राजकारणातील सतेचा फड आता रंग भरत होता.

मागासवर्गीय महिला आणि ओबीसी पुरूष गटातून हिराबाई कांबळे आणि सदाशिव परीट हे दोघे तांबे पाटील गटाकडून बिनविरोध झाले. त्यामुळे या गटात चैतन्य निर्माण झाले होते. आता या गटाला फक्त तीन जागा निवडून आणल्या की ग्रामपंचायतीची सत्ता ताब्यात येणार होती. त्यामुळे गटात आनंदी आनंद होता. पण दुसरा गट मात्र आता आपल्या अस्तित्वाची लढाई लढत होता.

हि निवडणूक गावातील दारूबंदी आणि सरपंच बाईचा कारभार या विषयावर लढणार होती. यात शंका नव्हती. पण सरपंच बाईना विजयाची खात्री नसल्याने तशी ती एकतर्फीच वाटत होती. त्यामुळे दुसरी बाजु तांबे आणि पाटील यांचा गट हवेत होता. गेल्या वेळी सरपंच कोळी बाई केली ती आपल्या अधिकारात काम करेल म्हणून. पण ती यांची गुरू ठरली होती. पाच वर्षे तीने या दोन राजकारणी लोकांना ऐरणीवर ठेवून घणाचे घाव घालत यांच्या दंडेलशाहीला लगाम घातला होता. आता या वेळी परत अशी चुक होऊ नये याची खबरदारी उमेदवार निवडताना या गटाने घेतली होती. त्यामुळेच तर चांगले तीन

क्रियाशील कार्यकर्ते यांचा गट सोडून कोळी बाईच्या गटात सामील झाले होते. आणि यानी मात्र आयऱ्या गहिऱ्यांना उमेदवारी दिली होती.त्यामुळे कोण कितने पाणी में है याचा फैसला निकाला नंतरच होणार होता.

दोन गटाचे उमेदवार जाहीर झाले होते. कोळी बाईच्या गटाकडून ओपन पुरूष गटातून नव्याने गटात दाखल झालेले सुरेश देसाई, विष्णू घोटणे, शंकर जाधव, तर ओबीसी महिला मधुन विद्यमान सरपंच शांताबाई कोळी, तर महिला गटातुन चंद्रकला पाटील, वैशाली कदम, विद्या कुलकर्णी आसे सात उमेदवार उभे होते त्यापैकी या तिन्हीही महिला उमेदवार सरपंच कोळी बाईबरोबर दारूबंदीच्या लढ्यात खांद्याला खांदा लावुन लढल्या होत्या. त्यामुळे त्यांचा गावातील महिला वर्गात वट होता. तर विरोधी पाटील तांबे गटातून स्वतः श्रीरंग तांबे, दगडु नाईक, मधुकर खांडेकर तर ओबीसी महिला गटातून जनाबाई कुंभार तर महिला गटातून वैशाली कदम यांची सखी जाऊ गौराबाई कदम लढत होत्या चंद्रकला पाटील यांची भावजय गीरजा घोटणे या ही उमेदवार होत्या म्हणजे महीला गटात नणंद भावजयी आणि जावा जावा अशी नात्यातील लढत तांबे आणि पाटील यानी लावली होती.



उमेदवार जाहीर झाले मुळे प्रचाराला सुरवात झाली होती. दोन्ही गटानी महादेव मंदिरातुन श्रीफळ वाढवून महादेवाला अभिषेक घालून प्रचाराला सुरवात केली होती. ही ग्रामपंचायत निवडणूक म्हणजे दोन प्रवृत्ती विरोधी लढाई होती. या गावच्या निवडणूकी बरोबर जिल्ह्यातील किमान दोनशे गावातील ग्रामपंचायत निवडणूका होत्या पण या सगळ्या मधे या गावची निवडणूक अटीतटीची आणि प्रतिष्ठेची झाली होती. इथे उमेदवारा पेक्षा प्रश्नाला विचाराला आणि कार्याला महत्व होते. आणि गावात दारूबंदी निमित्तानेत्या पध्दतीचे लोकजागरण झालेले होते. लोकांच्या सामाजिक जाणीवा वाढवण्याचे बरेच काम दारूबंदी निमित्ताने कोल्हापूरच्या सामाजिक संस्थेने केले होते. म्हणून तर बाटली उभी न रहाता आडवी झाली होती. आता तीच सामाजिक संस्था कोळी बाईनी उभ्या केलेल्या गटाला प्रचारात साथ देत होती. गावातील विकास संस्था, पाणी संस्था, दुध संस्था या सगळ्या अर्थिक नाड्या केरबा पाटील व तांबे गटाकडे होत्या. त्यामुळे नागरिक उघड उघड प्रचारात उतरायला घाबरत होते. त्यातच पाटील तांबे गटाला पैशाचा आधार सुद्धा मोठा होता. त्यामुळे 'मनी' विरूध्द 'वाणी' आसं स्वरूप सुद्धा या निवडणुकीत होतं.

निवडणूक प्रचाराला रंग भरायला चालु होता. पाटील तांबे गट घर टु घर पिंजून काढत होता. प्रत्येक मतदाराला भेटुन हात ओले करून मते मागत होता. गल्ली गल्ली वार्डा वार्डातुन प्रचार फेऱ्या पद यात्रा हळदीकुंकु असे

करून गावभर वातावरण निर्माण करत होता. तर दुसऱ्या बाजूला उमेदवारांची भुमिका कार्य सांगणाऱ्या कोपरा सभा, दारूबंदी वरील पथनाट्य, आमचे उमेदवार निवडून आलेनंतर पाच वर्षात काय काम करणार गाव विकासाचा कार्यक्रम काय आसणार, याचा स्लाईडशो गावभर कोपह्या कोपऱ्यावर दाखवायला चालू होते "एक मतद्या विकासाला.... गाडा अन्याय अत्याचाराला" कोळी बाईची घोषणा लोकप्रिय झालेली होती .

अशा पध्दतीने प्रचाराचा धुरळा उडवत प्रचार समाप्त झाला. मतदानाचा दिवस जवळ आला. उद्या मतदान होणार होते. पाटील तांबे गटाकडून साम दाम दंड भेद सगळे वापरले होते. सकाळी मतदान प्रतिनिधी आणि बुथ उभा करण्याची तयारी दोन्ही गटानी केली होती. मतदान केंद्राच्या बाहेर शंभर मीटरवर दोन्ही गटाचे बुथ उभे राहीले. तिन्ही मतदान केंद्रामधे दोन्ही गटाचे मतदान प्रतिनिधी हजर झाले मतदानाला सुरुवातही झाली. दिवसभरात किरकोळ वादावादीचे प्रकार वगळता मतदान ऐंशी टक्के झाले. उद्या जिल्ह्यातील शासकीय गोदामात मतमोजणी होती. त्याप्रमाणे सुचना गटनेते आणि उमेदवाराना देण्यात आल्या होत्या.



दुसऱ्या दिवशी सकाळी सर्व उमेदवार आणि प्रतिनिधी मतमोजणी ठिकाणी पोहचले. आणि जेवण करून दुपारी ट्रक भर माणसं गुलाल फटाके घेऊन केरबा पाटील याना लोक घेऊन यायला सांगून एक गट गेला. तर दुसरा गट अर्थिक विवेचंनेत आसल्याने सकाळी प्रतिनिधी मोटारसायकलवरुन पाठवुन गावातच राहिला. तर त्यांच्यातील काही लोक मिळेल त्या वहाणाने मतमोजणी ठिकाणी पोहचले. पण यांची संख्या वीस माणसाच्या वर नव्हती. धरणगावची नियमाप्रमाणे दुपारी बारा वाजताग्रामपंचायतीची मतमोजणी चालू झाली. आणि मतदान केंद्रात आसलेल्या प्रतिनिधीचे व बाहेरच्या कार्यकर्त्याचे काळजाचे ठोके कमी जास्त होऊ लागले. मतांचा आकडा सारखा खाली वर होत एक नंबर वार्डाचा निकाल लागला. एक नंबर वार्डातुन सुरेश देसाई वीस मतांनी, विष्णू घोटणे बावीस मतानी आणि शांताबाई कोळी या या पंधरा मतानी विजयी झाल्या. आणि पाटील तांबे गटाचे धाबे दणाणले. ईकडे गावात निकालाची उत्सुकता होती. पण कोळी गटाकडे कोणतीही संस्था नसलेने गावात निकालाचा अंदाज कळत नव्हता. कारण गावात फक्त संस्थेतच फोन होते. त्यावेळी मोबाईल फोन अस्तित्वात नव्हता. परत तासभराने वार्ड क्रमांक दोनचा निकाल जाहीर झाला त्या मधे सुद्धा कोळी गटाचेच उमेदवार शंकर जाधव, विध्या कुलकर्णी, वैशाली कदम हे तीन उमेदवार विजयी झाले. आणि पाटील तांबे गटाचे धाबे दणाणले ते घेऊन आलेले गुलाल, फटाके मतमोजणीच्या ठिकाणी टाकुन रिकामा ट्रक म्हणजे फक्त गेलेली माणसच घेऊन परत आले. पण कोळी गटाचा विजय घालणारा एकही माणूस मतमोजणी ठिकाणी नव्हता. शेवटी सातवी सिट चंद्रकला पाटील ही सुद्धा समान मते पडल्या मुळे चिठीवर निवडून आली. आणि धरणगावची ग्रामपंचायत पुन्हा एकदा कोळी बाईच्या ताब्यात सुज्ञ मतदारांनी दिली .

ईकडे निकालाचा दिवस असुनही गावात सामसुम वातावरण होते.अजून निकालाचा अंदाज कुणालाही आला नव्हता. पाटील तांबे गटाचा ट्रक गावाबाहेर थांबवून लोक एक एक करत आपापल्या घरी गेले होते. अजून कोळी गटाचा एकही किंवा कार्यकर्ता निकाल ऐकून गावात आला नव्हता.

संध्याकाळी सहा वाजता कोळी गटाचे कार्यकर्ते गावात आले, सोबत कोल्हापूरच्या समाज सेवीसंघटनेचे कार्यकर्ते आले होते. त्यानी निकाल सांगितला आणि काय गावात एकच जल्लोष सुरु झाला. गावात विजयी उमेदवारांची मिरवणूक काढायची ठरले, सगळी तरुण मंडळ एकवटली. फटाक्यांची आतषबाजी चालू झाली. कधीच पराभव न अनुभवलेल्या विरोधकांच्या कानठळ्या बसायला लागल्या. त्यानी घराची दारे झाकून घेतली. ईकडे केरबाचा पराभूत वारू उसळ्या मारू लागला. त्यालाही हा आवाज सहन होत नव्हता. गावात चंद्र सुर्य जरी उगवायचा म्हटले तर केरबाला विचारून उगवायचा नाहीतर त्याला सुद्धा परवानगी मिळायची नाही. हि परिस्थिती आसताना आज एक भिकारडी कोळीन गावावर राज्य करणार हे त्यांच्या कल्पना शक्तीचे पुढे होतं. त्यामुळे तो चवताळून उठला ईकडे मिरवणूक संपुन मंदिर परिसरात मतदारांच्या आभाराची सभा चालू होती. त्या सभेत पाटील आणि तांबे यांचे गावगुंड शिरले. सभा उधळून लावली केरबाने हवेत गोळीबार केला. गोळीबाराच्या धास्तीने लोक सैरभैर पळून गेले. आणि तेवढ्यात त्याने बाईवर नेम धरला, बंदुकीचा चाफ ओढला, सावज टिपलं, केरबाचं काम साधलं, कोळी बाईचा गेम झाला. बाई जागेवर कोसळली गतप्राण झाली. सगळं गाव भितीच्या छायेखाली आलं. पोलीसात वर्दी सुरेश देसाई यांनी दिली पोलीसात तक्रार दाखल झाली. पोलीसांनी संशयित म्हणून दोन्ही गटाचे प्रत्येकी पंधरा पंधरा लोकं गुन्हेगार ठरवून त्यांच्या वर दोषारोप ठेवले. कोळी गटाला कोल्हापूरच्या समाज सेवी मंडळीनी मदत केली. गाव मात्र शांतच राहिले. एक दारूबंदी कार्यक्रमाची गावात अम्मलबजावणी केली या या विषयावरून चाललेल्या सुडनाट्याचा शेवट झाला होता. कोर्टात केस चालू होती.




या केसचा निकाल काय लागणार होता. तो अजून गुलदस्त्यातच होता. पण गावातील तरुण मंडळानी एकत्र येऊन शांताबाई कोळी यांचा ब्रांझचा पुतळा उभा केला होता. पुतळ्या भोवती तारेचे तारेचे कुंपण घातले होते. पुतळा लाल कापडाने झाकला होता. पुतळा परिसर विविध रंगांच्या फुलांच्या माळानी सजविला होता. कारण आज या पुतळ्याचे उदघाटन होतं इथं सुद्धा विरोधक गप्प राहिले नव्हते. त्यानी त्या पुतळ्याजवळ हातात दारूची बाटली घेऊन, चकना हातात देऊन दस्तुरखुद्द पांडुरंग कोळ्याला बसवला होता. त्याच्या जवळच हे आजचं खास आकर्षण, आसे एक वाक्य लिहुन ठेवलेली दगडी पाटी दिली होती. या अशा हिन पातळीवर पोहचलेली एक बाजु. आणि समाज सुधारणा करणेच्या हेतुने झपाटलेली दुसरी बाजु. हा दोन बाजुचा संघर्ष गावात ईतकी टोकाची इर्षा खुन, मारामारी आशा घटना घडुन ही कायम होता. पुतळा उदघाटनाला सामाजिक कार्यकर्ते हर्षद पाटील यांना निमंत्रण दिले होते. ते ठरल्याप्रमाणे

सकाळी आकरा वाजता हजर झाले. पांडुरंग कोळी आणि त्याच्या कुटुंबाचा इतिहास मंडळाच्या कार्यकर्त्यानी त्यांच्या कानावर घातला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे आले बद्दल स्पीकर वर आला औसिग झाले आणि बघता बघता सगळे गाव कार्यक्रमाला हजर झाले. उदघाटन झाले आणि तिथेच छोटेखानी सभा झाली. सभेला हर्षद पाटील यानी मार्गदर्शन केले ते बोलत आसताना म्हणाले की "या गावात ओबीसी सरपंच पद झाले आणि प्रस्थापित पुढारी हातबल झाले. यांच्याच इशाऱ्यावर राज्य कारभार चालावा म्हणून रबरस्टॅप सरपंच म्हणून शांताबाई कोळी याना सरपंच पदावर बसवले. परंतु कोळी बाईनी स्वतंत्र भुमिका ठेवून कार्यभार सांभाळत प्रशासन आणि गावाला शिस्त लावायचा प्रयत्न केला. त्यातुनच नशाबंदी, कुऱ्याड बंदी अतिक्रमण हटाव असे कार्यक्रम राबविले यातुन प्रस्थापित भ्रष्टविचाराची मंडळी अडचणीत आली. त्यातुन या लढाऊ रणरागीणीचा बळी



गेला. मला या दृष्ट प्रवृत्तीना इतकच सांगायचं आहे की बंदुकीच्या गोळीने डोकी फुटतात माणसं मरतात पण विचार संपत नाहीतकारण फुले, शाहु, आंबेडकरांची विचारधारा अमर आहे ती न संपणारी आहे. या गावातील एक शांताबाई कोळी गेली आसली तरी, गावात हजारो शांताबाई कोळी जन्माला आलेल्या आहेत. त्या सगळ्या सावित्रीच्या लेकी शांताबाईचे अपुरे कार्य पुढे घेऊन जातील यात मला शंका वाटत नाही. इथल्या गावकरी मंडळीनी त्याना सदैव साथ द्यावी हि विनंती करतो. आणि मी माझे चार शब्द संपवितो धन्यवाद"

एवढं बोलुन त्यानी भाषण संपविले. संयोजकांनी आभार मानले. आणि कार्यक्रम संपला. शांताबाईकोळी तिथंकार्याच्या रूपाने हजर होतीच. तिचा संसार जरी उधवस्त झाला आसला तरी, गावाचा संसार आपला समजून गावकरी मंडळीना निशब्द प्रेरणा देत. ती किर्ती रूपी उभी राहवुन सत्याचा मार्ग दाखवत होती ती धरणगावच्या गाव पांढरीत..

## दारुच्या बाटल्या

१) पिण्याच्या किंवा शोच्या बाटल्या आपल्या घरात नको. कारण दारूला वास्तुशास्त्रात जागा नाही.
२) ज्या वस्तूंना (गोष्टींना) आपल्या घरात स्थान नाही त्यांना दिशांचे नियम लागू नाही.
३) ज्यांना अगदीच पाहिजे त्यांचं रुटीन झालं अशांनी संपूर्ण घराच्या पश्चिम भागात ठेवावं. मलबार हिल्ससारख्या भागात राहणाऱ्या लोकांनी आपल्या घरातील पश्चिम भागात ठेवावी कारण त्यांचा वापर त्यामुळे कमी होतो.

# वास्तु टिप्स

- ★ घराच्या मुख्य दरवाजातील पायपुसणी लाल, काळ्या, मरून रंगाची नसावी.
- ★ सेफ्टी डोअरचा कलर काळ्या रंगाचा असु नये. क्रिम, आयव्हरी या रंगाचे सेफ्टी डोअर हवेत.
- ★ घराची डोअर बेल ही पालीचा चूक-चूक आवाज करणारी बसवू नये हे अशुभ आहे.
- ★ घराची डोअर बेल ही घंटेचा आवाज करणारी असावी हे शुभ असते.
- ★ घराची डोअर बेल कोणत्याही मंत्राची किंवा आरतीची नसावी या अपूर्ण वाजल्यामुळे या मंत्र सामर्थ्याचा घराला काही उपयोग होत नाही.
- ★ सेफ्टी डोअर आणि मुख्य दरवाजांना महिन्यातून एकदा ऑइलिंग करून घ्यावे. दरवाजातून करकर आवाज येणे हे अशुभ लक्षण आहे.
- ★ घरामध्ये स्वयंपाकघर किंवा इतर ठिकाणी असलेल्या नळातून पाणी टपकणार याची काळजी घ्यावी पाणी टपकणे अशुभ मानले जाते.
- ★ घरामध्ये किंवा घराच्या बाहेर चप्पल, शूज कधी पालथ्या पडू देऊ नयेत. त्यामुळे घरामध्ये नकारात्मक शक्ती वाढून त्रास होऊ शकतो.
- ★ घराच्या मुख्य दरवाजासमोर आरसा असू नये कारण मुख्य दरवाजातून चांगली उर्जा बाहेर परावर्तित होते.
- ★ विंड चाइमचा (पवन घंटी) मधुर आवाज मनाला शांती देतो. दुःख दुर करतो. संगीताचा आपल्या शरीरावर सकारात्मक प्रभाव पडतो.
- ★ विंड चाइम (पवन घंटी) ही सहा पाइपची घराच्या वायव्य दिशेला लावावी.
- ★ नवीन जागी मन रमत नसेल किंवा कोणत्याच कार्यात यश येत नसेल तर घराला रंगरंगोटी करावी, घरातील अडगळ, भंगार काढून टाकावेत.
- ★ फिश पॉट घराच्या उत्तर आणि ईशान्य दिशेला ठेवावा.
- ★ मुलांच्या स्टडी टेबलच्या समोर लक्ष विचलित करणारे पोस्टर किंवा चित्र लावू नये, त्याऐवजी अभ्यासाचा चार्ट पेपर किंवा टाइम टेबल लावावे.
- ★ घरामध्ये सुकलेली फुले, पाने, झाडे ठेवु नये त्यामुळे घरामध्ये नकारात्मक ऊर्जा निर्माण होते.
- ★ हसरा हॅप्पी मॅन घरात असेल तर हे सकारात्मक दृष्टिकोन उत्साह व आनंदी जीवनाचे प्रतीक मानले जाते. हे प्रतीक घरात ठेवल्यामुळे दुःख दूर होऊन आनंदी राहण्यासाठी प्रेरणा मिळते.
- ★ हसरा हॅप्पी मॅन घराच्या मुख्य दरवाजासमोर तोंड करून ठेवावे.
- ★ देवावर वाहिलेली फुले, हार म्हणजेच निर्माल्य घरामध्ये ठेवणे चांगले नसते लगेचच त्याचे वाहत्या पाण्यामध्ये विसर्जन करावे.

# टेलिफोन

## निलेश बामणे

दोन दशकांपूर्वी ट्रिंग - ट्रिंग! टेलिफोनची रिंग वाजत होती. ती रिंग ऐकून रिसिव्हर उचलायला कोणीही पुढे सरसावत नव्हते. जो - तो एकमेकांच्या तोंडाकडे पाहत होता कारण जो कोणी टेलिफोनच रिसिव्हर उचलणार होता, त्याला ज्या कोणा शेजाऱ्याचा फोन आला असेल त्याच्या घरी बोलवायला जाणे भाग पडणार होते. चार - पाच वेळा बेल वाजल्यावर शेवटी नाईलाजाने मी रिसिव्हर उचलला पलीकडून एक तरुणी मधुर स्वरात म्हणाली, "मी मनिषा बोलतेय! जरा कविताला बोलवता का ? कविताच नाव ऐकताच मी ताबडतोब हो! म्हणालो. कारण कविता कविता होती. जिच्यावर कविता करण्यात मी माझी कित्येक वर्षे वाया घालवली होती. मी कविताच्या घरी धावत जाऊन तिला तिचा फोन आल्याचे सांगितले. जवळ जवळ पंधरा मिनिटे फोनवरून मनसोक्त गप्पा मारून झाल्यावर कविताने रिसिव्हर खाली ठेवला आणि जाताना थँक्स म्हणून माझ्या हातावर एक रुपया ठेवला. त्यावेळी मला रस्त्यावरील त्या भिकाऱ्याची आठवण आली. ज्याला तो काही बोलण्यापूर्वीच मी एक रुपया भिक्षा म्हणून देतो. पण त्याचप्रमाणे आज पहिल्यांदाच माझ्यावरही भिक्षा घेण्याची वेळ आली. माझ्या घरातील इतर मंडळी हा अनुभव रोजच घेतात. त्यादिवशी दिवसभरात जवळ जवळ वीस पंचवीस फोन आले. त्या सर्वांना बोलावून बोलावून वीस एक रुपयाचा गल्ला मी जमा केला खरा ! पण रात्री झोपताना पायाला तेल लावून झोपावं लागलं. तेंव्हा कोठे मला जाणीव झाली एखाद्या चाळीत राहणाऱ्या माझ्यासारख्या सामान्य माणसाने आपल्या घरी फोन घेणं म्हणजे किती मोठं मनःस्ताप असतो याची.

**मी त्याच्या बायकोला जाऊन बोलावून आणलं. यापूर्वी फोनवर कधीही न बोललेली बाई टेलिफोनचा रिसिव्हर हातात धरतात थरथर कापू लागली जणू तिला मलेरियाचा ताप भरलेला असावा.**

हाच टेलिफोन जेंव्हा पहिल्यांदा आमच्या घरात आला तेंव्हा आमचा आनंद गगनात मावेनासा झाला होता. चाळीच्या नियमाप्रमाणे आम्ही चाळीत सर्वांना पेढेही वाटले होते. सुरुवातीला जेव्हा टेलिफोनची रिंग वाजायची तेव्हा रिसिव्हर उचलायला सारे तुटून पडायचो. कधी रिंग वाजतेय याची आतुरतेने वाट पाहायचो. आमच्या चाळीत राहणारे जवळ जवळ सर्वजण आमचे जवळचे किंवा लांबचे नातेवाईक होते. त्यामुळे त्यांनी आमच्या घरी फोन आल्याचा आनंद त्यांच्याच घरी फोन आल्यासारखा साजरा केला. विनाकारण घरी न येणारे आमचे नातेवाईक एक एक करून घरी येऊन फुकटची चहा ढोसून जाताना आमच्या टेलिफोनचा नंबर घेऊन जाऊ लागले. हा ! हा ! म्हणता आमच्या चाळीतील तिसरीच्या वर्गात शिकणाऱ्या मुलांचाही आमच्या टेलिफोनचा नंबर तोंडपाठ झाला. आमच्या टेलिफोनचा नंबर इतक्या लवकर ऑल इंडिया फेमस झाला की

आमच्या टेलिफोनचा नंबर आम्हाला स्वतःहून कोणाला सांगण्याची गरजच भासत नव्हती.

सुरुवातीला शेजारधर्म म्हणून आम्ही शेजारच्या कोणाचाही फोन आला की धावत जाऊन बोलावून आणायचो पण पुढे पुढे हा शेजारधर्म आम्हाला महाग पडू लागला. कारण नंतर एका एका शेजाऱ्याचे दिवसाला चार-चार फोन यायला लागले. दिवसभर घरात एकटी असणारी आमची आई त्यांना बोलावून हैराण होऊ लागली. त्यावर उपाय म्हणून आम्ही ज्या कोणा शेजाऱ्याचा फोन येईल त्याच्याकडून एक रुपया घेण्याचा निर्णय घेतला आणि तो आमलात आणला. जो नियम आजपर्यंत अव्याहतपणे सुरू आहे. डोक्याला ताप ठरणारा हा टेलिफोन घेण्याचा आम्ही स्वप्नातही विचार केला नव्हता. पण आमचा गणेश! म्हणजे माझा लहान भाऊ एल. आय. सी. एजेंट झाल्यामुळे नाईलाजाने आम्हाला तो घ्यावा लागला. आमच्या घरात गणेशपेक्षाही जास्त कोणाला जर आमच्या या फोनचा उपयोग होत असेल तर तो आमच्या सोनलला! म्हणजे माझ्या लहान बहिणीला, सोनलच्या जवळ जवळ सर्व मैत्रिणींकडे फोन होता. आमच्या घरी फोन येताच तिने तिच्या सर्व मैत्रिणींना फोन करून आमच्या फोनचा नंबर दिला. त्यांनतर जवळ जवळ आठवडाभर त्यांच्यासोबत फोनवर मनसोक्त गप्पा मारल्या. आता टेलिफोनवर गप्पा मारणे तर दूरच त्याला हात लावतानाही हजार वेळा विचार करते. कारण तिच्या मनात एक वेगळीच भिती निर्माण झाली आहे.चुकून जर एखाद्या वेळी टेलिफोनच बिल जास्त आलं तर त्याच बिल तिच्या नावे फाटायचे. आमच्या जवळचे नातेवाईक आमच्या घरी फोन आल्यापासून सार्वजनिक फोनचा रस्ताच विसरले आहेत कारण सार्वजनिक टेलिफोनसारखी आमच्या फोन ला तीन मिनिट झाल्यावर वाजणारी रिंग नव्हती त्यामुळे आमच्या फोनवरून मनसोक्त गप्पा मारता यायच्या आणि जाताना एक रुपया हातावर ठेवता यायचा. प्रत्येक एक रुपयामागे आपले चार रुपये नुकसान होतेय हे लक्षात आल्यावर मी टेलिफोनला लॉक लावण्याचा कठोर निर्णय घेतला. आणि जवळचाच चांगला मुहूर्त बघून मी तो आमलात आणला.



आमच्या टेलिफोन मुळे काही विनोदी घटनाही अनुभवास येत होत्या. जेंव्हा सुरवातीला आमच्याकडे टेलिफोन आला तेव्हा आमच्या एका शेजाऱ्याने त्याच्या बायकोला आमच्या फोनवर फोन केला. मी त्याच्या बायकोला जाऊन बोलावून आणलं. यापूर्वी फोनवर कधीही न बोललेली बाई टेलिफोनचा रिसिव्हर हातात धरतात थरथर कापू लागली जणू तिला मलेरियाचा ताप भरलेला असावा.

आमच्याच शेजारची दुसरी एक स्त्री टेलिफोनचा रिसिव्हर कानापासून तीन-चार इंच लांब धरायची. बऱ्याच

वेळा पाहिल्यावर एकदा मी रागाने म्हणलोच हा टेलिफोन आहे रेडिओ नाही! लांबून ऐकायला!! एक दिवस गणेशच्या एका गुजराती मैत्रिणीने फोन केला तो फोन नेमका सोनलने उचलला. पलीकडून ती गुजराती मुलगी म्हणली, हँलो! मैं! गणेशजीकी फ्रेंड सिद्धी बोल रही हूं, गणेशजी घरमे हैं? सोनल थोडी विनोदी स्वभावाची होती. ती चटकन म्हणाली, जी नहीं! गणेशजी तो मंदिरमे है रिद्धी के साथ! मी एक दिवस सोनल सोबत नाटक पाहायला गेलो होतो. नेमका तेंव्हाच माझ्या एका जवळच्या मैत्रिणीचा फोन आला तेंव्हा दुसरं कोणी नसल्यामुळे तो फोन आमच्या आईने रिसिव्ह केला. पलीकडून माझी ती मैत्रीण म्हणाली, हॅलो! मी विजयची मैत्रीण नीलम बोलतेय! विजय आहे का घरात? त्यावर आमची आई चटकन म्हणाली, तो सोनल सोबत नाटकाला गेलाय! आईचे हे शब्द ऐकताच तिने रिसिव्हर ठेवून दिला. दुसऱ्या दिवशी मी तिला फोन केल्यावर ती म्हणाली, मी कधी म्हणाले माझ्यासोबत गणपतीच्या देवळात चल तर तुला वेळ नसतो. मुलींसोबत नाटके पाहायला बरोबर वेळ मिळतो तुला! ही सोनल कोण आहे? मी बहीण! म्हणताच तिने सॉरी म्हणत फोन ठेऊन दिला.




एक दिवस अचानक आमचा फोन बंद झाला. मी मनाशी ठरवलं आता चार पाच दिवस फोन चालू करायचाच नाही. तेवढा चार पाच दिवस सर्वांना आराम! संध्याकाळी कामावरून घरी येताच टेलिफोनची रिंग वाजली कारण आमच्या नातेवाईकांपैकी कोणीतरी फोन बंद असल्याची तक्रार केली होती. त्यामुळे चार पाच दिवस आरामाचं स्वप्न धुळीला मिळालं. शेवटी वैतागून मी एक दिवस गणेशला म्हणालो, "आता आपण हा टेलिफोन काढून मोबाईल घेऊ या!" पण त्याला आमच्या घरातील इतर मंडळीने विरोध केला कारण आमच्या घरातील टेलिफोन आता आमच्या प्रतिष्ठेचा प्रश्न झाला होता. घराची प्रतिष्ठा सांभाळणं हे माझंही कर्तव्य मानून शेवटी मी ही हार मानली. आता टेलिफोनचा हा ताप सहन करण्याखेरीज दुसरा पर्याय नसल्यामुळे रोज सकाळी देवाची पूजा करताना मी देवाला साकडं घालायचो. देवा! परमेश्वरा!! लवकरात लवकर आमच्या चाळीतील प्रत्येकाच्या घरी टेलिफोन येऊ दे! आणि आमच्या डोक्यावरील हा ताप कायमचा दूर होऊ दे.....

## जरा हसा पाहू
## कविता

**माणुस- काय भाऊ, आजकाल तुम्ही कविता नाही लिहत .. काय झाल ???**
**कवि-नाही भाऊ, जिच्या साठी लिहत होतो. तिच लग्न झालं.**
**माणुस- अरे भाऊ, मग तर तीची आठवन घेऊन कविता अजून पण छान जमेल ना..**
**कवि- भाऊ तुम्ही समजलाय नाही का? तिच लग्न माझ्यासोबत झालंय.**

# वास्तूशास्त्र टिप्स

१. हळद, केशर यांचा टिळा लावण्यामुळे श्रीमंती येते

२. रोख रक्कम हातात पडली की ती घरी आणून देवापुढे ठेवावी. कुठल्याही परिस्थितीत त्यातील एक रुपयाही खर्च करु नये दुसऱ्या दिवसापासून खर्च करायला सुरुवात करावी.

३. बुधवारी पैसे कोणास उधार देऊ नयेत. दिल्यास ते बुडतात व वसुलीला त्रास होतो. गुरुवारी पैसे देणे चांगले, मंगळवारी कर्जाचे पैसे देऊन कर्जफेड करावी. वा शुक्रवारी कर्जफेड स्थितीत सुधारणा होते. मंगळवारी पैसे/कर्ज घेतल्यास ते लवकर फिटत नाहीत.

४. संध्याकाळ नंतर दिवे लागल्यावर कोणाला पैसे देऊ नये. तसेच राहूच्या होऱ्यात पैसे देणे/घेणे व्यवहार करू नये.

५. सूर्यास्ता अगोदर मोठी खरेदी करावी, सूर्यास्तानंतर मोठी खरेदी केल्यास व पैसे दिल्यास लक्ष्मी नाश पावते.

६. दिवा वा समईच्या ज्योतीचे तोंड उत्तरेकडे असल्यास लक्ष्मी प्रसन्न होते. पूर्वेकडे असल्यास सुखप्राती होते.

७. आपल्या कपाळी मधल्या बोटाने गंध लावूनच नंतर देवपूजा करावी. म्हणजे ती पूजा पूर्ण होते.

८. पैशासंबंधी कामासाठी निघताना उजवा पाय घराबाहेर टाकून निघावे. गणेशास एक लाल फुल मंदिरात वाहून समोर आलेल्या अपंग भिकाऱ्यास वा वृध्द भिकाऱ्यास पैसे देऊन त्याचे मन संतुष्ट करावे. म्हणजे यश मिळते.

९. घरात मनीप्लँट लावू नये. पैशाची चणचण भासते.

१०. "श्री स्वामी समर्थ" हा जप घरातल्या सर्वांनी किमान १०८ वेळा म्हणावा. कोणाही एका व्यक्तीने रोज एक हजार जप करावा. धनलाभ होतो.

११. घरातून कामानिमित्त बाहेर पडताना शर्टच्या वरच्या खिशात थोडेतरी पैसे ठेवावेतच. मोकळ्या खिशाने कधीही घराबाहेर पडू नये. पैसा पैशाकडेच जातो हे शाश्वत सत्य आहे.

१२. घराच्या व दुकानाच्या दरवाजाला पायांनी स्पर्श करू नये.

१३. रोज सकाळी पूजा झाल्यावर घरात शंख न विसरता फुंकावा. घरात वास्तव्यास असलेली अलक्ष्मी (लक्ष्मीची मोठी बहीण अवदसा) काढता पाय घेईल आणि लक्ष्मी चिरंतर नांदेल.

१४. जो मळकट कपडे घालतो. दात स्वच्छ घासत नाही, जास्त जेवतो, कठोर बोलतो आणि सूर्योदयी अथवा सूर्यास्तासमयी झोपतो तो साक्षात विष्णू असला तरी लक्ष्मी त्याला सोडून निघून जाते.

१५. जी व्यक्ती दररोज सूर्यनारायणाला किंवा गणपतीला नमस्कार करते तिला आयुष्य, आरोग्य, ऐश्वर्य व तेजाची प्राप्ति होते.

# काव्य सृष्टी

## निसर्गराजा

निसर्गराजा श्रेष्ठ मानवा
मारू नकोस व्यर्थ बढाया
मात करण्या निसर्गा वर
करशील तू किती चढाया
युगायुगांचे द्वंद्व चालले
उगाच ह्या तुझ्या लढाया
पिढ्यांमागे पिढ्या गेल्या
जाशील तू असाच वाया
चंद्रसूर्य ना कधी बदलले
बदलली रे तुझीच काया
स्वार्था पोटी होशी आंधळा
आंधळी असे तुझी माया
हवेतच तू बांधशी बंगले
हवेमध्येच त्यांचा पाया
क्षणात एका उधळून देई
कोपता कधी निसर्गराया
निसर्गा शी दोस्ती करूया
मिळेल तुज शीतल छाया
मस्ती करूनी कुस्ती करता
तप्त उन्हाच्या फक्त झाया
क्षुद्र किडा तू निसर्गातला
वळवळशी आव्हान दया
निसर्ग देईल अनंत हस्ते
करशील जर निर्मळ माया

**प्रा.अरुण सु.पाटील**



## स्वप्न

माझ घर माझ एक स्वप्न होत
त्यात सुंदरफुलपाखरू नाचत होत
माझ घर झाडामागे चालंल होत
चांदण्यांच्या कोवळया तळयात उभं होत
तिथ एक निळ पाखरु तरंगत होत
माझ घर ही घरांच्या गर्दीत होत
तिथ ते स्वतःच्या सा, रे, ग, म, त रमणार होत
हळूच गिरकी घेऊन डोलणार होत
माझ घर असं होत जस काही…
श्रावणाच्या उन्हात नहात होत
थंडी-वाऱ्यात प्रेमाने नाचत-बागडत होत
माझ घर माझ एक स्वप्न होत
तेच स्वप्नातल घर प्रत्यक्षात साकार झाल होत
आणि सर्वांना आनंदाचा सहवास पुरवत होत
माझ घर माझ एक स्वप्न होत
आंनदाचे डोही आनंद तरंग म्हणत होत.

**शुभांगी घाग**

# देवस्थान बुडलं



पाऊस झाला गाव सारं पाण्यान वेढलं
मुसळधार पावसाने गावच झोडलं
आसं कसं झाल नी अकरीत घडलं
देवालाही भविष्य कळलं नाही पुढलं
जागृत देवस्थानपाण्याखाली बुडलं.....

महापुर आला गेला पाण्याखाली गाव
भिजला सारा संसार घरदार बुडलं
गुरढोर गेली वाहुन झाला ना बचाव
दिवस रात्र पावसान गावाला वेढलं
जागृत देवस्थान माझं पाण्याखाली बुडलं...

पाण्याखाली मंदिर तिथं होता देवं
मंदिरात होती साऱ्या गावाची ठेवं
सोनं नाणं पैक सारं पाण्यात बुडलं
देवालाही पुराने नाही कि हो सोडलं
जागृत देवस्थान कसंपाण्याखाली बुडलं....

करतानाही आला तुला तुझा बचाव
नाकीतोंडी पाणी गेल न सापडे नाव
विश्वासावर तुझ्या राहीलं होत गाव
केलं होत नवस ते नाहीच फेडलं
जागृत देवस्थान कसं पाण्याखाली बुडलं...

पुजा अर्चा करूनच केल होत नवस
तुझ्या अराधानेची होती मला हवसं
महापुराने तुझ सारं मंदिर गिळलं
देव असुनही तुला कसं नाही सोडलं
जागृत देवस्थान कसं पाण्याखाली बुडलं.....

**संतराम पाटील**

# सखा पाऊस

येता सरीवर सर
मृद्‌गंध दरवळे
गंध भरूनिया मनी
सृष्टी गातसे सोहळे

रान हिरवे हिरवे
चिंब पावसाने झाले
भेगाळल्या भुईलाही
त्याने एकजीव केले

तृणपाती ही पोपटी
जशी बिलगे मिठीत
जन्म पुन्हा पुन्हा घ्यावा
ओल्या मातीच्या कुशीत

धरित्रीच्या अंगावरी
शालू शोभतो हिरवा
नखशिखांत नटली
नववधुपरी धरा

वाहे ओहोळ भरुनी
आगमने वर्षा राणी
सागराशी भेटायाला
नदी गाई गोड राणी

आकाशात इंद्रधनुष्य
करी रंग पखरण
त्यांना साठवावे उरी
नको मुक्त उधळण

सखा पाऊस खट्याळ
नित्य सहवास नवा
त्याच्या सोबतीत मिळे
धुंद प्रेमाचा गारवा

**वैशाली संजय कदम**



# गझल

घातला नाही कधीही मोडता
तेवढी माझ्यात होती सभ्यता
रात्र आहे केवढी तुमच्याजवळ
काजव्यांनो का असे भांबावता
आयते कोलीत नेती माणसे
माकडांनो का इथे रेंगाळता
वेगळ्या असल्या तरी सांभाळतो
दोन ओळींचा मनाच्या राबता
सरळमार्गी राहण्याचे सांगतो
तोच तिरकस वागण्याची शक्यता
नाइलाजाने तिच्याशी बोलतो
पाहिल्यावर येत नाही टाळता
आजवर कोणीच नाही थांबले
जा सुखा जा येथुनी हो चालता

**मंजुळ शिवाजी चौधरी पाटील**

# मला नाही माहित अजूनही

मला नाही माहित अजूनही
तू वाचतेस का माझ्या कविता ?
कि त्याही नजरेआड तुझ्या
अगदी भावना जश्या माझ्या

जर कधी चुकुनही वाचल्यास
तर बघ,शब्दांत स्वतःलाच भेटशील
स्वतःचेच प्रतिबिंब बोलकं होताना
नक्कीच अंग अंग शहारशील
भेटेल तिथे आपली पहिली भेट
डोळ्यांतून सुरु झालेली बोलणी
थेट दुरावल्याच्या खुणा तिथेच सापडतील
माझ्या एकलेपणाला मिळालेल्या
वाहह वाहह सुद्धा बघशील



भेटेल हळुवार क्षण
आठवणींच्या कोंदणात राखलेला
तर कधी भेटेल आठवणींचा लाव्हा
अजूनही मनात खदखदलेला
फक्त तुझ्या आठवणीत
मांडलेला पसारा बघशील

शब्दांत मांडल्या गावामध्ये
तु नक्की फेर फटका मारून येशील

मला नाही माहित अजूनही
तू वाचतेस का माझ्या कविता ?
कि त्याही नजरेआड तुझ्या
अगदी भावना जश्या माझ्या

समजा बघितलंस तर एक नक्की करशील
समोरच्या स्क्रीनवर
दोन बोटं मात्र फिरवशील
नाही माहित अजूनही त्याच भावना
लगडल्या असतील का बोटांना तुझ्या ?
येतील का शहारे अंगावरती माझ्या ?
हा अगदी रोजचाच खेळ
आधार देई मनाला
आज तरी तू नक्की कविता वाचशील
खोटंच समजावतो स्वतःला

मला नाही माहित अजूनही
तू वाचतेस का माझ्या कविता ?
कि त्याही नजरेआड तुझ्या
अगदी भावना जश्या माझ्या

**-वैभव दि. धनावडे**

# पाककृती

## कटाची आमटी

**साहित्य-**

१)कटाचे पाणी

२)१ मोठा कांदा -उभा चिरून

३)किसलेले सुके खोबरे-१/४ कप

४)लसून -५ मध्यम पाकळ्या

५)आल-दीड इंच

६)धणेपूड-१ टी स्पून

७)लाल तिखट-२ टी स्पून

८)गरम मसाला-१/२ टी स्पून

९)जिरे-१/२ टी स्पून

१०)कढीपत्ता-

११)तमालपत्र-१

१२)चवीनुसार मीठ

१३)गरजेनुसार तेल

पुरणपोळीसाठी डाळ शिजवल्यानंतर डाळीमधले पाणी गाळून घ्यावे हे पाणी म्हणजेच कटाचे पाणी.

**कृती -**

१)प्रथम उभा चिरलेला कांदा तव्यात थोडे तेल टाकून तपकिरी रंगावर भाजून घ्यावा तसेच खोबरे ही हलक्या तपकिरी रंगावर भाजून घ्यावे जास्त जाळू नये.

२)आता एका मिक्सरच्या भांड्यात भाजलेला कांदा,खोबरे,लाल तिखट,धणेपूड,गरम मसाला,जिरे,आल-लसून घालावे थोडे पाणी घालून मिक्सरमधून बारीक पेस्ट करून घ्यावी कटाचा मसाला तयार असेल.



३)एका कढईत तेल गरम करत ठेवावे,तेल गरम झाले कि त्यात तमालपत्र व कढीपत्ता घालावे त्यानंतर कटाचा मसाला चांगला तेल सुटेपर्यंत परतून घ्यावा साधारण ८ ते १० मिनिटे परतून घ्यावा.

४)आता यात कटाचे पाणी घालावे व मसाल्यात एकजीव करून घ्यावे गरज वाटल्यास थोडे पाणी घालावे व चवीनुसार मीठ घालावे.

५)मध्यम आचेवर साधारण १० ते १२ मिनिट आमटी उकळू द्यावी त्यानंतर आच बंद करून बारीक चिरलेली कोथांबीर घालून गरमागरम कटाची आमटी पुरणपोळी खीर व भाताबरोबर सर्व्ह करावी.

# मिरची वडा

**साहित्य :**

१)लांब जाड हिरव्या मिरच्या -५ ते ६

सारणासाठी-

२)उकडलेले बटाटे -३(मध्यम आकाराचे )

३)आल-लसून-हिरवी मिरची पेस्ट-दीड टी स्पून

४)लाल तिखट-१/२ टी स्पून

५)हळद-चिमुटभर

६)चाट मसाला-१/४ टी स्पून

७)लिंबाचा रस-१/२ टी स्पून (ऐच्छिक )

८)धने-बडीशेप-१ टी स्पून प्रत्येकी

९)शेंगदाण्याची जाडसर भरड-१ टेबल स्पून

१०)चवीनुसार मीठ

११)गरजेनुसार तेल

१२)बारीक चिरलेली कोथांबीर

बेटरसाठी

१३)बेसन-१ कप

१४)लाल तिखट -१ टी स्पून

१५)चवीनुसार मीठ

तळण्यासाठी तेल

**कृती :**

१)प्रथम बेसन, लाल तिखट व मीठ एकत्र करून थोडे पीठ भिजवून घ्यावे. साधारण भज्यांसाठी भिजतो तसे किंवा त्यापेक्षा किंचित घट्टसर.

२)मिरच्या धुवून पुसून घ्याव्यात व प्रत्येक मिरचीला मधोमध चीर देऊन त्यातील बिया काढून टाकाव्यात.

३)उकडलेले बटाटे नीट कुस्करून घ्यावेत. धने व बडीशेप तव्यावर हलकेच भाजून घ्यावेत व त्यांना खलबत्त्यात भरडसर कुटून घ्यावे. आता एका कढईत १ टेबलस्पून तेल गरम करत ठेवावे, तेल गरम झाले कि त्यात आल-लसून-हिरवी मिरची पेस्ट घालावी त्यानंतर धने-बडीशेपाची भरड तसेच शेंगदाण्याची भरड घालावी त्यानंतर हळद, लाल तिखट घालून उकडलेले बटाटे घालून एकजीव करून घ्यावे व त्यात चवीनुसार मीठ व कोथींबीर घालून पुन्हा एकजीव करून घ्यावे व आच बंद करावी. आता यात चाट मसाला व लिंबाचा रस घालून पुन्हा एकजीव करून घ्यावे.

४)तळण्यासाठी तेल तापत ठेवावे, वरील तयार मिश्रण मिरच्यांमध्ये भरावे व ह्या मिरच्या पिठात बुडवून गरम तेलात मध्यम आचेवर तळून घ्याव्यात.

५)गरमागरम मिरच्या टोमाटो सॉस किंवा हिरव्या चटणीसोबत सर्व्ह कराव्यात.



# खानदेशी छोले मसाला

**साहित्य :**

१)काबुली चणे १ छोटी वाटी
२)२ मध्यम कांदे -बारीक चिरलेले
३)१ टोमाटो-बारीक चिरलेला
४)आलं-लसूण पेस्ट १ टी स्पून
५)हळद-१/२ टी स्पून
६)धनेपूड-१ टी स्पून
७)लाल तिखट-२ टी स्पून
८)चिमुटभर -गरम मसाला
९)छोले मसाला -१ टेबल स्पून
१०)भाजलेल्या तिळाचं कूट -२ टेबल स्पून
११)तमालपत्र-१
१२)कढीपत्ता
१३)कोथींबीर
१४)चवीनुसार मीठ
१५)गरजेनुसार तेल
१६)जिरे-मोहोरी

**पूर्वतयारी :**

१)काबुली चणे रात्रभर पाण्यात भिजवून ठेवावे सकाळी चणे उपसून घ्यावे. २)एका प्रेशर कुकरमध्ये चणे शिजण्यास टाकावे त्यासोबतच एका छोट्या सुती कापडात साधारण १ टेबल स्पून चहा पावडर बांधून ती कापडाची पोटली ह्या चण्यांसोबतच शिजवायला टाकावी म्हणजे चण्याचा रंग कायम राहतो. साधारण ३ शिट्ट्यांत चणे शिजलेले असतात ३)एका गरम तव्यावर तीळ भाजून मिक्सरमधून फिरवून घ्यावे .

**कृती :**

१)एका कढईत तेल गरम करत ठेवावे ,तेल गरम झाले कि त्यात जिरे-मोहोरी घालूनती तडतडू द्यावी यानंतर त्यात तमालपत्र व कढीपत्ता घालावा त्यानंतर बारीक चिरलेला कांदा घालून परतून घ्यावे.

२)कांदा चांगला गुलाबीसर परतून झाला कि त्यात आलं-लसूण पेस्ट घालावी तसेच टोमॅटो घालून परतून घ्यावे.

३)आता यांत हळद, धनेपूड, लाल तिखट, गरम मसाला घालून चांगले परतून घ्यावे, यातच शिजवलेले चणे घालावेत व चांगले एकजीव करून घ्यावे.

४)गरजेनुसार पाणी घालून ढवळून घ्यावे, चवीनुसार मीठ घालावे तसेच तिळाचा कूट घालून ढवळून घ्यावे व साधारण ५ ते ७ मिनिटांत त्यात छोले मसाला घालून नीट ढवळून घ्यावे.

५)५ मिनिटांत आच बंद करावी व वरून बारीक चिरलेली कोथींबीर घालावी ,लिंबाची फोड ठेवून गरमागरम पुरीसोबत गरमागरम छोले सर्व्ह करावे



# गवारीच्या पुऱ्या

**साहित्य :** गवार पाव किलो, आलं लसुण पेस्ट १ चमचा, मिरच्या ३, कोथिंबीर १/२ वाटी, तिळ १ चमचा, मीठ चवीनुसार, गव्हाचे पीठ २ ते ३ वाट्या.

**कृती :** गवार निवडून घ्यावी, नंतर गवार कुकरमध्ये शिजवुन घ्यावी. मिक्सरमध्ये शिजवलेली गवार, आल लसुण पेस्ट, मिरची कोथिंबीर वाटुन घ्यावे. तयार मिश्रणात तिळ आणि मीठ घालावे. त्यात मावेल एवढे गव्हाचे पीठ घालुन घट्ट मळुन घ्यावे. नंतर त्याच्या पुऱ्या लाटुन तळाव्यात. कुठल्याही चटणी बरोबर खायला द्याव्यात.

# शेंगदाण्याचे पिठले

देशावर ज्याप्रमाणे भाकरी-चपारीबरोबर शेंगदाण्याची चटणी करून खाल्ली जाते त्याचप्रमाणे मराठवाड्यात शेंगदाण्याचे पिठले आवडीने खाल्ले जाते.

**साहित्य :** एक वाटी शेंगादण्याचा फूट, तिखट, मीठ आणि फोडणीचे सामान.

**कृती :** फोडणी देऊन आवडीनुसार तिखट, हळद, मीठ घातल्यानंतर त्यामध्ये एक ग्लास पाणी घालावे. पाण्यास उकळी आल्यावर त्यात दाण्याचे कूट घालावे व नंतर एक दोन वाफा येऊ द्याव्यात. हे पिठलेसुद्धा बरेच दिवस टिकत असल्याने बाहेरगावी जाताना ते बरोबर नेता येऊ शकते.



# मालवणी कोंबडी रस्सा

**साहित्य :** ८०० ग्रॅम कोंबडीचं मटण, गरम मसाला एक चमचा, मिरी एक चमचा, खसखस एख चमचा, धने एक चमचा, ५ लवंगा, १ दालचिनीचा तुकडा, थोडेसे तमालपत्र, १ चमचा बडीशेप, पाच चहाचे चमचे मटण मसाला, आल्याचा तुकडा, १२ लसूण पाकळ्या, थोडी कोथिंबीर, चार मोठे कांदे व एक नारळ.

**कृती :** कोंबडीच्या मटणायेच तुकडे करून स्वच्छ धुवून घ्यावे. त्याला आलं, लसूण, कोथिंबीर यांची केलेली चटणी लावावी. ३ कांदे उभे पातळ चिरून तेलात लालसर भाजावे,त्यातच किसलेले खोबरे घालून ते लालसर होईपर्यंत भाजावे. ते मिक्सरमध्ये बारीक वाटून घ्यावे. त्यानंतर वरील सगळा मसाला भाजून घ्यावा. एकत्र करून मिक्सरमध्ये बारीक वाटावा, वाटण बारीक करावे. १ कांदा बारीक चिरून घ्यावा. पातेल्यात २ मोठे चमचे तेल टाकून त्यावर बारीक चिरलेल्या कांद्याची फोडणी द्यावी. त्यातच २ तमालपत्राची पाने टाकावी. त्यावर चटणी लावलेले मटणाचे तुकडे सोडावेत. नंतर गरम मसाला व कांदा खोबऱ्याचे वाटण घालावे. थोडेसे पाणी व मीठ घालून मंद गॅसवर अर्धा तास शिजवावे.

# कांद्यांचे लोणचे

**साहित्य :** छोटे-छोटे कांदे १०, मोहरी डाळ अर्धी वाटी, तेल १ वाटी, हळद, तिखट, मीठ चवीनुसार, जिरेपूड, धणेपूड, मेथीदाणे प्रत्येकी १ चमचा, कैरी किस अर्धी वाटी, चिमूटभर साखर.

**कृती :** कांद्याचे साल काढून त्या कोमट असताना मोहरी डाळ घाला. तेल थंड झाल्यावर त्यातच भरलेले कांदे सोडा. कोरड्या बरणीत लोणचे भरून दादरा बांधा.

**टीप :** या लोणच्यात गूळ किवा साखर व कैरी किस थोडा जास्त घातल्यास छान आंबट-गोड लोणचे तयार होईल.

# मसाला भेंडी

**साहित्य:** भेंडी - अर्धा किलो, कांदे - २ मोठे, हिरव्या मिरच्या २-४, तेल - ४ टेबलस्पून, जिरे - १/२ टीस्पून, लाल तिखट - १ टीस्पून, धणेपूड - १ टेबलस्पून, हळद - १/२ टीस्पून, आमचूर - १/२ टीस्पून, मीठ -चवीनुसार

**कृती :** सर्वप्रथम कांदे सोलून उभे चिरावेत. हिरव्या मिरच्या धुवून उभ्या चिराव्यात. नंतर भेंडी धुवून, पुसून घ्यावीत व भेंडीचे टोके व देठ काढून दोन इंचाचे तुकडे करून घ्यावे व प्रत्येक तुकड्याला मध्ये उभी चीर पाडावी. तपश्चात कढईत तापवून त्यात जिरे टाकावे. ते तडतडले की चिरलेला कांदा टाकून सोनेरी रंग येत तोवर परताव. हिरव्या मिरच्या घालून जरा वेळ परतावे. त्यात भेंडीचे तुकडे घालून लगेच वरून लाल तिखट, धणेपूड घालावी व नीट मिसळून कढईवर झाकण ठेवून भेंडी शिजू द्यावी. अधूनमधून ढवळावे. चवीनुसार मीठ व आमचूर घालावे.

# ज्वारीची खिचडी

**साहित्य :** १ मध्यम वाटी ज्वारी, तूप, मोहरी, आले, कढिलिंब, हिंग, हळद आणि कांदा, टोमॅटो, ओले खोबरे, मीठ, साखर

**कृती :** ज्वारी ७-८ तास किंवा रात्रभर भिजवून ठेवावी आणि दुसऱ्या दिवशी उपसून कुकरमध्ये ४-५ शिट्ट्या करून शिजवून घ्यावी. मऊसर शिजायला हवी. आता तुपाची फोडणी करून त्यात मोहरी, आले, कढिलिंब, हिंग, हळद घालावे. त्यात आवडीप्रमाणे कांदा, टोमॅटोही वापरता येईल. फोडणीतले जिन्नस शिजल्यावर कुकरमधून काढलेली ज्वारी निथळून घेऊन घालावी. मीठ, किंचित साखर, ओले खोबरे घालून ढवळून एक वाफ काढावी. यामध्ये ज्वारीसोबत भाज्या, डाळीसुद्धा आवडीप्रमाणे घालू शकता.





# चिकन बर्गर

**साहित्य :** चिकन खिमा २५० ग्रॅम, कांदे बारीक चिरून २, तळलेला कांदा २ टेबलस्पून, कोथिबीर बारीक चिरून २ टेबलस्पून, लसूण पेस्ट १ टीस्पून, चिली फ्लेक्स ३ टेबलस्पून, काळी मिरची पूड ३ टेबलस्पून, अंडे १, ब्रेडक्रम ३ टेबलस्पून, बर्गर बन्स ४, मेयोनिझ अंदाजे, सलाडची पानं, मीठ चवीनुसार.

**कृती :** एका पॅनमध्ये तेल गरम करून घ्यावे त्यात कांदा घालून चांगले परतून घ्यावे. दुसरीकडे एका बाउलमध्ये चिकन खिमा घेऊन त्यात कांदा घालून चांगले परतून घ्यावे. दुसरीकडे एका बाउलमध्ये चिकन खिमा घेऊन त्यात कोथिंबीर, मीठ, चिली फ्लेक्स, काळी मिरची पावडर, लसूण पेस्ट आणि तळलेला कांदा घालावा त्यातच एक अंडे घालून मिश्रण छान मिक्स करू कांदा घालून चांगले परतून घ्यावे. दुसरीकडे एका बाउलमध्ये चिकन खिमा घेऊन त्यात कोथिंबीर, मीठ, चिली फ्लेक्स, काळी मिरची पावडर, लसूण पेस्ट आणि तळलेला कांदा घालावा त्यातच एक अंडे घालून मिश्रण छान मिक्स करू ठेवावा. अशा प्रकारे आपला चिकन बर्गर तयार आहे.

# मक्याचा उपमा

मक्याचे दाणे, लसूण ७-८ पाकळ्या,१ मध्यम आकाराचा कांदा लांबट चिरून, कोथिंबीर,कडीपत्ता मिरची आम्हाला जास्त तिखट लागते, सो आम्ही ८ ,घेतल्या होत्या, ज्यांना तिखट झेपत नाही त्यांनी कमी घ्या. राई - अर्धा छोटा चमचा,जिरे - एक चमचा , सौंफ ( बडीशोप) - अर्धा छोटा चमचा, मीठ - चवीनुसार, हळद - एक चमचा तूप किंवा तेल आवडीनुसार.

**क्रमवार पाककृती:**

मक्याचे दाणे मध्यम आचेवर भाजून घ्यायचे. भाजताना ते थोडेसे कच्चे ठेवायचे. भाजलेले दाणे थोडे गार झाले की मिक्सरमध्ये भरडल्या सारखे वाटायचे. आता तो भरडा एका भांड्यात काढून घ्यायचा अन त्यातच मिरची, कांदा, लसूण, कोथिंबीर, कडीपत्ता, थोडीसी मोहरी, जिरे, सौंफ एकत्र बारीक वाटून घ्यायचे. हे झाले की गॅसवर कढई ठेवून ती तापवून घ्यायची. खूप जास्त तापवायची नाही अन मुख्य म्हणजे आच मध्यम ठेवायची. तर कढई नीट तापली की त्यात दोन तीन मोठे चमचे तूप किंवा तेल घाला. तेल असेल तर कडक तापू द्यायचे, तूप जास्त गरम केले की जळते, सो जास्त तापवायचे नाही. आता त्यात मिरची अन बाकीच्या साहित्याचे जे वाटण केलेय ते घालून त्याची फोडणी करावी. फोडणीला सोनेरी रंग आला की त्यात मक्याची भरड घालून हलवायचे. लक्षात घ्या, याला सतत हलवावे लागते नाहीतर कढईला चिकटून जळते, अन हो या उपम्यात पाणी नाही घालायचे. छान गोळा बनायला लागला की उपमा तयार झाला. हा गरमागरम खायला भारी लागतोच पण गार करून खाल्ला तरी छान लागतो.



# वास्तूशास्त्र टिप्स

१६. रुद्राक्ष धारण करण्यासाठी वय, धर्म, जात , लिंग , देश इत्यादी नाहीत. रुद्राक्षाचे पवित्र्य नेहमी राखा यचे असते. त्यामुळे रुद्राक्षाची माळ झोपताना अथवा शरीरसंबंध ठेवताना वापरू नये. रुद्राक्षाची माळ घालून मृताजवळ जाऊ नये. कोणत्याही कारणाने रुद्राक्षाची माळ अशुद्ध झाली तर ती दुधाने धुऊन घेऊन श्रद्धापूर्वक तिची पूजा करावी व "ॐ नमः शिवाय" या मंत्राचा १०८ एवढा जप करावा व नंतर रुद्राक्ष माळ धारण करावी.

१७. दर गुरुवारी तुळशीला थोडे दूध घातल्याने घरात लक्ष्मीचे कायमस्वरूपी वास्तव्य राहते.

१८. एखाद्या मंगळवारी हनुमान मंदिरात जाउन १ किलो गूळ अर्पण करावा व तिथेच बसून "हनुमान चालिसा" चे ११ पाठ करावेत. अनावश्यक खर्चाला पायबंद बसेल.

१९. कामानिमित्त घरातून बाहेर पडताना एखादे तुळशीपत्र तोंडात टाकावे.पैशाअभावी अडकलेली कामे मार्गी लागतील.

२०. दर पौर्णिमेला रात्री बारानंतर लक्ष्मीचे वास्तव्य काही काळ अश्वत्थ वृक्षावर म्हणजे पिंपळावर असते आणि म्हणूनच ज्यांना शंका होईल त्यांनी अश्वत्थ वृक्षाला दहा प्रदक्षिणा घालाव्यात, आर्थिक अडचण कधी उद्भवणार नाही.

२१. घरातील फरशी पुसताना थोडे खडे मिठ पाण्यात टाकावे. त्यायोगे घरातील नाकारात्मक ऊर्जा नष्ट होईल. लक्ष्मी प्राप्तीतले सर्व अडथळे दूर होतील.

२२. घरात, दुकानात किंवा कार्यालयात मुरली वाजविणाऱ्या श्रीकृष्णाची तसवीर पूर्वेकडील भिंतीवर लावावी. कर्ज घेण्याची वेळ कधीच येणार नाही.

२३. नोकरीमध्ये प्रमोशन मिळत नसेल तर हा उपाय करावा. सर्वात प्रथम उजव्या हातावर काळ्या रंगाचा दोरा बांधलेला असेल तर सर्वात प्रथम तो काढून टाकावा आणि त्याऐवजी पचंरगी धागा बांधावा. दररोज सकाळी कबुतरांना ज्वारी टाकावी. प्रगती १००% होतेच होते.

२४. ज्या ज्या वेळी आपण समुद्रकिनारी फिरायला जातो त्या त्या वेळी जलदेवतेला प्रार्थना करून एक श्रीफळ (नारळ) कुंकू अर्पण करुन विसर्जित करा.

२५. रोज रात्री पूजा केल्यानंतर किंवा लक्ष्मीपूजन केल्यानंतर घरामध्ये, व्यावसायिक ठिकाणी शंख वाजवावा कटकट निघून जाते.

२६. दूध व साखर मिसळलेले पाणी पिंपळाच्या झाडाला घालावे.

२७. घरामध्ये सूर्योदय आणि सूर्यास्ताच्या अगोदर झाडू मारावा. त्यामुळे घरामध्ये दारिद्रय येत नाही. उत्तर- पूर्वेला दरवाजा असेल तर तांदळाचं आणि पश्चिम-दक्षिणेला दरवाजा असेल तर गव्हाचे स्वस्तिक उंबरठयावर काढावं. त्यावर मधोमध सुपारी व चार बिंदुवर रुपया हळकुंड, खारीक व बदाम असं क्रमाने ठेवावं किंवा विडयाच्या पानावर अक्षता सुपारी ठेवून ते पान उंबरठयावर ठेवा. किमान सणासुदीला वा वाढदिवशी वगैरे तरी हे करावे.

२८. उपवास करून - शरीरशुध्दी होते,
यात्रा करून - शरीर बलवान होते,
जप करून - मानसिक विकास होतो,
अनिष्ट ग्रहांची शांती केल्याने - यश मिळते,
धन, रत्न जतन केल्याने - लक्ष्मी स्थिर राहते,
दान केल्याने - धन दौलत व राजऐश्वर्य लाभते,
वास्तुशास्त्रानुरूप - घर बांधल्याने स्वास्थ्य मिळते,
रत्न वापरल्याने - मानसिक स्थिरता, शरीर बलवत्ता लाभते,

२९. पैशाची कधीही कमतरता भासणार नाही.
अश्र्वत्थाची (म्हणजे पिंपळाची) नित्य पूजा करून त्याला पाणी घालावे व "दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा" हा मंत्र म्हणून १०८ प्रदक्षिणा घालाव्यात व सूर्यास्तानंतर तेथे साजूक तुपाचे निरांजन लावून ठेवावे तुमच्या मस्तकावर लक्ष्मीचा सदैव वरदहस्त राहील.

३०. कुलदैवताचे वर्षातून एकदा दर्शन, अभिषेक व पूजा टाळाटाळ न करता करावी. तुमच्याकडे पैशाचा ओघ सतत वाहात राहील.

३१. गुरूपुष्यामृत योगावर सराफाकडून किमान १ मिलीग्रॅम तरी सोने न विसरता प्रसंगी पोटाला चिमटे घेऊन विकत आणावेच आणावे. गुरूपुष्यामृत केव्हा आहे हे पंचागात किंवा कॅलेंडरमध्ये दिलेले असते तो दिवस माहीत करून घ्यावा व लक्षात ठेवावा. पुरेसे सोने जमा झाले की पत्नीलाच एखादा दागिना करावा. सोने गुरुपुष्यामृत योगावर खरेदी करण्याचे कारण असे की ते विकायची पाळी कधीच येणार नाही.

३२. कोणत्याही महत्त्वाच्या कामासाठी घराबाहेर पडताना चमचाभर गोड दही खाणे अत्यंत शुभ व लाभदायक.

३३. स्नान करूनच भोजन करावे. जेवण केलेल्या ताटात हात धुवू नये. मांडीवर वा हातात ताट घेऊन जेवू नये. दक्षिणेकडे तोंड करून जेवू नये.

३४. एक लांबलचक मोरपीस विकत आणून ते घराच्या दक्षिणेकडील भिंतीवर सेलो टेपने चिकटवून ठेवावे रोज सायंकाळी त्याला उदबत्ती ओवाळावी. हा तोडगा ज्यांचे येणे अडकून पडले आहे त्यांनी अवश्य करून पाहण्यासारखा आहे. तीन चार महिन्यात येणे असलेली रक्कम हटकून परत मिळते.

३५. व्यापार मंदावत चालला असेल, व्यापार बंद पडला असेल किंवा भांडवल असूनही व्यापार होत नसेल तर अशा वेळी व्यापारामध्ये यश येण्यासाठी पुढील प्रभावी तोडगा अवश्य करावा. दररोज सकाळी देवासमोर बसून विष्णुसहस्त्रार्जुनचा जप करावा. तसेच तुळशीकाष्ठाची पाने घेऊन "ॐ नमो विष्णवे नमः" या मंत्राचा जप करावा

३६. रोज गरम तव्यावर पोळी-भाकरी भाजण्यापूर्वी दूध शिंपडावे यामुळे घरातील आजारपण कमी होते.

३७. जास्तीत जास्त अन्नदानाच्या योगे अनेक दोष नष्ट होतात.

३८. जेव्हा बँकेत पैसे जमा करण्यासाठी जात असाल तेव्हा रस्त्याने ओठ न हलवता मनातल्या मनात "श्री" मंत्राचा जप अवश्य करत जावा. यामुळे आर्थिक स्थितीमध्ये आश्चर्यकारक रूपात वृद्धी होईल. वारंवार धन जमा करण्याची संधी येईल.

३९. घरातील नवीन केरसुणी आणल्यावर तिला हळद/कुंकू लावून पूजा करून वापरावी. तिला पाय लावू नये व ती सहज दिसेल अशी ठेवू नये. दिवे लागल्यावर झाडू मारू नये.

४०. घराचा मुख्य दरवाजा नेहमी फडक्याने पुसून स्वच्छ ठेवावा तसेच संध्याकाळी तिन्ही सांजेला मुख्य दरवाजा थोडा वेळ उघडा ठेवावा. त्या वेळेस धूप दाखवावा.

४१. दसऱ्याच्या दिवशी एखाद्या गर्भश्रीमंत व चरित्र्यवान व्यक्तीने दिलेली आपट्याची पाने चांदीच्या अगर पितळेच्या डबीत ठेवून ती देवापाशी ठेवावी. अशा तऱ्हेने मिळालेली आपटयाची पाने ही धन देणारी असतात.

४२. घरात ज्या खोलीत तिजोरी ठेवलेली असेल त्या भिंतीचा रंग काळा, लाल अथवा निळा नको. पिवळा असावा.

४३. रोज सकाळी पाण्यात थोडेसे मीठ मिसळून त्या पाण्याने घरातील फरशी पुसावी. मनःशांती लाभते .

४४. रोज सकाळी पहिली भाकरी गायीला, दुसरी कुत्र्याला व तिसरी छतावर पक्ष्यांसाठी ठेवावी. यामुळे पितृदोष नाहीसा होतो व पितृदोषाने होणारा त्रासही कमी होतो.

४५. कोणाकडून कर्ज घेतले तर, त्यातले ५-१० रुपये त्वरित कर्ज परतफेड म्हणून परत करावेत. कर्ज लवकर उतरते.

४६. सगळ्यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे वास्तुदोषावर उपाय म्हणून घराची तोडफोड करणे हे शास्त्रसंमत नाही. तोडफोड केल्याने सगळ्यात तोटा म्हणजे वास्तुभंगाचा दोष लागतो.

४७. घराच्या प्रवेशद्वारावर/ मुख्य दरवाजावर लाल रंगाचे कुंकवाचे स्वस्तिक चिन्ह काढावे. या स्वस्तिकची स्टिकर्स शक्यतो लावू नये.

४८. उंबरठयावर दर पार्णिमेला तसेच अमावस्येला पाच कापराच्या वडया (पंचमहाभूतांच्या दोष परिहारार्थ) जाळाव्यात.

४९. कान तुटलेले अथवा भेगा गेलेले कप, स्टीलची, काचेची अथवा प्लॅस्टिकची भेगा गेलेली भांडी, बंद पडलेली घडयाळे किंवा भंगारवजा सामान घरात ठेवू नये. अशा वस्तू ताबडतोब घराबाहेर काढाव्यात कारण या तुटलेल्या व भंगारवजा वस्तूंमध्ये कलीचा वास असतो.

५०. एकाक्ष नारळाला विशेष महत्व का असते ?

उत्तरः बहुतेक सर्व नारळाला तीन डोळे असतात. क्वचितच एक डोळा असलेला नारळ असू शकतो. एकाक्ष नारळ लक्ष्मीदायक असल्याने ने सांपत्तिक लाभ होतो. म्हणून अशा एकाक्ष नारळाला "चिंतामणी नारळ" म्हणतात. असा नारळ फोडत नाहीत त्यास देवघरात व्यवस्थित ठेवून देतात.

५१. विष्णू, सूर्य आणि शिव यांच्या मंदिरासमोर कधीही घर बांधू नये.

५२. घराच्या मुख्य दरवाजापेक्षा घराचे आतील दरवाजे हे कधीही उंच अथवा मोठे असू नयेत.

५३. वास्तूची आयुमर्यादा काढायची असल्यास घराच्या किंवा इमारतीच्या क्षेत्रफळाला ८ ने गुणून १२० ने भाग दिल्यावर जी संख्या उरते तेवढे त्या गृहाचे अथवा इमारतीचे आयुष्य आहे, असे समजावे.

५४. काटेरी वृक्ष घरामध्ये लावणे प्रत्येकाने जरूर टाळावे.

५५. बाधित वास्तूसाठी काय उपाय करता येतात ?

उत्तरः यामध्ये काही तांत्रिक उपाय करून अशी बाधा दूर करता येते. मात्र त्यापेक्षा श्री सप्तशतीची आवश्यकतेनुसार हवनात्मक नवचंडी किंवा शतचंडी करावी.

५६. ज्या व्यक्तींच्या घरात बेलाचा वेल असतो त्या घरात लक्ष्मीचा वास असतो.

५७. यशस्वी होण्यासाठी कर्तृत्वाला आणखी एका गोष्टीची जोड द्यावी बायकोच्या व्यवहारचार्तुयाची (म्हणून मित्रांनो आपल्या बायकोच्या भावभावनांचा थोडा विचार करा. आपल्या संसारात सुखी राहा

५८. आपल्या घरच्या प्रवेशद्वारासमोर कोणतेही झाड असू नये हे शतशः खरे आहे. त्यामुळे द्वारवैद्य हा दोष निर्माण होतो. तसेच प्रवेशद्वारावर कोणत्याही झाडाची सावली पडू नये हेही निक्षून सांगितले आहे. "सोने देणारे झाड" असे असले तरी त्याची सावली प्रवेशद्वारावर असू नये. अशा शब्दात वृक्षायुर्वेदकार याबाबत आग्रहीपणाने सांगतात.

५९. घरमालकीण गरोदर असताना बांधकाम सुरु करु नये.

६०. ज्यांचा विवाह होण्यास अनेक अडचणी येतात, ठरलेले विवाह मोडतात अशांनी "नवनाथ भक्तिसार" २८ वा अध्याय दररोज संध्याकाळी सात नंतर वाचावा.

६१. नोकरीच्या मुलाखतीस जाताना थोडा गूळ रस्त्यावरील गायीस खायला द्यावा.

६२. मुले नीट वागण्यासाठी नवनाथ भक्तिसारातील ५ वा अध्याय घरात दररोज संध्याकाळी ७ नंतर वाचावा.

६३. आपल्या घरामध्ये आपली पत्नी, मुले किंवा कोणालाही अपशब्द वापरु नयेत. कारण वास्तू नेहमी तथास्तु म्हणत असते.

६४. वर्षातून एकदा तरी कुलदेवताच दर्शन घ्यावे.

६५. रोज सकाळ-संध्याकाळ आपणास आवडत्या अशा मंद सुवासाची उदबत्ती किंवा धूप घरात जाळावे.

६६. आपल्या स्वतःच्या गाडीचे पार्किंग उत्तरेस किंवा पूर्वेस तोंड करुन ठेवावे. दक्षिणेला तोंड करुन गाडी ठेवू नये.

६७. शिकार केलेल्या प्राण्यांचे मुखवटे किंवा जंगली ओबडधोबड लाकडाचे सिरॅमिक्स घरात ठेवू नयेत.

६८. बेडरुमला रंग लावताना पिस्ता किंवा गुलाबी रंगाचा वापर करावा.

६९. तुळशीत काही लोक शंकराची पिंड ठेवतात. ते चुकीचे आहे. तर काही लोक भंगलेल्या मूर्ती तुळशीत ठेवतात तेही चुकीचे आहे. तुळशीत फक्त देवास वापरलेले पाणी विसर्जित करावे.

७०. घरात विनाकारण कटकट होत असेल तर घरामध्ये हळद आणि गोमूत्र मिश्रित पाणी शिंपडावे. तरीही फरक न वाटल्यास पाच सवाष्णींना मानपान करावे व दूध द्यावे. असे केल्याने कटकटी कमी होतील.

७१. श्रीवेद व्याससुध्दा म्हणतात ज्याचे मन किंवा विचार मोठे त्याचे भाग्यही मोठे असा मानसशास्त्राचा प्रत्यक्षानुक्षणी सिद्धान्त आहे.

७२. ज्या वनस्पतीमधून पांढरा चीक येतो अशी झाडे घराभोवती लावू नये.

७३. देवघरात, देवाच्या फोटोबरोबर मृतव्यक्तीचे फोटो ठेवू नये.

७४. मुख्य दरवाज्यास उंबरठा असणे आवश्यक असते.

७५. ज्या नवीन वास्तूस दारे, खिडक्या बसविलेल्या नाहीत अशा वास्तू मध्ये ब्राह्मणभोजन झाल्याशिवाय कधीही प्रवेश करू नये.

७६ उंबरठयावर लक्ष्मीची पावलं चिकटवू नयेत. कारण त्या लक्ष्मीच्या पावलांवर आपली पावले पडणं हे काही बरं नाही !

# किचन

१) किचनमध्ये जेवण बनवताना चेहरा नेहमी पूर्वेकडे असणं सर्वांत चांगलं. जर पूर्वेकडे नाही मिळाला तर उत्तरेला चेहरा गेला तरी चालेल.

२) किचनच्या दक्षिणेला सर्वांत जास्त वजन देणे गरजेचे आहे.

३) किचनच्या पश्चिमेला Second Priority देणे (वजन ठेवण्यासाठी)

४) किचनच्या पूर्वेची wall जेवढी मोकळी ठेवता येईल तेवढी ठेवणे, उत्तरेची wall पण ओपन ठेवणे.

५) किचनमध्ये ग्रोसरी (धान्य साठवण) हे नेहमी दक्षिण- पश्चिमेला ठेवणे, येथे रोज वापरायचे धान्य ठेवणे.

६) किचनची Crokery पूर्व -उत्तर भागातच ठेवणे.

७) किचनच्या वायव्य भागात आपल्या अन्नधान्याचा थोडातरी साठा Display ला पाहिजे. उदा.तांदूळ, गहू, मसाले पदार्थ, डाळी. इ.

८) Frigde, Mixer, Oven यांना किचनच्या आग्नेय Setup देऊ शकता.

९) किचनच्या वायव्येला एक फोटो फ्रुट, अन्नधान्याचा Original किंवा फ्रेम असेल तर चालेल असा ठेवणे.

१०) फ्रिजवर कुठल्याच पद्धतीचे सामान न ठेवणे.

११) मॉड्युलर किचन सर्वात चांगलं. किचनमध्ये सर्व सामान Display बंद असावं. जेवढा पसारा कमी तेवढं चांगलं. किचनच्या Platform वर फक्त gas व दिवसभरात जेवण एवढेच ठेवणे.

# वास्तु टिप्स

१. आरोग्यदायी जीवनासाठी झोपताना पूर्वेला व दक्षिणेला पाय करून झोपू नये . आपण कुठे व कसे झोपतो यावर आपले आरोग्य अवलंबून असते.

२. उत्त्तम आरोग्यासाठी उत्तर दिशेला पाय करून झोपावे म्हणजे आर्थिक, मानसिक,शारीरिक प्रगती चांगली होते.

३. आजार बरे होत नसतील तर झोपण्याची जागा बदलून पाहा. म्हणजे आजार लवकरात लवकर बरा होईल. बेडसमोर आरसा अथवा आरशाचे कपाट येऊ देऊ नये. त्यामुळे शरीरातील ऊर्जेची हानी होते व आजार वाढतात.

४. आरोग्यदायी जीवनासाठी बॉक्स बेडवर झोपू नये बॉक्स बेड वर झोपणे म्हणजे आजारांना निमंत्रण देण्यासारखे आहे.

५. घरामध्ये सुख-समृध्दीदायक आयुष्यासाठी फुटलेले आरसे, फुटलेली खेळणी,तुटलेले फर्निचर इ. वस्तु ठेवू नये .

६. भरपूर प्रगतीसाठी आणि यशदायी गतिमान आयुष्यासाठी बंद पडलेले घड्याळ घरामध्ये ठेवू नये .

७. झोपताना घराच्या दक्षिण किंवा पश्चिम दिशेमध्ये बेड असावा म्हणजे आरोग्य आणि ऐश्वर्य चांगले मिळते.

८. घरातील वय वर्ष २५ ते ६० असलेल्या कमावत्या व्यक्तीने उत्तरेला पाय करून झोपावे. उत्तर दिशा ही उत्तरोत्तर प्रगती करणारी असते त्यामुळे कोणतेही काम करताना उत्तरेला तोंड करून करावे.

९. घरामध्ये अडगळ, भंगार किंवा जुन्या बंद पडलेल्या वस्तू ठेवणे म्हणजे आपणच आपली प्रगती थांबविण्यासारखे आहे.

१०. घराची उत्तर दिशा बंद असेल तर कर्जबाजारी होण्याचे प्रमाण वाढते आणि घरातील आर्थिक समस्या वाढतात.

११. नवीन घर घेताना वास्तुशास्त्रानुसार घर आहे की नाही हे पाहून घर विकत घ्यावे म्हणजे घरामध्ये सुख-समृद्धी आणि उत्तम आरोग्य राहते.

१२. नवीन घर घेताना घराचा दरवाजा उत्तर किंवा पूर्व दिशेला असावा म्हणजे घराच्या दरवाजातून बाहेर बघताना उत्तर किंवा पूर्व दिशा असावी.

१३. नवीन घर घेताना दक्षिण, पश्चिम, नैऋत्य आणि आग्नेय या दिशातून येणारे दरवाजे टाळावेत.

१४. भाग्योदयासाठी घराच्या हॉलमध्ये बांबू ट्री म्हणजेच लकी ट्री ठेवावा.

१५. घरामध्ये नकारात्मक शक्ती प्रवेश करू नये आणि घरामध्ये शुभ ऊर्जा भक्कम राहावी यासाठी मुख्य दरवाजाला लाकडी उंबरा बसविणे महत्त्वाचे आहे.

१६. घराच्या मुख्य दरवाजावरती वाळलेली फुले, पाने, सुकलेली तोरणे काढून टाकावीत. म्हणजे घरामध्ये शुभ उर्जा प्रवेश करण्यास कोणताही अडथळा निर्माण होत नाही.

१७. घरातील सर्व खोल्यांमधील घड्याळे ही उत्तर किंवा पूर्व भिंतींवर लावावीत म्हणजे घड्याळाकडे बघताना

आपले तोंड पूर्व व उत्तर या शुभ दिशांना होते.

१८. घरातील सर्व खोल्यांमधील कॅलेंडर्स ही पूर्व किंवा उत्तर भिंतींवर लावावीत म्हणजे कॅलेंडर कडे बघताना आपले तोंड शुभ दिशांना होते.

१९. कोणतेही काम करताना आपले तोंड उत्तर किंवा पूर्व दिशेला असावे म्हणजे आपले काम वेळेत आणि विना अडथळा पार पडते .

२०. झोपताना कधीही दक्षिणेला पाय करून झोपू नये त्यामुळे आजारपण वाढते आणि माणूस कर्ज बाजारी होतो .

२१. घराच्या ईशान्य दिशेला वजन ठेवू नये. ईशान्य दिशा ही नेहमी हलकी आणि मोकळी ठेवावी म्हणजेच घरामध्ये शांतता राहते .

२२. सुखसमृद्धीसाठी घराच्या मुख्य दरवाजासमोर बालाजीचा फोटो लावावा .

२३. बेडरूममध्ये देवघर किंवा देवाची मूर्ती, फोटो असू नये .

२४. लाल, काळा, मरून हे तीन कलर घरामध्ये जास्त वापरू नयेत यामुळे घरा मध्ये सुखसमृद्धीदायक आयुष्यासाठी अडचणी येऊ शकतात .

२५. झोपताना बेडस्विच बोर्ड पाशी येऊ देऊ नये. त्यामुळे निद्रानाशाचा अडथळा येऊ शकतो .

२६. घरामध्ये नकारात्मक शक्ती प्रवेश करू नये म्हणून मुख्य दरवाजाजवळ तुळस असणे आवश्यक आहे

२७. दरवाजाच्या चौकटीवर आतूनबाहेरून विघ्नहर्त्याची म्हणजेच गणपतीची टाइल्स लावणे आवश्यक आहे .

२८. घराच्या प्रत्येक रूममध्ये खडे मिठाचा बाऊल ठेवणे .

२९. आठवड्यातून एकदा खडे मिठाच्या पाण्याने फरशी पुसणे यामुळे घरामध्ये सुख समृद्धी राहते.

३०. मुलांची शैक्षणिक प्रगती चांगली होण्यासाठी त्यांना पूर्वेला डोके आणि पश्चिमेला पाय करून झोपवावे .

३१. मुलांच्या उत्तम शैक्षणिक प्रगतीसाठी पूर्वेला तोंड करून अभ्यासाला बसवावे .

३२. लहान मुलांना घराच्या नैऋत्य दिशेमध्ये झोपवू नये त्यामुळे त्यांच्या शैक्षणिक प्रगतीत अडथळे येऊ शकतात.

३३. घरामध्ये पैसा, संपत्ती, ऐश्वर्य टिकवून राहण्यासाठी घराच्या नैऋत्य दिशेमध्ये तिजोरी किंवा पैशाचे कपाट ठेवावे .

३४. घरामध्ये शैक्षणिक आर्थिक प्रगती व्हावी यासाठी भडक रंगाचे कपडे वापरणे टाळावे .

३५. ईशान्य दिशेला वास्तुदोष असेल तर मुलांच्या शिक्षणावर आणि आरोग्यावर खूप वाईट परिणाम होतात .

३६. नवीन घर बांधताना किंवा विकत घेताना घराचा आकार आयताकृती किंवा चौकोनी असावा .

३७. मुलांच्या उत्तम शैक्षणिक प्रगतीसाठी सरस्वतीचे प्रज्ञावर्धन स्तोत्र आणि गणपती अथर्वशीर्ष मुलांनी रोज म्हणावे .

३८. उत्तम वैवाहिक आयुष्यासाठी नवरा- बायकोने दोन जोडलेल्या बेड वर झोपू नये .

३९. नवीन घर घेताना पहिल्या व शेवटच्या मजल्यावरचे घर विकत घेणे टाळावे.

४०. आरोग्यदायी जीवनासाठी घरामध्ये पिवळा, काळा, लाल हे रंग कोठेही येऊ देवू नये .

४१. घर बांधताना यशस्वी जीवनासाठी नैऋत्य दिशेला बोअरिंग, विहीर पाण्याची टाकी बांधू नये.
४२. दक्षिणेला पाय करून झोपू नये कारण आरोग्य, पैसा व मानसिक ताण यांची हानी होते .
४३. घराच्या मुख्य दरवाजाजवळ उतरता किंवा चढता जिना असेल तर अनेक वाईट घटनांना सामोरे जावे लागते.
४४. घराच्या मुख्य दरवाजासमोर लिफ्ट असेल तर घरामध्ये आर्थिक ,शारीरिक व मानसिक हानी होते .
४५. हिंशू पशू पक्ष्यांची, जंगली जनावरांची तोंडे घरामध्ये लावु नयेत .
४६. घरात किंवा घराच्या बाहेर काटेरी वनस्पती ठेवू नयेत .
४७. उत्तम प्रगती हवी असेल तर काळ्या शाईचे पेन वापरू नये .
४८. उत्तम प्रगतीसाठी तांब्याची अंगठी करंगळी शेजारच्या बोटामध्ये म्हणजेच अनामिकेमध्ये धारण करावी .
४९. कोणतेही काम करताना प्रत्येक गोष्टीला हो म्हणावे नकारात्मक बोलणे टाळावे.
५०. घरामध्ये बुडते जहाज किंवा वादळामध्ये फसलेली नौका यांची चित्रे भिंतींवर लावू नयेत .
५१. घरामध्ये कोठेही लाल, मरून, काळ्या रंगाचे पडदे वापरू नयेत .
५२. घराच्या मुख्य दरवाजावरती भयानक चित्रे, लिंबु मिरची ,राक्षसाची तोंडे असे चित्र लावू नये.
५३. घरामध्ये अश्रू ढाळणाऱ्या स्त्रियांची, पुरुषांची किंवा मुलांची चित्रे लावू नयेत.
५४. घराच्या मुख्य दरवाजावरती सुकलेली फुले, वाळलेली पाने यांची तोरणे जास्त दिवस ठेवू नये.
५५. घराचा मुख्य दरवाजा पूर्ण उघडणे महत्त्वाचे आहे म्हणजेच मुख्य दरवाजाच्या आत आणि बाहेर कोणताही अडथळा ठेवू नये .
५६. घरामध्ये सुखसमृद्धी मिळावी यासाठी सकाळ संध्याकाळ धूप, अगरबत्ती, निरंजन लावणे महत्त्वाचे आहे .
५७. घरामध्ये सुखसमृद्धी मिळावी यासाठी घरामध्ये नकारात्मक बोलणे, भांडणे टाळावीत .
५८. मुलांच्या उत्तम प्रगतीसाठी त्यांची बेडरूम ईशान्य, उत्तर किंवा वायव्येला असावी.
५९. मुलांचे स्टडी टेबल पूर्व आणि ईशान्य दिशेमध्ये असावे .
६०. मुलांच्या उत्तम शैक्षणिक प्रगतीसाठी स्टडी टेबलचा आकार आयताकृती, चौकोनी असावा, गोलाकार नसावा.
६१. मुलांच्या बेडवरती किंवा स्टडी टेबलवरती कपाट असु नये .
६२. आपल्या घराचे पार्किंग कोणत्याही दिशेस असो परंतु पार्किंगमध्ये गाडी लावताना उत्तर किंवा पूर्वेला तोंड करून लावावी .
६३. नवीन कार घेताना लाल, काळा व मरून कलर या रंगाची कार घेणे टाळावे .
६४. नवीन कार घेताना कारच्या नंबर प्लेटसच्या अंकांमध्ये चार व आठ हे अंक येऊ देऊ नये .
६५. नवीन कार घेताना कारच्या नंबर प्लेटमधील अंकांची बेरीज तीन, सहा, नऊ अशी असावी अंकांची टोटल चार व आठ नसावी .
६६. कार प्रोटेक्शनसाठी कारच्या डिक्कीमध्ये खडे मीठ कापडी पिशवा मध्ये भरून ठेवावे .

६७. घराच्या आग्नेय दिशेला टॉयलेट, पाण्याचे बेसिन येऊ देऊ नये .
६८. घर बांधताना ईशान्य दिशेला जिना येऊ देऊ नये.
६९. घराची उत्तर दिशा बंद असेल तर हेल्थ आणि वेल्थ प्रॉब्लेम येऊ शकतात .
७०. घरामध्ये देवांचे फोटो भिंतींवर टांगून ठेवू नये, त्यांचे पावित्र्य भंग होते .
७१. घरातल्या कर्त्या व्यक्तीने वायव्य दिशेला झोपू नये.
७२. घरामध्ये कोठेही फॉल सिलिंग करू नये. घराची उंची कमी होते त्यामुळे घरातील अडचणी वाढू शकतात.
७३. इन्व्हर्टर , यू.पी.एस. बॅटरी घराच्या आग्नेय दिशेला असावी.
७४. ऑफिसमधले टेबल आयताकृती किंवा चौकोनी असावेत गोलाकार नसावेत .
७५. ऑफिस विकत घेताना ऑफिसचा दरवाजा उत्तर, पूर्व किंवा ईशान्येकडे असावा.
७६. व्यवसाय करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने उत्तर दिशेला तोंड करून बसावे .
७७. ऑफिसमधील खिडक्या उत्तर आणि पूर्व दिशेला असतील तर भरपूर प्रगती होते .
७८. व्यावसायिकाने झोपताना उत्तरेला पाय करून झोपावे म्हणजे व्यवसायात लाभ भरपुर होतो .
८०. ऑफिसमध्ये अकाउंट डिपार्टमेंट उत्तर किंवा वायव्य दिशेला असावे .
८१. ऑफिसमध्ये लाल, काळा, मरून हे रंग वापरू नयेत.
८२. ऑफिसमध्ये ईशान्य दिशेला पिण्याचे पाणी ठेवावे आणि जागा सुद्धा रिकामी ठेवावी .
८३. ऑफिसच्या आजूबाजूच्या परिसरामध्ये खड्डा, चढ-उतार, उंच वाढणारी झाडे अशा गोष्टी येऊ देऊ नयेत .
८४. ऑफिसमध्ये खूप मोठे देवघर ठेवू नये. देवाचा छोटासा फोटो ठेवावा .
८५. ऑफिसमध्ये इन्व्हेटर, यु.पी.एस. बॅटरी आग्नेय दिशेला असावीत.
८६. ऑफिसमध्ये टॉयलेट हे वायव्य दिशेला असावे.
८७. देवघर घराच्या ईशान्य दिशेला असावे .
८८. घरामध्ये किंवा दुकानामध्ये देवाची पूजा करताना आपले तोंड पूर्व दिशेला करावे .
८९. गणपती बाप्पाची मुर्ती घराच्या ईशान्य दिशेला स्थापन करावी आणि पुजा करताना आपले तोंड पुर्वे दिशेला करावे .
९०. देवघरामध्ये एका देवाच्या दोन किंवा तीन मूर्ती कधीही ठेवू नयेत. प्रत्येक देवाची एक मूर्ती ठेवावी.
९१. देवघरामध्ये उदबत्ती, निरंजन आणि समई देवघराच्या आग्नेयेला ठेवावी .
९२. सुखसमृद्धीसाठी घराची दक्षिण आणि पश्चिम दिशा जास्तीत जास्त जड करावी .
९३. दक्षिण दिशेचा वाईट प्रभाव नष्ट करण्यासाठी दक्षिणेला अशोकाची किंवा सागाची उंच झाडे लावावीत.
९४. घरामध्ये जाळ्या-जळमटे, कोळ्यांची घरटी लागू देऊ नये. जाळ्या-जळमटे मध्ये राहू केतू या पाप ग्रहांचे अस्तित्व असते .
९५. झुरळे, मुंग्या, ढेकूण, पाली हे घरात होणे म्हणजे अशुभाचे संकेत आहेत वेळच्या वेळी पेस्ट कंट्रोल करावे .
९६. खराब झालेल्या वस्तू शिळे अन्न, भुरा लागलेले खाद्य पदार्थ यांचा संग्रह करू नये यामुळे घरामध्ये नकारात्मक शक्ती वाढते .

- शुभलक्ष्मी आगमनासाठी मुख्य प्रवेशद्वारावरती स्वस्तिक आणि घराच्या आतुन बाहेरून गणपताची टाइल्स लावावी.
- घराचा उंबरा काळ्या कडाप्पाचा लावू नये लाकडी सागवानी असावा.
- घराचा उंबरा पांढरे मार्बल ,प्लायवुड किंवा जंगली लाकडापासून बनवलेला नसावा.
- घराच्या मुख्य दरवाजातील पायपुसणी हिरव्या, निळ्या, पिवळ्या, क्रीम कलरची असावी.
- वास्तुपुरुष हा वास्तुशांती केल्यावर घराच्या आग्नेय दिशेला स्थापन करावा.
- वास्तुशांती झाल्यानंतर सोन्याचा वास्तुपुरुष स्थापन करावा.
- घरामध्ये झाडू दरवाजाच्या मागे ठेवावा. समोर दिसेल असा ठेवु नये.
- घराच्या मुख्य दरवाजासमोर ओळीने तीन किंवा दोन दरवाजे नसावेत.
- ब्रम्हस्थळाच्या मध्यभागी प्लॉट बसका असल्यास अनेक क्षेत्रांत अडचणींचा सामना करावा लागतो.
- घरामध्ये तुटलेली, फुटलेली, चीर पडलेली भांडी ठेवू नयेत.
- घराच्या आग्नेय दिशेला नळ किंवा पाण्याची टाकी येऊ देऊ नये त्यामुळे घरामध्ये पैसा टिकत नाही.
- कार किंवा टू - व्हीलर पार्क करताना उत्तर आणि पूर्व दिशेला तोंड करून पार्क करावी.
- कारमधील इंटेरिअर आणि सीट कव्हर काळे, निळे, लाल, मरून या डार्क रंगाचे नसावे.
- कारमधील इंटेरिअर आणि सीट कव्हर व्हाईट, ऑफ व्हाईट, आयव्हरी, क्रीम या रंगाचे असावेत.
- घराच्या खिडक्या पूर्व आणि उत्तर दिशेला असाव्यात म्हणजे सूर्यप्रकाश जास्तीत जास्त घरामध्ये येतो.
- दिवाळीचे सहा दिवस लक्ष्मी आगमनाचे, लक्ष्मी पुजनाचे आणि लक्ष्मीला फिरता देणारे असतात. त्यामुळे घरामध्ये आनंददायी वातावरण ठेवावे. भांडणे, वादविवाद, नकारात्मक बोलणे टाळावे.
- दिवाळीचे सहा दिवस शुभ-पुण्यकाल लक्ष्मीदायक असतो. लक्ष्मीचा वरदहस्त कायमस्वरूपी घरावर राहावा यासाठी या कालावधीमध्ये अशुभ कृत्य, अशुभ वर्तन टाळावे.
- दिवाळीमध्ये लक्ष्मीला प्रसन्न करण्यासाठी घराच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर सुंदर रांगोळी काढावी.
- देवी-देवतांच्या मूर्ती किंवा फोटो भितींवर शो-पीस प्रमाणे लावू नयेत. त्यांचे पावित्र्य भंग होते.
- मुख्य प्रवेशद्वाराकडे पाय करून झोपू नये त्यामुळे घरामध्ये येणाऱ्या लक्ष्मीचा अपमान होतो.
- घरातील महत्त्वाची पुस्तके, कागदपत्रे पूर्व दिशेला असलेल्या कपाटात ठेवावीत.
- नवीन घर घेताना बिल्डिंग आणि स्कीमच्या प्लॉटचा एंटरन्स उत्तर आणि पूर्वेचा असावा.
- घरामध्ये पैसे टिकून राहावे सुख - समृद्धी लाभावी यासाठी दिवाळीच्या शुभ मुहूर्तावर गजलक्ष्मी घरामध्ये उत्तरेला तोंड करून स्थापन करावी.

शुभ
दिपावली



*With Best Compliments from*

## Engineering Excellence
**is what defines us**

# HAPPY DIWALI

PIONEER FOUNDATION ENGINEERS PVT. LTD.
ENGINEERING EXCELLENCE



## Contact Us:

**Phone :** +91-22-28581211
+91-22-28581213

**Email :** info@pfepl.com

**Address :**

**Head Office**
B2-509, Boomerang off Chandivali
Farm Road, Andheri (E) Mumbai – 400072

**Registered**
403, Abhimaan- II, L.B.S. Marg, , Opp. Forest
Office, Teen Hath Naka, Thane (W),
Maharashtra, India - 400602

**Branch**
B-1217, 12th Floor, Tower B,
Ithum-noida, Plot No. A-40,
Sector-62. Noida,
Uttar Pradesh- 201309 (India)



With best compliments from
mynet
MYBHARATNET.COM
TRULY FTTH NETWORK
India's First Hyperband Network
With Ultrafast Internet Connectivity
GPON
Infinite Connectivity
Router Free
Power Of 1 Gbps
Truly Unlimited Data
Unlimited Entertainment
w.e.f. 9th July2021
500 Mbps
30 Days Trial Free
Wifi Router Free | Installation Free**
Call us or
Whatsapp us on 9892812345
A Tintech Online Private Limited Product